

एसटी कार्यशाळेत भीषण आग
शेवटचे पान

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



भूजल पातळीत यंदा समाधानकारक वाढ
शेवटचे पान

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २०५ ■ नाशिक, सोमवार, दि. २१ एप्रिल २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा

# हिंदीला पर्याय निवडण्याची मुभा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : मराठी मात्र अनिवार्य


**पुणे :** मराठी भाषा ही अनिवार्य आहेच, पण हिंदी लादली जाणार नाही. त्यासाठी इतर भाषांचा पर्याय उपलब्ध आहे. मात्र, त्या भाषा भारतीय असाव्यात. हिंदीला पर्यायी जी भाषा जवळची वाटेल ती शिकणे अनिवार्य असणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राज्य सरकारने या शैक्षणिक वर्षापासून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. यात पहिलीपासून हिंदी अनिवार्य करण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे. हिंदी भाषा अनिवार्य करण्यास काही राजकीय पक्षांनी आणि संघटनांनीही विरोध केला आहे. यासंदर्भात आता खुद्द राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट शब्दात भाष्य केले आहे.

मराठीच्या ऐवजी हिंदी अनिवार्य करण्यात आलेली नाही. मराठी ही अनिवार्यच आहे. मात्र, नवीन शैक्षणिक धोरणात तीन भाषा शिकण्याची संधी देण्यात आली आहे. त्या शिकणे अनिवार्य आहे आणि या तीन भाषांपैकी दोन भाषा या भारतीयच असायला हव्यात, अशा प्रकारचा नियम आहे. आपल्याला इंग्रजी जवळची आणि भारतीय भाषा दूरची का वाटते? याचाही विचार कुठे तरी केला पाहिजे, असेही फडणवीस म्हणाले. ते पुण्यात पत्रकारांशी बोलत होते.

भाषा सल्लागार समितीच्या अध्यक्षांनी हिंदी भाषेसंदर्भात पत्र दिले आहे? सध्या हिंदीसंदर्भात राज्यात जे काही सुरू आहे, त्यासंदर्भात काय बोलाल? अशा आशयाचा प्रश्न विचारला असता, फडणवीस म्हणाले, मी अद्याप हे पत्र वाचले नाही. पण, पहिली गोष्ट ही समजून घ्यायला हवी की, मराठीच्या ऐवजी हिंदी अनिवार्य करण्यात आलेली नाही. मराठी ही अनिवार्यच आहे. मात्र, नवीन शैक्षणिक धोरणात तीन भाषा शिकण्याची संधी देण्यात आली आहे, त्या शिकणे अनिवार्य आहे आणि या तीन भाषांपैकी दोन भाषा या भारतीयच असायला हव्यात, अशा प्रकारचा नियम आहे. त्यामुळे दोन भारतीय भाषांमध्ये आपण एक मराठी अनिवार्य केली आहे आणि दुसरी भाषा कोणती? तर ती भारतातील कोणतीही भाषा घेतली तर ती हिंदी, तमिळ, मल्याळम, गुजराती अथवा इतर कोणती तरी भाषा घ्यावी लागेल. याच्या बाहेरची भाषा तर घेता येणार नाही.

फडणवीस पुढे म्हणाले, समितीने मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील कमिटीला जेव्हा अहवाल दिला, तेव्हा तिसरी भाषा म्हणून हिंदी ठेवल्यास ती भाषा शिकवणारे शिक्षक आपल्याकडे उपलब्ध आहेत. यामुळे आपल्याला अधिकच्या शिक्षकांची आवश्यकता भासणार नाही. इतर भाषा ठेवल्या. मल्याळम ठेवली, कन्नड ठेवली, गुजराती ठेवली, तर या भाषांचे शिक्षक उपलब्ध नाहीत, म्हणून कुठेही अतिक्रमण नाही, तर ही त्यांची शिफारस आहे.



### हिंदीचे आक्रमण नाही

मुलांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी नेमलेल्या समितीने शिफारस केली होती की, तिसरी भाषा शिकविण्यास सुरुवात होईल. यावेळी इतर भाषिक शिक्षकांची कमतरता असते. हिंदी भाषेचे शिक्षक मुबलक असल्याने हिंदी भाषेची आम्ही निवड केली होती. मात्र, आता हिंदीऐवजी दुसरी कोणतीही भाषा निवडण्याचा पर्याय दिला जाईल, असेही देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

### हिंदीला विरोध अन् इंग्रजीला पालखी

हिंदी भाषा आपल्या मातीतील भाषा आहे. याचा आपल्याला दु:स्वास का वाटतोय हे मला कळत नाही. लोक परकीय भाषा असलेल्या इंग्रजीला विरोध करीत नाही. इंग्रजीला पालखी आणि हिंदीला विरोध याचे मला आश्चर्य वाटत असल्याचेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.



# तापमानाचा भडका!

## नागपूर ४४.७, परभणी ४३.६

**नागपूर :** राज्यात सगळ्याच भागात तापमानाने नागरिक हैराण झाले आहेत. उष्णतेचा पारा टोक गाठत असल्याचे चित्र आहे. काल रविवार(२० एप्रिल) रोजी विदर्भ, मराठवाडा प्रचंड तापला आहे. बहुतांश ठिकाणी ४०-४५ अंश सेल्सिअसच्या नोंदी होत आहेत. आयएमडीने नोंदवलेल्या कमाल तापमानानुसार, काल राज्याच्या उपराजधानीत नागपुरात तब्बल ४४.७ अंश सेल्सिअसची नोंद करण्यात आली आहे. हे राज्यातील सर्वाधिक तापमान आहे.

अकोल्याचा पारा ४४.३ अंश सेल्सिअसवर आहे तर संपूर्ण विदर्भाचे तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे आहे. मराठवाडाही चांगलाच तापला असून, परभणीत ४३.६ अंश तर बीड ४२ अंशांवर स्थिरावले आहे. संपूर्ण कोकणपट्ट्यात तसेच मुंबई व मुंबई उपनगरांत प्रचंड उकाडा जाणवतोय. उन्हाचा चटका असह्य झाला आहे. येत्या पाच दिवसांत सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सोलापूर, सांगलीत हलक्या पावसाची शक्यता वगळता अन्य कुठेही पावसाची शक्यता नसल्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

### उष्ण व दमट हवामानाचा यलो अलर्ट

आजपासून येत्या तीन दिवसांत मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना उष्ण व दमट हवामानाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यांमध्ये प्रचंड उष्ण हवामान राहणार आहे. तर पुणे, सोलापूर जिल्ह्यातही आज उष्ण व दमट हवामानाचा इशारा देण्यात आला. २१ एप्रिल रोजी छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, अकोला, नागपूरमध्ये उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

### महत्त्वाचे

#### पंतप्रधान उद्या सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर जाणार आहेत. सौदी अरेबियाचे काऊन प्रिन्स आणि पंतप्रधान मोहम्मद बिन सलमान यांच्या निमंत्रणावरून २२-२३ एप्रिल रोजी सौदी अरेबियाला भेट देणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा तिसऱ्या काळातील देशातील पहिला दौरा असेल. यापूर्वी पंतप्रधान मोदी २०१६ आणि २०१९ मध्ये सौदीच्या अधिकृत दौऱ्यावर गेले होते.

#### काँग्रेस नेते राहुल गांधी अमेरिकेत

**बोस्टन :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी दोन दिवसांच्या अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले आहेत. राहुल गांधी रविवारी अमेरिकेत पोहोचले. यावेळी अमेरिकेत त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. राहुल गांधी या दौऱ्यात अमेरिकेतील रोड आयलंड येथील ब्राउन विद्यापीठाला भेट देऊन तेथील विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. ते एनआरआय समुदायाच्या सदस्यांना तसेच इंडियन ओव्हरसीज काँग्रेसच्या पदाधिकारी आणि सदस्यांनाही भेटणार आहेत.

#### पंजाबमध्ये १३ दहशतवाद्यांना अटक

**जालंधर :** पंजाब पोलिसांनी पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आणि बब्बर खालसा इंटरनॅशनलशी (बीकेआय) संबंधित १३ दहशतवाद्यांना अटक केली आहे. यामध्ये १ अल्पवयीन आहे. चार दिवस चाललेल्या पंजाब पोलिसांच्या कारवाईत दोन दहशतवादी मॉड्यूलचा नाश करण्यात आला आहे. डीजीपी गौरव यादव यांनी सांगितले की, हे लोक आयएसआयच्या इशाऱ्यावरून देशविरोधी कारवायांमध्ये सहभागी होते.

#### सोमय्यांच्या कार्यालयात पिस्तूलधारी दाखल

**मुंबई :** भाजपाचे माजी खासदार किरीट सोमय्या यांच्या कार्यालयात अज्ञात पिस्तूलधारी शिरल्याची घटना उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणात मुलुंडच्या नवघर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. या पिस्तूलधारी व्यक्तीला माजी खासदार भाजपाचे नेते किरीट सोमय्या यांच्या सुरक्षा रक्षकाच्या प्रसंगावधानाने रोखले असता त्याच्याकडे पिस्तूल असल्याचे उघडकीस आले आहे.

#### विलेपार्लेच्या जैन मंदिरात पूजा

**मुंबई :** मुंबईतील विलेपार्ले भागात असलेल्या पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिरावर १६ एप्रिल रोजी मुंबई महापालिकेकडून कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर देशभरातील जैन समुदायाकडून संतप्त भावना व्यक्त करण्यात येत आहे. मुंबई महापालिकेकडून करण्यात आलेल्या कारवाईच्या विरोधात शनिवारी जैन समाजाकडून रॅली काढण्यात आली होती. काल जैन समाजाने येथे पूजा केली.

#### कर्नाटकचे माजी डीजीपींची हत्या

**नवी दिल्ली :** राज्याचे माजी पोलिस महासंचालक (डीजीपी) ओम प्रकाश यांची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. ते रविवारी बंगळुरू येथील त्यांच्या राहत्या घरात मृतावस्थेत आढळले. या हत्येमुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली असून, त्यांच्या पत्नीवरच हत्येचा संशय आहे. दोघांमध्ये अनेक वर्षांपासून वाद सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.

# कासलेला निवडणुकीत परळीला ड्युटीच नव्हती

## प्रशासनाकडून आयोगाला अहवाल

**बीड :** विधानसभा निवडणुकीदरम्यान रणजीत कासलेला परळी मतदारसंघात ड्युटीच नव्हती. निवडणुकीदरम्यान रणजीत कासले सायबर पोलीस ठाण्यात कार्यरत होता, असा अहवाल पोलिसांनी प्रशासनाला आणि प्रशासनानं निवडणूक आयोगाला दिला आहे.

विधानसभा निवडणुकीत आपल्याला परळीला बंदोबस्त दिला. तसंच ईव्हीएम मशीन ठेवल्या, त्या ठिकाणी बंदोबस्त असतानाही तो बंदोबस्त काढण्यात आला. बँक खात्यावर दहा लाख रुपये पाठवले, त्यातील साडेसात लाख रुपये परत केले तर अडीच लाख रुपये निलंबित झाल्यानंतर खर्च केला, असा दावा बीड पोलीस दलातील बडतर्फ पोलीस अधिकारी रणजीत कासलेनं केला होता. याचं अनुषंगानं निवडणूक आयोगानं माहिती मागवली होती. त्यावरून परळी मतदारसंघाशी संबंधित कोणत्याही ड्युटीवर कासले नव्हता. मतदान केंद्र, स्ट्राँगरूम किंवा मतमोजणी केंद्र यापैकी कुठंही कासलेची ड्युटी नव्हती. निवडणूक कालावधीत विशेष करून ईव्हीएम आणि स्ट्राँग रूमच्या सुरक्षेसाठी निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार केंद्र आणि राज्य शासनाची मिळून तीन स्तरीय सुरक्षा तैनात करण्यात आली होती.

# डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येप्रकरणी महिलेला अटक

**सोलापूर :** येथील प्रसिद्ध न्यूरो फिजिशियन डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरणात सुसाइड नोटमध्ये उल्लेख असलेल्या रुग्णालयाच्या महिला कर्मचारी असलेल्या मनीषा मानेला अटक करण्यात आली. न्यायालयाने तिला तीन दिवस कोठडी दिली आहे. १८ एप्रिल रोजी डॉ. वळसंगकर यांनी बंदुकीच्या गोळ्या झाडत स्वतःला संपवले. या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली होती. आत्महत्येला प्रवृत्त केल्याप्रकरणी या महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. मनीषा माने हिने डॉ. वळसंगकर यांना स्वतः आत्महत्या करण्याची धमकी दिल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.




डॉ. वळसंगकर यांनी आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत या महिलेच्या नावाचा उल्लेख करत आरोपी महिलेमुळेच टोकाचे पाऊल उचलत असल्याचा आरोप केला होता. तिला कामावरून काढल्याने आरोपी महिलेने डॉ. वळसंगकर यांना स्वतः आत्महत्या करण्याची धमकी दिल्याची प्राथमिक माहिती आहे. आरोपी महिलेने मृत डॉक्टरांना नेमका कसा त्रास दिला? या प्रकरणात आणखी कोणी सहभागी आहेत का? याचा तपास करायचा असल्याने महिलेला पोलीस कोठडी सुनावण्यात यावी, असा सरकारी पक्षाचा युक्तिवाद होता. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद लक्षात घेऊन न्यायाधीशांनी आरोपी महिलेस तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

# शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मोफत गणवेश

## सरकारकडून निधी मंजूर

**पुणे :** राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना यंदाच्या शैक्षणिक वर्षात (सन २०२५-२६) मोफत गणवेश उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारने मोफत गणवेश योजनेच्या अंदाजपत्रकास मंजुरी दिली आहे. या अंदाजपत्रकात केंद्र सरकारने महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या मोफत गणवेशासाठी १९० कोटी ९२ लाख १८ हजार रुपयांच्या निधीची तरतूद मंजूर केली आहे.

याशिवाय, राज्य सरकारच्या मोफत गणवेश योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेवरील कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या मोफत गणवेशासाठी ६६ कोटी ९४ लाख ५६ हजार रुपयांच्या निधीची तरतूद मंजूर करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत यंदाच्या शैक्षणिक वर्षात राज्यातील ४२ लाख ९७ हजार ७९० विद्यार्थ्यांना मोफत गणवेश दिले जाणार आहेत. राज्याच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत येत असलेल्या महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना पत्राद्वारे ही माहिती कळविली आहे.

योजनेंतर्गत प्रति विद्यार्थी दोन गणवेश दिले जाणार असून, यासाठी प्रति विद्यार्थी ६०० रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यानुसार या गणवेशासाठी १९० कोटी ९२ लाख १८ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. ही मोफत गणवेश योजना सर्व शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गातील सर्व मुली, मुलांसाठी आहे.



# जम्मू-काश्मीरमध्ये ढगफुटीने हाहाकार

## भूस्खलनात शाळा, घरे, रस्ते गेले वाहून

**श्रीनगर :** रामबन जिल्ह्यातील सेरी बागना भागात रविवारी सकाळी पावसानंतर झालेल्या ढगफुटीत तीन जणांचा मृत्यू झाला. पोलिसांनी सुमारे १०० जणांना वाचवले. ढगफुटीमुळे अचानक पूर आला. डोंगरावरून आलेला ढिगारा गावांकडे आला आणि अनेक लोक आणि घरांना धडकला. सध्या बचावकार्य सुरू आहे.

दुसरीकडे, रामबन जिल्ह्यातील बनिहाल परिसरात अनेक ठिकाणी भूस्खलनाच्या घटना घडल्या आहेत. यामुळे जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आला आहे. शेकडो वाहने अडकली. याशिवाय, हॉटेल्स शाळा आणि घरांनाही ढिगाऱ्यांचा फटका बसल्याचे दिसून येते. रामबन जिल्ह्यातील चिनाब नदीजवळील धर्मकुंड गावात भूस्खलन झाले आहे. १० घरे पूर्णपणे खराब झाली, २५-३० घरांचेही नुकसान झाले. धर्मकुंड पोलिसांनी सुमारे ९०-१०० लोकांना सुरक्षितपणे वाचवले.

जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. ते म्हणाले की, रामबनमध्ये भूस्खलन आणि अचानक आलेल्या पुराच्या दुःखद घटनेने मला खूप दुःख झाले आहे. या कठीण काळात माझ्या संवेदना पीडित कुटुंबांसोबत आहेत. उधमपूर जिल्ह्यातील सतैनी पंचायतीतही मुसळधार वादळ आणि पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. माजी पंचायत सरपंच परशोत्तम गुप्ता म्हणाले की, परिसरात अनेक झाडे उन्मळून पडली आहेत, ज्यामुळे वाहतूक आणि वीजपुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे.

# वाहनांचा टोल आता जीपीएसवरून कापला जाणार

## महाराष्ट्र दिनापासून होणार अंमलबजावणी

**मुंबई :** देशातील राष्ट्रीय महामार्गांवरून प्रवास करणाऱ्यांसाठी केंद्र सरकार १ मे २०२५ पासून फास्टॅगऐवजी नवीन उपग्रह आधारित टोल संकलन प्रणाली सुरू करणार आहे. याबाबत माहिती देताना केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले की, नवीन टोल धोरण पुढील १५ दिवसांत आणले जाईल आणि ते प्रवाशांसाठी समाधानकारक असेल.

ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टिम ही प्रणाली सरकार आणणार आहे. ती जीपीएस आधारित प्रणाली आहे. यामध्ये उपग्रहाच्या मदतीने वाहनाचे स्थान ट्रॅक केले जाईल आणि त्या आधारावर निश्चित अंतरानुसार टोल शुल्क थेट बँक खात्यातून कापले जाईल. त्यामुळे यापुढील काळात आता टोल प्लाझावर थांबण्याची गरज वाहनधारकांना भासणार नाही.

फास्टॅग प्रणालीमध्ये रोख रकमेऐवजी डिजिटल पेमेंटचा समावेश असला तरी, टोल बूथवरून जाताना वाहन थांबावे लागते. बऱ्याच वेळा यामुळे लांब रांगा लागतात. त्याच वेळी जीएनएसएस प्रणाली व्हर्च्युअल टोल बूथद्वारे कार्य करते. यामध्ये वाहनाच्या ट्रॅक केलेल्या अंतरानुसार टोलची गणना केली जाते आणि थेट बँक खात्यातून पैसे दिले जातात. ही प्रणाली १ एप्रिल २०२५ पासून लागू होणार होती. परंतु काही तांत्रिक आणि प्रशासकीय कारणांमुळे ती पुढे ढकलण्यात आली. आता १ मेपासून देशभरात त्याची अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे. आधीच फास्टॅग वापरकर्ता असाल तर घाबरण्याची गरज नाही. सरकार हळूहळू नवीन जीपीएस-आधारित टोल प्रणालीकडे वाटचाल करत आहे. या बदलामुळे, तुमचा टोल प्रवास पूर्वीपेक्षा सोपा, हायटेक होणार आहे.





### नवीन प्रणालीचे फायदे

- टोलनाक्यावर थांबावे लागणार नाही. टोल थेट कापला जाईल
- जितका प्रवास कराल तितका टोल द्यावा लागणार. अंतरानुसार पैसे द्या
- कमी इंधन वापर आणि कमी प्रदूषण
- न थांबता प्रवास करून रस्ता सुरक्षा
- टोल कपात आणि बिलिंगमध्ये पूर्ण पारदर्शकता

# हळदीच्या कार्यक्रमात नाचण्यावरून एकाचा खून

**दिंडोरी : प्रतिनिधी**

चिंचखेड येथील तरुणाचा हळदीच्या कार्यक्रमात नाचण्यावरून झालेल्या वादात धारदार शस्त्राचा वापर करून खून करण्यात आला.



जोपूळ रोड येथील बाजार समितीच्या गेटसमोर शनिवारी रात्री हळदीचा कार्यक्रम सुरू असताना रवी सोमनाथ गुंबाडे (वय वर्ष २३) यास मित्रांनी नाचण्यास सांगितले. त्याने नाचण्यास नकार दिला. त्यामुळे मित्रांमध्ये बाचाबाची झाली. मित्रांनी त्यास धारदार शस्त्राने मारहाण केल्याने रवी गुंबाडे याचा मृत्यू झाला. पिंपळगाव बसवंत येथील पोलीस स्टेशन पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवून तीन मित्रांना अटक केली आहे. हेमंत परसराम जाधव, जनार्दन ज्ञानेश्वर गांगुर्डे, रमेश मुरलीधर शेखरे (सर्व रा.पिंपळगाव बसवंत अंबिकानगर) अशी अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत. पुढील तपास पोलीस अधीक्षक अपराजित अग्निहोत्री, उपविभागीय अधिकारी वासुदेव देसले, पोलीस निरीक्षक रवींद्र जाधव करीत आहेत.

## महत्त्वाचे

### अमृतकार पतसंस्थेस ५१ लाखांचा नफा : चेअरमन भारत कोठावदे



**देवळा :** येथील रघुनाथ हरी अमृतकार ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेस चालू आर्थिक वर्षात ५१ लाख २१ हजार रुपये निव्वळ नफा झाल्याची माहिती संस्थेचे संस्थापक चेअरमन भारत कोठावदे, व्हा. चेअरमन राजेंद्र अहिरराव यांनी दिली. चेअरमन भारत कोठावदे यांनी सांगितले की, संस्थेकडे मार्च २०२५ अखेर १८ कोटी ५० लाख रुपयांच्या ठेवी असून, कर्ज वाटप १५ कोटी ६ लाख झाले आहे. विविध संस्थांमध्ये १० कोटी ६४ लाख रुपयांची सुरक्षित गुंतवणूक असून, संस्थेचे वसूल भागभांडवल १ कोटी ७७ लाख आहे. संस्थेकडे विविध प्रकारचा निधी ४ कोटी ८५ लाखांचा असून, वर्षअखेर संस्थेचे खेळते भागभांडवल २६ कोटी ६५ लाख रुपये झाले आहे. संस्थेचे कर्जवसुलीचे प्रमाण ९८.१५ टक्के असून, थकबाकी १.८५ टक्के तर सीडी रेशो ६०.८७ टक्के आहे. संस्थेकडून सभासदांना तत्काळ कर्जपुरवठा व गरजू शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दत्तक योजना याबाबत संस्था जागरूक आहे. संस्थेने सभासदांचा १ लाखाचा अपघाती विमा उतरविलेला आहे. संस्था स्थापनेपासून सभासदांना दरवर्षी लाभांश व उच्च प्रतीच्या भेटवस्तू वाटप केल्या आहे. चिमणी पक्ष्याच्या संवर्धनासाठी पाणी पिण्यासाठी भांड्यांचे वाटप केले आहे. सामाजिक, शैक्षणिक, सहकार वाढीसाठी संस्था नेहमीच अग्रेसर असल्याचे चेअरमन कोठावदे यांनी सांगितले. यावेळी संस्थेचे कार्यकारी संचालक रोहन वडनेरे, भूषण कोठावदे, संजय अहिरराव, सुनील आहेर, राजेंद्र धामणे, देवीदास ब्राह्मणकर, नितीन लाडे, किशोर सोनवणे, संचालिका जयश्री मुसळे, भारती जाधव, संस्थेचे व्यवस्थापक दावल आहेर, सर्व कर्मचारी आदींसह संस्थेचे तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष श्रीकांत शिनकर, उपाध्यक्ष नानाजी आहेर, प्रदीप धांडे उपस्थित होते.



### मविप्र सेवकांची सहविचार सभा

**येवला :** शिक्षकांनी स्वतः परिपूर्ण राहून विद्यार्थ्यांना ज्ञानदान करावे. दर्जेदार शिक्षण दिले तर विद्यार्थी घडतील. गुणवत्ता असेल तर विद्यार्थी स्पर्धेत टिकतील. त्यामुळे शिक्षकांनी स्वीकारलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पूर्ण करावी, असे प्रतिपादन मविप्रचे येवला तालुका संचालक नंदकुमार बनकर यांनी बोलताना केले. येवला शहरातील होरायझन अॅकॅडमीमध्ये मविप्र सेवकांच्या तालुकास्तरीय सहविचार सभेत बनकर बोलत होते. ते पुढे म्हणाले की, विद्यार्थी हे आपले दैवत मानून तसेच आपले मुले आहे, असे समजून शिक्षकांनी ज्ञानदान करावे. उत्तम शिक्षण दिले तर विद्यार्थी संख्या आपोआप वाढेल. शाळेचे सुकाणू हे शिक्षकांच्या हाती असते. शालेय शिस्त व गुणवत्तेत तडजोड न करता शाळेचा व संस्थेचा नावलौकिक वाढवावा. कला, क्रीडा व विविध स्पर्धा परीक्षांना जास्तीत जास्त विद्यार्थी बसवून गुणवत्ता यादीत मुले कसे येतील यासाठी मेहनत घ्यावी. शिस्त, गुणवत्ता व पारदर्शकता या त्रिसूत्रीप्रमाणे कामकाज करावे, असे बनकर यांनी शेवटी बोलताना स्पष्ट केले. यावेळी प्राचार्य आर. एस. पाखले, आर. सी. महाले, डी. जी. पानसरे, एम. ए. भगत यांनी शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी विविध मुद्यांवर शिक्षकांना मार्गदर्शन केले. यावेळी येवला तालुक्यातील मविप्रच्या पाटोदा, जळगाव नेऊर, मुखेड, देशमाने, गवंडगाव, अंगणगाव, निमगाव मढ, कुसमाडी, पिंपळगाव जलाल, आडगाव रेपाळ आदी सर्व शाखांमधील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी सेवक उपस्थित होते. स्वागत सुनीता हिंगडे यांनी केले. प्रास्ताविक आर. एस. पाखले यांनी केले तर आभार ज्ञानेश्वर साबळे यांनी मानले.

### योग जीवन पद्धती उपयुक्त : डॉ. मंडलिक

**नाशिक :** आयुष्यातील विविध समस्यांमधून मार्ग काढण्यासाठी योगनिद्रा, ओमकार साधना करावी. जीवनातील कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असताना शारीरिक, मानसिकरीत्या आरोग्यपूर्ण व सक्षम राहण्यासाठी योग जीवन पद्धती उपयुक्त आहे. भगवद्गीतेचे आचरण करावे व गीता तत्त्वज्ञान अंगीकारावे, असे मार्गदर्शन योगतज्ज्ञ डॉ. विश्वास मंडलिक यांनी केले. योगविद्या गुरुकुल अंतर्गत योग विद्या धामतर्फे योग जीवन पद्धती या विषयावर शिबिराचे आयोजन करण्यात आले. काल रविवारी (दि.२०) कॉलेज रोडवरील बीवायके महाविद्यालयाच्या प्रांगणातील गुरुदक्षिणा सभागृहात झालेल्या या शिबिरात विविध कार्यक्रम झाले. प्रारंभी पंचवटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक मधुकर कड, डॉ. विश्वास मंडलिक, पौर्णिमा मंडलिक, संदर्भसेवा रुग्णालय रक्तपेढीचे प्रमुख डॉ. पुरुषोत्तम पुरी आदी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने उद्घाटन करण्यात आले. डॉ. सुरेश सूर्यवंशी, डॉ. कविता कांबळे, अॅड. गीतांजली बागुल, डॉ. सतीश वाघमारे, प्रदीप पाटील, सुनंदा जरांडे अशा तज्ज्ञांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. दुपारी १२ वाजता प्रमुख मार्गदर्शक डॉ. विश्वास मंडलिक यांनी योग जीवनपद्धती या विषयावर मार्गदर्शन केले. मानसी शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. सानिका मंगळवेढेकर यांनी आभार मानले. प्रकल्पप्रमुख अध्यक्ष मनोहर कानडे, गौरव शिरोडे, मानसी देशपांडे, बाबासाहेब शिंदे आणि सर्व कार्यकारिणी सदस्यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

### श्रीराम आढाव यांना डॉक्टरेट पदवी प्रदान!




**ओझर :** भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ सदस्य तथा माजी सैनिक श्रीराम निवृत्ती आढाव यांना गांधी पीस फाउंडेशन, नेपाळच्या वतीने मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. जळगाव येथे आयोजित कार्यक्रमात भाजपा आमदार सुरेश (राजूमामा) भोळे यांच्या हस्ते माजी सैनिक श्रीराम आढाव यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. डॉक्टरेट इन एक्सलेंट सर्व्हिस इन आर्मड फोर्सेस अॅण्ड ह्युमिनिटी सर्व्हिसेस विषयावर आढाव यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली.

### बंधाऱ्यात पाय घसरून युवकाचा मृत्यू



**सोग्रस :** चांदवड तालुक्यातील खडकओझर येथील केद्राई धरणामध्ये पाण्यात पडून बुडून वीस वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवार तारीख १९ रोजी सकाळी दहा वाजेच्या सुमारास घडली. आशिष दत्तू आहेर (वय २०, रा. शेवगे वस्ती, वडाळीभोई, ता. चांदवड) हा युवक चांदवड तालुक्यातील खडकओझर गावाजवळील केद्राई धरणाजवळ कामानिमित्त गेला होता. केदराई धरणाजवळ आल्यावर आशिष हा धरणात किती पाणी आहे हे पाहत असताना अचानक त्याचा पाय घसरून तो पाण्यात पडला. त्यास पोहता येत नसल्याने त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही घटना परिसरातील ग्रामस्थांना कळताच त्यांनी तत्काळ तेथे धाव घेऊन आशिष आहेर याचा मृतदेह धरणातून पाण्याच्या बाहेर काढला.

# लासलगाव रेल्वेस्थानकाचा पुनर्विकास; मात्र प्रवाशांविना स्थानक भकास

## बंद असलेले रेल्वेगाड्यांचे थांबे पूर्ववत सुरू करण्याची प्रवाशांची मागणी

**लासलगाव : वार्ताहर**

भारतीय रेल्वे मंत्रालयातर्फे देशभरात अमृतभारत स्टेशन योजना राबविली जात आहे. या योजनेंतर्गत नाशिक जिल्ह्यातील सात रेल्वेस्थानकांचे आधुनिकीकरण केले जाणार आहे. त्या सात रेल्वेस्थानकांमध्ये लासलगाव रेल्वेस्थानकाचा समावेश आहे.सर्व सुविधांनी लासलगाव रेल्वेस्थानकाचा पुनर्विकास झाला, मात्र कोविड काळापासून अनेक गाड्यांचे थांबे बंद आहे. कोरोना संपवून पाच वर्षे झाले, परंतु रेल्वेचा कोरोना का थांबेना. रेल्वेस्थानकाचा पुनर्विकास होऊनही प्रवासीविना स्टेशन भकास दिसत आहे.

१५ ऑगस्ट २०२३ स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे देशातील अनेक रेल्वेस्थानकांचे एकाच वेळी आधुनिकीकरण कामाचा शुभारंभ केला आहे.

आशिया खंडातील कांद्याची प्रख्यात बाजारपेठ म्हणून सर्वदूर परिचित असलेल्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे महत्त्व लक्षात घेऊन लासलगाव रेल्वे स्थानकाचे आधुनिकीकरणासाठी सुमारे १०.५ कोटी निधीतून रेल्वे स्थानकाचे सौंदर्यीकरण होऊन सर्व सुविधांनी परिपूर्ण पुनर्विकास होऊन लासलगाव रेल्वे स्टेशन हायटेक झाले. कोविड कारणामुळे गेल्या पाच वर्षांपासून विविध गाड्यांना लासलगाव रेल्वेस्थानकावरील थांबे बंद करण्यात आलेले असल्याने प्रवासी इकडे फिरकत नाही. त्यामुळे पुनर्विकास होऊनही प्रवाशांविना स्टेशन भकास दिसत आहे. कोविडपूर्वी लासलगाव रेल्वेस्थानकावर थांबा असलेल्या १७०५७/१७०५८ देवगिरी एक्स्प्रेस, १८०२९/१८०३० शालिमार एक्स्प्रेस आणि १३२०१/१३२०२ जनता



एक्स्प्रेसच्या व्यावसायिक थांबे तसेच पुणे-भुसावळ एक्स्प्रेस, हावडा एक्स्प्रेस या गाड्यांचे ही थांबे पूर्ववत करण्याची प्रवाशांची मागणी असून, लासलगाव रेल्वे स्थानकातील देवगिरी, शालिमार व जनता एक्स्प्रेसचे थांबे पूर्ववत सुरू करण्याबाबत रेल्वेचे मुंबई विभागाचे मुख्य व्यवस्थापक धर्मवीर मीना, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी मागणी केली आहे. लासलगाव मार्केटमधून देशभरात तसेच परदेशात विविध ठिकाणी कांदा निर्यात केला जातो. यासाठी लासलगाव रेल्वेस्थानकातून मोठ्या प्रमाणात कांद्यासह शेतमालाचे वॅगन भरले जातात. रेल्वेस्थानकातून प्रवासी वाहतूक होते. कोविड पुनरुज्जीवनानंतर लासलगाव येथे देवगिरी एक्स्प्रेस, शालिमार एक्स्प्रेस आणि जनता एक्स्प्रेसचा व्यावसायिक थांबा अचानक रद्द करण्यात आला. ज्यामुळे शेतकरी, व्यापारी आणि प्रवाशांना मोठा त्रास होत आहे. सध्या लासलगाव रेल्वेस्थानकावर देवळाली, भुसावळ, मुंबई, नांदेड, तपोवन एक्स्प्रेस, लोकमान्य टिळक गोरखपूर काशी एक्स्प्रेस, इगतपुरी-भुसावळ मेमो, सीएसटी-धुळे एक्स्प्रेस, लोकमान्य टिळक कामायनी एक्स्प्रेस, मुंबई-नागपूर सेवाग्राम एक्स्प्रेस, छत्रपती शिवाजी टर्मिनस नंदीग्राम एक्स्प्रेस, नाशिकरोड-बडनेरा एक्स्प्रेस आणि मनमाड-मुंबई-पंचवटी एक्स्प्रेस या गाड्यांना थांबे आहेत.

पुणे-भुसावळ, मनमाड-लोकमान्य टिळक गोदावरी एक्स्प्रेस या गाड्या बंद झाल्याने आणि देवगिरी एक्स्प्रेस, हावडा एक्स्प्रेस, शालिमार जनता एक्स्प्रेस हे थांबे बंद असल्याने प्रवाशांना पर्यायाने एसटी आगार वा इतर मार्ग अवलंबवा लागतो. संभाजीनगरसाठी सकाळी तपोवन एक्स्प्रेस सकाळी १०. ४५ वाजता आहे, तर सायंकाळी ५.४० वाजता कामायनी एक्स्प्रेस या दोन गाड्या आहेत. लासलगाव परिसरातील गावांतील अनेक विद्यार्थी संभाजीनगर येथे उच्च शिक्षण घेतात. अवघ्या दोन रेल्वेगाड्यांमुळे या विद्यार्थ्यांसह अनेक व्यापाऱ्यांची मोठी कुचंबणा होत आहे.

लासलगाव रेल्वेस्थानकाचे अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत झालेले आकर्षक रेल्वे प्रवेशद्वार, स्थानकाची रचना, फार्म प्लॅटफॉर्म, देशांतर्गत बाजारपेठेत कांदा शेतीमाल पाठविण्यासाठी मालधक्के सौंदर्यपूर्ण आहे, मात्र ज्या प्रवाशांना त्याचा फायदा होणे गरजेचे आहे, त्यासाठी रेल्वे प्रशासनाने रेल्वेगाड्यांचे थांबे वाढविणे गरजेचे आहे.

## शिक्षकांनी ज्ञानदानाबरोबरच विद्यार्थी घडवावे : अॅड. ठाकरे

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

संस्थेच्या प्रगतीत कर्मवीरांच्या योगदानाबरोबरच शिक्षकांचे योगदान महत्त्वाचे आहे. ज्ञानदानाचे उत्तम संस्कार करून विद्यार्थी घडवण्याचे पवित्र कार्य शिक्षक करतात. त्यामुळेच समाज हा सुसंस्कृत होत असतो, असे प्रतिपादन मराठा विद्या प्रसारक समाजाचे सरचिटणीस अॅड. नितीन ठाकरे यांनी केले. सायखेडा येथील जनता इंग्लिश स्कूलमध्ये मुख्याध्यापक एन. के. निकम व उपशिक्षक आर. पी. कदम यांच्या सेवापूर्ती समारंभात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मविप्रचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर होते. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये योग्य तो बदल घडवून त्यांची जबाबदारी घेऊन पालक, सभासद, संस्था यांच्या विकासास आजच्या शिक्षकांनी पात्र होऊन समाजाचे ऋण फेडावे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक राम ढोली यांनी केले. यावेळी सत्कारमूर्ती मुख्याध्यापक एन. के. निकम व उपशिक्षक आर. पी. कदम यांचा सेवापूर्तीनिमित्त सपत्नीक सत्कार, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमास स्वागताध्यक्ष मविप्रचे उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, खासदार भास्करराव भगरे, मविप्रचे माजी अध्यक्ष अरविंद कारे, मविप्रचे उपसभापती डी. बी. मोगल, मविप्रचे संचालक शिवाजी गडाख, डॉ. सयाजीराव गायकवाड, अॅड. संदीप गुळवे, अॅड. लक्ष्मण लांडगे, अमित बोरसे, शोभा बोरस्ते, कवी लक्ष्मण महाडिक, भागवत बाबा बोरस्ते, रवींद्र मोरे, शिवाजी निरगुडे, चंद्रकांत कुशारे, अशोक दुधारे, सेवक संचालक चंद्रकांत शिंदे, जगन्नाथ निंबाळकर, व्ही. एन. नाईक शिक्षण संस्थेचे चिटणीस दिगंबर गिते, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष गोरख पुनगर, मविप्रचे शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव, डॉ. भास्कर ढोके, उच्च माध्यमिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष स्वामी कमलाकांताचार्य महाराज, शालेय समितीचे अध्यक्ष विजय कारे, निर्मलाताई खर्डे, नितीन गावले, संपतराव गावले, सुरेश कमानकर, जगन्नाथ डेर्ले, दिलीप शिंदे, प्रभाकर रायते, जगन कुटे, अनिल कातकाडे, केरू निकम, संतू हिरे, मोतीराम भुसारे, रघुनाथ हिरे, सदाशिव खेलूकर, शिवाजीराव देशमुख, उल्हास पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय खैरनार, उपमुख्याध्यापक रामनाथ दाते, पर्यवेक्षक कैलास आहेर, अभिनवच्या मुख्याध्यापिका श्रीमती बोरस्ते, तसेच विविध शाखांचे प्रमुख उपस्थित होते. यावेळी कर्मवीर सभागृहाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अवधूत आवारे यांनी केले. संगीत शिक्षक ज्ञानेश्वर कर्पे व गीतमंच विद्यार्थ्यांनी स्वागतगीत व ईशस्तवन सादर केले. सन्मानपत्र वाचन प्रतीक्षा शिंदे, मनीषा शिंदे यांनी केले. यावेळी विद्यार्थी मनोगत संचिता कांडेकर, शिक्षक मनोगत पंकज गांगुर्डे, तसेच यश निकम, ऋतुजा कदम यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आभार शालेय समितीचे अध्यक्ष विजय कारे यांनी मानले.



## विरमाळला स्वदेश फाउंडेशनतर्फे १९ लाभार्थ्यांना शेळ्या वाटप

**बाहे : वार्ताहर**

देशातील खेड्यांमध्ये ग्रामस्थांसाठी काम करणाऱ्या अनेक संस्था आहेत. त्यातील एक संस्था म्हणजे स्वदेश फाउंडेशन, स्वदेश फाउंडेशनचे सर्वेसर्वा रॉणी स्क्रुवाला व झरिना स्क्रुवाला यांनी ही संस्था काढून एका खडतर प्रवासाला सुरुवात केली.

ग्रामीण भागातील जीवनमान कसे सुधारेल, याकडे लक्ष देऊन या संस्थेने कामाला सुरुवात केली. ग्रामीण भागातील ग्रामस्थांच्या सहकार्याने पाणीयोजना, फळबाग लागवड, बांबू लागवड कौशल्य प्रशिक्षण, बांधकाम प्रशिक्षण, मोतीबिंदू शिबिर, आरोग्य शिबिर, शेळी प्रकल्प अशा अनेक योजना राबवत गावच्या विकासासाठी हातभार लावत आहेत. त्याचप्रमाणे महिलांचे आर्थिक उत्पन्न कसे वाढले पाहिजे, त्यासाठी जोडधंदा म्हणून शेळीपालन हा प्रकल्प पेठ तालुक्यातील सार्थक गावविकास समिती विरमाळ येथे राबवून १९ लाभार्थ्यांना प्रत्येकी २ शेळ्या वाटप करण्यात आल्या. शेळ्यांना राहण्याची व्यवस्था, पाणी, चारा, लसीकरण आदींसह विषयावर स्वदेश फाउंडेशनचे डॉ. अमित कुलकर्णी, समन्वयक दिगंबर वाडेकर यांनी लाभार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.



## गौण खनिज विरोधी धडक कारवाई

**दिंडोरी : प्रतिनिधी**

दिंडोरी येथे २० रोजी पहाटे २ वाजता तहसील कार्यालय दिंडोरी येथील अनधिकृत गौण खनिज विरोधी पथकाने दिंडोरी येथील शासकीय गट क्रमांक ९०८/१ येथे अनधिकृत मुरूम उत्खनन व वाहतूक करताना जेसीबी व वाहन क्रमांक एम. एच.१५ सी.वी. ५६०१ वर कारवाई करून सदर वाहन हे तहसील कार्यालय दिंडोरी येथे लावण्यात आले.

हायवा ट्रक हे वाहन क्रमांक एम.एच. १५ एफ.व्ही. ८८७४ हे प्रांत कार्यालय दिंडोरी येथे लावण्यात आले आहे. पंचनामा करून अहवाल सादर करण्यात आला आहे. सदर शासकीय गटातून अनधिकृतपणे गौण खनिज उत्खनन होत असल्याबद्दल अनेक तक्रारी यापूर्वी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने अचानकपणे गोपनीयरीत्या सदर कारवाई करण्यात आलेली असून, यापुढे अशीच गोपनीय कारवाई सुरू ठेवण्यात येईल, असे तहसीलदार दिंडोरी यांनी सांगितले.

## न्यायडोंगरी येथे फिरते लोकअदालत शिबिर

**नांदगाव : प्रतिनिधी**

राष्ट्रीय विधी सेवा समिती यांचे न्याय आपल्या दारी या संकल्पनेतून नांदगाव तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष व नांदगाव न्यायालयाचे न्यायाधीश जे. एम. अग्निहोत्री यांच्या मार्गदर्शनाखाली न्यायडोंगरी ग्रामपंचायत येथे फिरते लोकन्यायालय व विधी साक्षरता शिबिर शनिवार ( दि.१९ ) रोजी आयोजित करण्यात आले होते.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदगाव न्यायालयाचे न्यायाधीश जे. एम. अग्निहोत्री हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नांदगाव वकील संघ अध्यक्ष अॅड. बी. बी. बिन्नर, उपाध्यक्ष अॅड. कुणाल आहेर, वरिष्ठ विधिज्ञ जे. आर. कसलीवाल, अनिल आहेर, शिंदे साहेब, बी. आर. चौधरी, पी. एम. घुगे, युनूस शेख, माजी आमदार अॅड. अनिलकुमार आहेर आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी अॅड. राजेंद्र दराडे, अॅड. वसंतराव आहेर, माजी आमदार अॅड. अनिलदादा आहेर, अॅड. जी. एस. सुरसे, अॅड. विजय रिंढे, अॅड. दिगंबर आहेर, विधी सेवा पॅनल सदस्य अॅड. रंजन आहेर, पी. एस. पवार, नांदगाव वकील संघ सचिव अॅड. शेखर पाटील, महिला प्रतिनिधी अॅड. वंदना पाटील, अॅड. उमेश कुमार सरोदे, अॅड.अक्षय कासलीवाल, अॅड. राहुल राऊत, अॅड. अश्विन महाले, अॅड. तुकाराम राठोड, तसेच न्यायडोंगरी ग्रामपंचायतीचे सरपंच सुशीला अहिरे, उपसरपंच अॅड. अमोल आहेर, सदस्य विष्णू आहेर, राजू आहेर, पत्रकार गजूदादा आहेर, ग्रामविकास अधिकारी शरद मोहिते यांच्यासह ग्रा. पं. सदस्य व कर्मचारी व ग्रामस्थ हजर होते.

या विधी साक्षरता शिबिरात अॅड. वंदना पाटील यांनी महिला, त्यांचे हक्क व अधिकार व महिलांशी संबंधित कायदे यावर मार्गदर्शन केले. अॅड. पी. एस. पवार यांनी ज्येष्ठ नागरिक यांचे कायदे यावर तर अॅड. युनूस शेख यांनी फौजदारी कायदे व तरतुदी यावर तसेच अॅड. बी. आर. चौधरी यांनी विवाहविषयक कायदे यावर मनोगत व्यक्त केले तसेच अध्यक्ष म्हणून नांदगाव न्यायालयाचे न्यायाधीश अग्निहोत्री यांनी वैकल्पिक समझोता यावर मार्गदर्शन करून लोकन्यायालयाचे महत्त्व पटवून दिले व जास्तीत जास्त वाद न्यायालयात जाण्यापूर्वी कसे मिटवता येतात यावर मार्गदर्शन केले.

## कांचनबारी घाट रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी

**देवळा : प्रतिनिधी**

तालुक्यातील पश्चिम भागातील कांचनबारी घाट रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असून, यामुळे परिसरात ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. या घाट रस्त्याची जि. प.चे माजी सभापती अरुण आहेर यांनी नुकतीच पाहणी केली आहे.

यावेळी उपस्थित नागरिकांनी घाट रस्त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करावी, अशी मागणी शिष्टमंडळाने अरुण आहेर यांच्याकडे केली. देवळा तालुक्यातील पश्चिम भागातील खर्डे, वार्शी, कनकापूर, शेरी, वडाळा, वाजगाव, मुलूखवाडी तसेच चांदवड तालुक्यातील कानमंडाळे, धोडंबे, वडाळीभोई, शिंदे व कळवण तालुक्यातील निवाणेसह परिसरासाठी दळणवळणाच्या दृष्टीने माजी मंत्री स्व. ए. टी. पवार यांनी कांचनबारी घाट तसेच निवाणे बारी मार्ग सुरू केला.



पावसाळ्यात या दोन्ही घाटांत दरड कोसळण्याचे प्रकार घडतात तसेच अरुंद रस्त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. सध्या या घाटात खड्ड्यांचे साम्राज्य पसरल्याने व रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी काटेरी झुडपांनी वेढा घातल्याने वाहनधारकांना मार्गक्रमण करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. खर्डे परिसरातील बहुसंख्य शेतकरी कांचनबारी मार्गाने पिंपळगाव, वणी येथे कांदे विक्रीसाठी जातात. तसेच या घाटातून इतरही वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

मात्र, कांचनबारी घाटात खड्ड्यांचे साम्राज्य असल्याने वाहनधारकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. वाहनांची नासधूस, अपघात व शारीरिक त्रासदेखील यामुळे होत असल्याच्या तक्रारी येत असून, या घाट रस्त्याच्या समस्येबाबत खर्डे परिसरात ग्रामस्थांनी जि. प.चे माजी सभापती अरुण आहेर यांची भेट घेऊन दुरुस्तीची मागणी केली. आहेर यांनी गेल्या दोन दिवसांपूर्वी स्थानिक नागरिकांना सोबत घेत कांचनबारी घाट रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी केली व समस्या जाणून घेतली व या रस्त्याच्या कामाच्या दुरुस्तीबाबत आमदार डॉ. राहुल आहेर यांच्याशी आपण चर्चा करून लवकरात लवकर दुरुस्ती करण्याचे त्यांनी शिष्टमंडळाला आश्वासन दिले. तसेच या मार्गावरून पूर्वी सुरू करण्यात आलेली व सध्या बंद करण्यात आलेली कळवण - नाशिक बससेवादेखील पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी कनकापूर ग्रामपंचायतीचे सदस्य गोविंद बर्वे, वि.का. सोसायटीचे माजी संचालक आबासाहेब सावकार, भाजपाचे निंबा निकम, अनिल देवरे, कांचने येथील राकेश हेंबाडे, रामदास हेंबाडे आदी उपस्थित होते.



## शेतकऱ्यांनी बांधावर वृक्ष लागवड करावी : रोशन केदार

**सोग्रस : वार्ताहर**

प्रत्येक शेतकऱ्याने आपापल्या शेताच्या बांधावर विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करावी तसेच विहीर पुनर्भरण योजनेचा लाभ घ्यावा आणि आपल्या शेतात वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाच्या उताराकडील कोपऱ्यामध्ये पाणी साचणाऱ्या ठिकाणी पाच बाय पाच बाय सहा अशा आकाराचा खड्डा खणून घ्यावा.

त्या खड्ड्यामध्ये दगडगोटे, विटांचे तुकडे भरावेत. या खड्ड्यात पावसाळ्यामध्ये पाणी साचून ते शेतातील विहिरीमध्ये पुनर्भरण प्रक्रियेद्वारे उतरण्यास मदत होऊन जलसाठा वाढतो.. यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने या योजनांचा लाभ घ्यावा, असे प्रतिपादन रोशन केदार यांनी केले. चांदवड तालुक्यातील भयाळे येथील ग्रामस्थांसाठी आयोजित विनता विकास फाउंडेशनच्या वतीने चर्चासत्राप्रसंगी बोलताना त्यांनी सांगितले. याप्रसंगी विनता विकास फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर शिंदे, माजी सरपंच भाऊसाहेब शिंदे, सोसायटीचे चेअरमन दिलीप आहेर, सरपंच कल्पना शिंदे, किरण शिंदे उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### मसाज पार्लरच्या नावाखाली देहविक्री; ४ महिलांची सुटका

**जळगाव :** मसाज पार्लरच्या नावाखाली देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी कारवाई करत देहविक्रीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत चार महिलांची सुटका करण्यात आली असून, दोघा परप्रांतीय आरोपींवर पिटा ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या धक्कादायक घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. जळगाव शहरातील नयनतारा ऑर्किड मॉल येथील एका मसाज पार्लर देहविक्रीचा प्रकार सुरू होता. याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. पोलिसांना याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी बनावट ग्राहक पाठवून खात्री केली. संबंधिक व्यक्तीने त्याला बॉडीमसाजसोबत इतर अनैतिक सेवांचे आमिष दिले. याची माहिती त्याने पोलिसांना दिली. पोलिसांना याची माहिती मिळाल्यानंतर सापळा रचला. तसेच छापा टाकून चार महिलांना ताब्यात घेतलं. छाप्यावेळी मसाज पार्लरच्या नावाखाली देहविक्री होत असल्याचे समोर आले. पोलिसांनी महिलांची सुटका करून त्यांना स्थानिक संरक्षण गृहात पाठवण्यात आले. तर, पार्लर चालवणाऱ्या दोघा परप्रांतिय आरोपींवर पिटा ॲक्ट अंतर्गत गुन्हा नोंजवण्यात आला आहे. देहविक्रीवर या अनैतिक व्यवसायावर जळगावचे शहर पोलीस स्टेशनचे निरीक्षक अनिल भवारी, एलसीबीचे उपनिरीक्षक शरद बागल, सपोनी शितल कुमार नाईक, उपनिरीक्षक महेश घायतळ, सहाय्यक फौजदार विजयसिंह पाटील, यांच्यासह इतर पोलीस अधिकाऱ्यांनी आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

### भरधाव पिकअपची बैलगाडीला धडक; शेतकऱ्यासह बैलाचा मृत्यू, दोघे जखमी

**हिंगोली :** हिंगोलीच्या वसमतमध्ये शेतकऱ्याच्या बैलगाडीचा भीषण अपघात झाला आहे. भरधाव वेगात येणाऱ्या पिकअप वाहनाने बैलगाडीला जोरदार धडक दिली. यात शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला आहे. तर अन्य दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना लागलीच रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. हिंगोली जिल्ह्यातील आसेगाव- निळा मार्गावर ही सदरची घटना घडली आहे. या अपघातात पंडितराव मुळे या शेतकऱ्याचा मृत्यू झाला आहे. दरम्यान नेहमीप्रमाणे पंडितराव मुळे हे सकाळी शेतकरी शेतात कामासाठी निघाले होते. यावेळी त्यांच्यासोबत मुलगा आकाश मुळे व बळीराम गच्छे असे तिघेजण मिळून गावाकडून निळा रोडने शेताकडे बैलगाडीत बसून शेतीच्या कामकाजासाठी निघाले होते. याच वेळी हि दुर्घटना घडली. यावेळी नांदेडच्या दिशेने वसमतकडे कोंबडी वाहतूक करणाऱ्या पिकअप वाहनाने मुळे यांच्या बैलगाडीला समोरून जोरदार धडक दिली. यामध्ये पंडितराव मुळे यांचा जागीच मृत्यू झाला. तर आकाश व इतर एक जण गंभीर जखमी झाला आहे. तसेच घटनेत एका बैलाचा देखील मृत्यू झाला आहे. तर धडक देणारे वाहन देखील पलटी झाले होते. बैलगाडीला धडक देणारी गाडी देखील यात पलटी झाल्याने कोंबड्यांचा देखील मृत्यू झाल्याची माहिती आहे. यामुळे रस्त्यावरील वाहतूक खोळंबली होती. दरम्यान या घटनेनंतर वसमत ग्रामीण पोलिसांनी तातडीने घटनास्थळी दाखल होत वाहतूक व्यवस्था सुरळीत केली. तर परिसरातील नागरिकांनी मृत व जखमी झालेल्या शेतकऱ्याला रुग्णालयात दाखल केले होते. जखमींवर सध्या उपचार सुरु आहेत

### बदलापुरातील फलाट क्र.१ बंद

**बदलापूर :** मध्य रेल्वेच्या प्रवाशांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. अंबरनाथ, टिटवाळा, बदलापूर या ठिकाणाहून मुंबई शहरात कामानिमित्त येणाऱ्या चाकरमान्यांची संख्या जास्त आहे. मात्र आता मध्य रेल्वेवरील बदलापूर स्थानकातील फलाट क्रमांक एक कायमस्वरूपी बंद होणार आहे. रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयाने प्रवाशांची फरफट होणार आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मध्य रेल्वेच्या बदलापूर रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म क्रमांक एक कायमस्वरूपी बंद करण्याचा निर्णय वर्षभरापूर्वी घेण्यात आला होता. मात्र प्रवाशांनी त्याला कडाडून विरोध केल्यानंतर रेल्वेकडून या निर्णयाला स्थगिती देण्यात आली होती. मात्र आता पुन्हा एकदा रेल्वे प्रशासनाकडून हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मेगाब्लॉक घेऊन प्लॅटफॉर्म क्रमांक एक वर बॅरिकेटिंग केलं जाणार आहे. याची प्रवाशांमध्ये कुठेही वाच्यता होऊ नये, यासाठी रेल्वे प्रशासनाकडून गोपनीयता पाळण्यात येत आहे. सध्या अस्तित्वात असलेला प्लॅटफॉर्म क्रमांक एक हा कायमस्वरूपी रेलिंग लावून बंद करण्यात येणार असल्याने बदलापूर पूर्वेकडे राहणाऱ्या प्रवाशांना मोठी फरफट होणार आहे. इतकच नाही तर पूर्वेकडील प्रवाशांना पश्चिमेकडे जाऊन मग प्लॅटफॉर्म क्रमांक एक वरून म्हणजे सध्याच्या होम प्लॅटफॉर्मवरून गाडी पकडावी लागणार आहे. दरम्यान रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयानंतर बदलापूरकरांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

### रासायनिक कंपनीला भीषण आग

**अंबरनाथ :** अंबरनाथच्या मोरीवली एमआयडीसीतील रासायनिक कंपनीला लागलेल्या भीषण आगीत संपूर्ण कंपनी जळून खाक झाली. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही. : ४:१३ मोरीवली एमआयडीसीत स्पीड इंटरनॅशनल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड नावाची रासायनिक कंपनी आहे. या कंपनीत पोटॅशियम परमॅग्नेटचं उत्पादन केलं जातं. या कंपनीत शनिवारी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास रासायनिक प्रक्रियेदरम्यान आग लागली. कंपनीत केमिकलचा मोठा साठा असल्यामुळे काही क्षणातच ही आग भडकली आणि कंपनीत मोठमोठे स्फोट होऊ लागले. मात्र कंपनीतील कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत कंपनीच्या बाहेर पळ काढल्याने कुणालाही इजा झालेली नाही. या आगीची माहिती मिळताच अंबरनाथ, बदलापूर, उल्हासनगर आणि एमआयडीसीच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत आज विझवण्याचे प्रयत्न सुरू केले. अखेर दोन तासांच्या अथक प्रयत्नांनी ९ वाजताच्या सुमारास फोमचा मारा केल्यानंतर ही आग विझवण्यात अग्निशमन दलाला यश आलं. दरम्यान, या आगीनंतर कंपनीवर अनेक प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. या कंपनीकडे इन ऑरगॅनिक कंपाऊंड प्रोडक्शन लायसन्स असून त्यामध्ये ज्वलनशील रसायनांचा समावेश नसतो.

### भरधाव बसची बाइकला जोरदार धडक, दाम्पत्याला फरफटत नेले; महिलेचा मृत्यू

**जळगाव :** जळगाव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यातील गडखांब येथे एका भरधाव बसने मोटरसायकलला जोरदार धडक दिल्याने लता मुरलीधर पाटील या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तर त्यांचे पती मुरलीधर पाटील गंभीर जखमी झाले आहेत. ही दुर्दैवी घटना मुरलीधर पाटील व त्यांच्या पत्नी लता पाटील हे दहिवद शिवारातील शेतात जाण्यासाठी मोटरसायकलवरून जाताना घडली. चोपडा येथून अमळनेरकडे येणाऱ्या यावल आगाराच्या एमएच २० बीएल २६५६ क्रमांकाच्या एसटी बसने त्यांना समोरून जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीसह दोघांनाही बसने जवळपास ५० ते ६० फूट फरफटत नेलं. या धडकेत लता पाटील गंभीर जखमी झाल्या. तातडीने त्यांना उपचारासाठी धुळे येथील रुग्णालयात हलवण्यात आलं. मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. त्यांचे पती मुरलीधर पाटील हे देखील गंभीर जखमी असून त्यांच्यावर अमळनेर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या अपघाताविषयी दहिवद गावाचे स्थानिक तरुण नितीन सोनवणे यांनी माहिती दिली. ते सकाळी त्या दिशेला फिरायला गेले असता, त्यांच्या डोळ्यासमोर हा अपघात झाला.

### तीन जणांकडून एकाची हत्या

**पुणे :** पुण्यातील आंबेगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीतील कात्रजमध्ये भररस्त्यात तीन जणांनी एका तरुणाची क्रूर हत्या केली. जागेच्या वादातून २३ वर्षीय तरूणाची हत्या करण्यात आली. शुभम सुभाष चव्हाण असे मृत तरूणाचे नाव आहे. या घटनेनंतर आंबेगावमध्ये एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांचा धाक राहिला की नाही? असा सवाल उपस्थित केला जातोय. रेकॉर्डवरील गुन्हेगार अमर साकोरे आणि त्याच्या दोन साथीदारांनी मिळून २३ वर्षीय शुभमचा जीव घेतल्याने खळबळ उडाली.

# ग्रीन जिमने घेतला मोकळा श्वास

## पोलिस ठाणे आवारातील वाहने हटविली

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

विविध गुन्ह्यांतील न्यायालयीन प्रक्रियेत तपासकामासाठी जप्त केलेल्या दुचाकी गाड्यांमध्ये पोलिस ठाण्याच्या आवारातील ग्रीम जिम हरवली होती, मात्र अंबड पोलीस ठाण्याच्या परिसरात अनेक महिन्यांपासून अडथळा ठरत असलेल्या व साचलेल्या दुचाकी आणि चारचाकी वाहने अखेर हटवण्यात आल्या. शंभर दिवस कृती आराखड्यानुसार अंबड पोलीस ठाण्याच्या परिसरात मोठी साफसफाई करण्यात आली असून, येथील ग्रीन जिमने आता अक्षरशः मोकळा श्वास घेतला आहे.

अंबड पोलिस ठाण्याच्या मागील बाजूस गेल्या अनेक वर्षांपासून जप्त करण्यात आलेल्या किंवा सोडून दिलेल्या गुन्ह्यातील वाहनांचा खच पडला होता. त्यामुळे परिसरात अस्वच्छता वाढली होती आणि ग्रीन जिमसारखी सार्वजनिक सुविधा वापरात येत नव्हती. साचलेल्या वाहनांमुळे परिसरात साप, विंचू आणि इतर कीटकांची संख्या वाढली होती. नागरिक तसेच पोलीस कर्मचारीही त्यामुळे त्रस्त झाले होते. मात्र, आता वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या



सिडको : भंगारात पडलेल्या दुचाकी व चारचाकी उचलून नेल्याने झालेली मोकळी जागा.

शंभर दिवस कृती आराखड्यानुसार अंबड पोलीस ठाण्याच्या परिसरात सकारात्मक बदल सुरू झाले आहेत. सुरुवातीस या परिसरातील सर्व अडथळा ठरणारी वाहने हटवण्यात आली. त्यानंतर मोठ्या प्रमाणावर सफाई मोहीम राबवली गेली. या कारवाईनंतर ग्रीन जिमचे उपकरण स्वच्छ करण्यात आले असून, ते पुन्हा कार्यान्वित झाले आहेत. आता पोलीस कर्मचारी आणि नागरिकही या जिमचा वापर व्यायामासाठी करू शकणार आहेत. फिटनेस वाढवण्यासाठी उपलब्ध असलेली ही सुविधा मागील काही काळात निष्क्रिय अवस्थेत पडून होती. आता ती जागा वापरण्यायोग्य झाली आहे. याशिवाय, अंबड पोलीस ठाण्याच्या इमारतीवर रंगरंगोटीचे कामही सुरू झाले आहे. खराब झालेली भिंती, उडालेला रंग आणि जीर्ण झालेले भाग यांच्यावर दुरुस्ती आणि सौंदर्यीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे.

एकूणच पोलीस ठाण्याचा चेहरामोहरा बदलण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या संपूर्ण उपक्रमामुळे नागरिकांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली आहे. पोलीस प्रशासनाच्या या कृतीचे नागरिकांकडून स्वागत होत आहे. पोलिस प्रशासन फक्त कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठीच नव्हे, तर लोकांना सकारात्मक अनुभव देण्यासाठीही सजग आहे, असे मत अनेकांनी व्यक्त केले.

### माझ्या दृष्टीने वैयक्तिक मित्र विषय संपला : शेलार

**मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि भाजपचे नेते आशिष शेलार हे एकमेकांचे पक्के मित्र म्हणून ओळखले जातात. पण आता याच मैत्रीमध्ये दुरावा आल्याचं समोर आलं आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्र येण्याबाबतच्या बातमीवर जेव्हा आशिष शेलारांना प्रश्न विचारण्यात आला, तेव्हा शेलारांनी दिलेली प्रतिक्रिया चर्चेचा विषय ठरली. आता वैयक्तिक मित्र विषय संपला असं म्हणत आशिष शेलार यांनी त्यांची भूमिका जाहीर केली. राज ठाकरेंशी हातमिळवणी करण्यासंदर्भात उद्धव ठाकरेंनी जाहीर भाषणात काही अटी ठेवल्या. मात्र ती अट आहे की राजकीय कट आहे अशी शंका भाजप नेते आणि सांस्कृतिक मंत्री शेलारांनी उपस्थित केला. राज ठाकरे यांच्याकडून एका भाषणात विधानसभेतील आमदारांसंदर्भात बोलताना खोकेबहाद्दर असा उल्लेख करण्यात आला. त्यानंतर शेलार यांनी राज ठाकरेंच्या वक्तव्याचा समाचार घेतला. आपल्या पक्षाचा एकही आमदार, खासदार नसणाऱ्यांनी यावर बोलू नये असं आशिष शेलार म्हणाले. इथूनच राज ठाकरे आणि आशिष शेलार यांच्यात दुरावा निर्माण झाला




# सेवाकार्याचा संस्कार प्रत्येकात : मुख्यमंत्री

**पुणे : प्रतिनिधी**

भारतात सेवेची परंपरा खूप मोठी असून, सेवा कार्याचा संस्कार प्रत्येकात आहे. सेवाकार्य करण्यासाठी सरकारसोबत स्वयंसेवी संस्था उभ्या राहिल्या तर कार्याची गती अधिक वाढेल,अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

भारत विकास परिषदेच्या नवभारत फौंडेशनने फक्त साडेचार तासात एकूण ८९२ दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव बसवण्यात आले.या विश्वविक्रमाचे गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड प्रमाणपत्र मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भारत विकास परिषदेला प्रदान करण्यात आले,त्यावेळी ते बोलत होते. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकात पाटील,केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ,आमदार सिद्धार्थ शिरोळे,भारत विकास परिषदेचे दत्ता चितळे,विनय खटावकर,राजेंद्र जोग उपस्थित होते. भारत विकास परिषदेच्या पुण्यातील विकलांग पुनर्वसन केंद्रातर्फे अवघ्या साडेचार तासात तब्बल ८९२ दिव्यांगांना कृत्रिम पाय (मॉड्यूलर फूट) व कृत्रिम हात बसवून विश्वविक्रम झाला असल्याची घोषणा गिनिज वर्ल्ड रेकॉर्डसचे मुख्य प्रतिनिधी स्वप्नील डांगरीकर यांनी केली व प्रमाणपत्र दिले. गिनिज वर्ल्ड रेकॉर्डसकरिताचे समन्वयक मिलिंद वेर्लेकर तसेच दिव्यांगांच्या वैद्यकिय तपासणीकरिता डॉ. तापडीया, डॉ. मिलिंद गांधी, डॉ. नागापूरकर आदी उपस्थित होते. यापूर्वीचा विश्वविक्रम गुजरातमध्ये २०२१ साली ८ तासात ७१० दिव्यांगाना कृत्रिम पाय बसविण्याचा झाला होता. सूत्रसंचालन रवींद्र खरे यांनी केले तर श्रीनिवास कुलकर्णी यांनी आभार मानले.

# अंगणवाडी सेविका, मदतनिसांचे मानधन रखडले

## मनपा प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर विरोधकांची नाराजी

**नाशिक : प्रतिनिधी**

महानगरपालिका हद्दीतील अंगणवाडीसेविका आणि मदतनिसांचे मार्च महिन्याचे मानधन रखडल्यामुळे तीव्र नाराजी पसरली आहे. अर्धा एप्रिल महिना उलटूनही खात्यावर अद्यापपर्यंत मानधन जमा झालेले नाही. यामुळे अंगणवाडी सेविकांचे आर्थिक नियोजन कोलमडले आहे.

वित्तीय वर्ष २०२४-२५ चा समाप्ती महिना म्हणजेच मार्च महिना असल्याने यासंबंधी काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या असल्याचे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात येत आहे. मात्र, इआरपी प्रणालीत अडथळा असल्याचा उल्लेख करत प्रशासनाने जबाबदारी झटकली आहे. विशेष म्हणजे संबंधित खात्यांकडून अद्याप बिलेच सादर न झाल्याचे सांगण्यात आले आहे, त्यामुळे हे मानधन कधी मिळणार? याबाबत अजूनही अनिश्चितता कायम आहे.

> नाशिक शहरातील सुमारे ६०० अंगणवाडी सेविका आणि मदतनीस आपली सेवा प्रामाणिकपणे देत आहेत. यामध्ये विधवा, परित्यक्त्या, गरीब आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील महिलांचा मोठा सहभाग आहे. शासनाच्या योजनांचा लाभ समाजातील तळागाळातील मुलांपर्यंत पोहोचवण्याचे काम हे त्या महिला करत असतानाच त्यांच्याच न्याय्य हक्कांकडे दुर्लक्ष होत आहे.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानातील श्रमिक हक्कांचा आणि कामगार कायद्याचा यामध्ये स्पष्टपणे भंग होत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# स्वखर्चाने बदलवला केबिनचा लूक

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून नाशिक मनपाच्या तिजोरीत आर्थिक टंचाई असताना मुख्यालयातून सिडको विभागीय कार्यालयात नव्याने बदलून आलेले बांधकाम विभागाचे उपअभियंता हेमचंद्र नांदुर्डीकर यांनी आपल्या केबिनचे नूतनीकरण स्वखर्चातून करत एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मनपाच्या सिडको विभागीय कार्यालयात अनेक अधिकारी काम करतात. मात्र, कालांतराने कार्यालयीन केबिन व कार्यक्षेत्रांची अवस्था जीर्ण होत जाते. सरकारी यंत्रणेत अशा बाबींसाठी स्वतंत्र निधीची वाट पाहिली जाते. मात्र, उपअभियंता नांदुर्डीकर यांनी निधीची वाट न पाहता स्वतःच पुढाकार घेत स्वखर्चातून केबिन दुरुस्तीचा निर्णय घेतला आहे. नांदुर्डीकर यांनी रंगरंगोटी,



सिडको : मनपाच्या सिडको विभागीय कार्यालयातील नूतनीकरण करण्यात आलेली उपअभियंता हेमचंद्र नांदुर्डीकरांची हीच ती केबिन.

> कोणत्याही शासकीय किंवा निमशासकीय कार्यालयाचे नूतनीकरण किंवा सुशोभीकरण करताना विभागप्रमुखांच्या परवानगीची गरज असते. त्यासाठी निधीची मंजुरी घ्यावी. त्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जाते. मात्र, राजीव गांधी भवनातील नगररचना कार्यालयातील कामाचा अनुभव बघता नांदुर्डीकर यांनी हे कार्यालय शासकीय नसून, आपलेच समजून त्यांनी नूतनीकरण केले. दुसरीकडे याच बांधकाम विभागातून पाणीपुरवठा विभागात बदली झालेले उपअभियंता हेमंत पठे यांनीदेखील पाणीपुरवठा विभागात बदली होताच त्यांच्याही केबिनचे काम सुरू केले आहे. यावरून जणू एकमेकांबरोबर चढाओढ लागली आहे की काय? असे वाटू लागले.


फर्निचर, फॉल सिलिंग, कारपेट, इलेक्ट्रिकल आणि सौंदर्यीकरणाचे काही कामे करून घेतली आहेत. यामुळे कार्यालयीन वातावरण प्रसन्न आणि कार्यक्षमतेस अनुकूल झाले आहे. या निर्णयामागील भूमिका स्पष्ट करताना उपअभियंता हेमचंद्र नांदुर्डीकर म्हणाले, मी ज्या केबिनमध्ये बसून नागरिकांच्या सेवेसाठी काम करतो. त्या जागेचे नूतनीकरण माझ्या स्वतः करत आहे. मला काहीही चुकीचे वाटत नाही. निधी मिळेपर्यंत थांबण्यापेक्षा आपण जे शक्य आहे ते करायला हवे.

त्यांच्या या भूमिकेने अनेक सहकारी अधिकारी आणि कर्मचारी प्रभावित झाले आहेत. सरकारी यंत्रणेमध्ये पारदर्शकता, स्वच्छता आणि कार्यक्षमतेचा अभाव असल्याच्या तक्रारी सर्रास ऐकायला मिळतात. पण नांदुर्डीकर यांचा हा निर्णय त्या साचलेल्या विचारांना छेद देणारा ठरला आहे.

# दादांची हाजी हाजी करणारा माणूस... आ. सुहास कांदे यांचा समीर भुजबळांना टोला

**नांदगाव : प्रतिनिधी**

समीर भुजबळ हा दादांची हाजी



हाजी करणारा माणूस असून, करप्शन करून कमावलेले पैसे पचवण्यासाठी समीर भुजबळ अजितदादांची हाजी हाजी करत असल्याचा घणाघात आमदार सुहास कांदे यांनी नांदगाव येथील पत्रकार परिषदेत केला.

माझा राजीनामा अजितदादांनी स्वीकारला नाही, असा दावा समीर भुजबळ यांनी केला होता, याबद्दल आमदार सुहास कांदे यांना प्रश्न विचारला असता पत्रकारांना उत्तर देताना आ. सुहास कांदे बोलत होते.


आमदार कांदे पुढे म्हणाले की, समीर भुजबळ हा अजितदादांकडून हुसकलेला माणूस असून, परंतु ईडी, सीबीआय यांच्याकडून वाचण्यासाठी समीर भुजबळ अजितदादांच्या पुढे पुढे करत असल्याचे आमदार सुहास कांदे यांनी सांगितले. समीर भुजबळ यांना परत परत हुसकावले जाते आणि हुसकून देखील ते परत परत येत असतात. विधानसभा निवडणुकीमध्ये आमदार सुहास कांदे आणि समीर भुजबळ यांची खडाजंगी अवघ्या महाराष्ट्राने बघितली होती. विधानसभा निवडणुकीनंतर प्रथमच आमदार सुहास कांदे आणि समीर भुजबळ माध्यमांच्या माध्यमातून पुन्हा समोरासमोर आले.

# राष्ट्रवादी अध्यक्षपदाचा राजीनामा अजित पवारांनी स्वीकारला नाही

## समीर भुजबळ यांचा दावा

**नाशिक : प्रतिनिधी**

नांदगाव भयमुक्त करण्यासाठी आपण नांदगावमधून



अपक्ष निवडणूक लढविली होती. त्यावेळी आपण मुंबई अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. मात्र, अजित पवार यांनी तो स्वीकारला नव्हता, असा दावा माजी खासदार समीर भुजबळ यांनी केला. काल उपमुख्यमंत्री अजित पवार हे नाशिक दौऱ्यावर येणार होते. त्यांच्या स्वागताला समीर भुजबळ हे हेलिपॅडवर हजर होते. मात्र, अजित पवार यांचा दौरा हेलिकॉप्टरमध्ये बिघाड झाल्यामुळे दौरा रद्द झाला. यावेळी मीडियाशी बोलताना समीर भुजबळ यांनी आपण राष्ट्रवादीतच सक्रिय आहोत. आपण राजीनामा दिला होता. मात्र, तो स्वीकारलेला नाही. तसेच नांदगाव भयमुक्त करण्यासाठी निवडणूक लढविली. कांदे यांच्याकडून राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना त्रास सहन करावा लागला, असा आरोपही समीर भुजबळ यांनी केला.

> **आढावा बैठक रद्द**
>
> अजित पवार यांच्या उपस्थितीत काल राष्ट्रवादीची आढावा बैठक होणार होती. मात्र, ही बैठकही रद्द करण्यात आली.

# मनमाडला मालधक्क्याजवळ आग

## सुदैवाने जीवितहानी नाही

**मनमाड : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या मनमाड जंक्शन स्थानकाजवळ असलेल्या मालधक्क्याजवळ असलेल्या मोकळ्या मैदानात अचानकपणे आग लागली. या ठिकाणी वाळलेले गवत असल्याने आगीने अचानक रौद्र रूप धारण केले.

आग इतकी भयानक होती की, काही क्षणातच तिने सर्व परिसर घेरून घेतला. या आगीची माहिती मिळताच रेल्वे आरपीएफ आणि रेल्वेच्या इतर कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. मनमाड नगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन आग विझविण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले व आग आटोक्यात आणली.

याबाबत सविस्तर वृत्त असे, मनमाड शहरातील मनमाड रेल्वे स्थानकाजवळ मालधक्का आहे. या मालधक्क्याजवळच गाड्या क्लिनिंग आणि इंधन लोडिंग शेड आहेत. रविवारी दुपारी अचानकपणे मोठे आगीचे लोट दिसले. काही कळण्याच्या आतच आगीने रौद्र रुप धारण केले. यामुळे आजूबाजूला असलेल्या सर्व परिसरात मोठ्या प्रमाणावर आग पसरली. रेल्वेच्या अधिकारी वर्गाने तसेच आरपीएफने घटनास्थळी धाव घेतली. मनमाड नगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी येऊन आग नियंत्रणात आणली. यामुळे मोठा अनर्थ टळला. जर आग वेळीच थांबली नसती तर येथे असलेल्या इंधनाच्या डेपोला आग लागण्याची शक्यता होती. या आगीत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नसली तरी रेल्वेचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे. मालधक्क्याकडे रेल्वे स्टेशन परिसरात असणारे चरशी गर्दुल्ले नेहमी बसतात. कदाचित या लोकांकडून गांजा पीत असताना काडी पडून आग लागली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. रेल्वे आरपीएफ तपास करत असून, नेमकी आग लागली कशी, याचा शोध घेत आहे.



> **मालधक्का आणि देवीचा मंदिर परिसर बनला गुन्हेगारांचा अड्डा**
>
> मनमाड हे रेल्वेचे जंक्शन स्थानक असून, येथून मोठ्या प्रमाणावर रेल्वेच्या कार्गोमार्फत मालवाहतूक करण्यात येते. यासाठी रेल्वे स्टेशन परिसरात जवळच मालधक्का आहे. यापुढे लागलीच इंजिनिअरिंग कारखाना आहे. या परिसरात गोदावरी माता मंदिर देखील आहे. रेल्वे स्थानकावर राहणारे तसेच अनेक गुन्हेगारी पार्श्वभूमी असणारे अनेक नागरिक गांजा, दारू पिण्यासाठी या ठिकाणी येऊन थांबतात. मालधक्का व गोदावरी माता मंदिर परिसर हा गुन्हेगारांचा अड्डा बनला आहे. रेल्वे प्रशासनाने यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# लासलगाव व देवळा बाजार समित्यांना राजू शेट्टी यांची आज भेट

**लासलगाव : वार्ताहर**

कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते माजी खा. राजू शेट्टी हे जिल्हा दौऱ्यावर आहेत. आज दि. २१ एप्रिल रोजी राजू शेट्टी हे सकाळी दहा वाजता प्रमुख कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांसोबत लासलगाव बाजार समितीला भेट देऊन कांदा उत्पादक शेतकरी व व्यापारी बांधवांशी संवाद साधून घसरत्या कांद्याच्या भावासंदर्भात चर्चा करतील, तसेच दुपारी १२ वाजता देवळा बाजार समितीला भेट देऊन कसमादेमधील उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेणार आहेत.

तसेच कांद्याच्या निर्यातीसाठी केंद्र सरकारने प्रोत्साहन द्यावे, नाफेड आणि एनसीसीएफने थेट बाजार समितीच्या आवारातूनच खरेदी करावेत, कांद्याला किमान तीन हजार रुपये भाव मिळावा, तसेच एक एप्रिल २०२५ पासून विक्री होणाऱ्या कांद्याला राज्य सरकारने प्रतिक्विंटल पंधराशे रुपये अनुदान द्यावे इत्यादी मागण्यांसाठी सरकारवर दबाव वाढवण्यासाठी भविष्यात मोठे जनआंदोलन उभे करावे लागेल. त्या दृष्टीने जास्तीत जास्त कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष निवृती गारे पाटील, राज्य समन्वयक कुबेर जाधव, राजू शिरसाट, युवा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तुषार शिरसाट, स्वाभिमानी पक्षाचे युवा आघाडीचे अध्यक्ष कृष्णा घुमरे, निफाड तालुकाध्यक्ष गजानन आबा घोटेकर, सिन्नर तालुकाध्यक्ष आत्माराम पगार, येवला तालुका अध्यक्ष विलास दरगुडे, मच्छिंद्र जाधव, अशोक शेवाळे, प्रशांत पवार, रवींद्र शेवाळे यांनी केले आहे.

# एचएएल कामगार संघटनेत 'श्री जागृती'ची मुसंडी

## अध्यक्षपदी अनिल मंडलिक, सरचिटणीसपदी संजय कुटे; विरोधी पॅनलला तीन जागा

**ओझर : वार्ताहर**

संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून असलेल्या भारतीय संरक्षण विभागाचा पाठीचा कणा असलेल्या एचएएल कामगार संघटनेच्या ३१ जागेसाठी झालेल्या चुरशीच्या त्रैवार्षिक निवडणुकीत सत्ताधारी गटाच्या श्री आपला जागृती पॅनलने २८ जागांवर विजय मिळवित सत्ता पुन्हा आपल्या ताब्यात ठेवली. पॅनलचे नेते अनिल मंडलिक हे अध्यक्षपदी तर संजय कुटे सरचिटणीसपदी पुन्हा निवडून आले. विरोधी श्री श्रमशक्ती पॅनलला तीन जागांवर समाधान मानावे लागले.





निवडणुकीत सत्ताधारी गटाचे नेते विद्यमान सरचिटणीस संजय कुटे, अध्यक्ष अनिल मंडलिक यांच्या नेतृत्वाखालील श्री आपला जागृती पॅनल व विरोधी गटाचे नेते माजी सरचिटणीस सचिन ढोमसे व माजी सहचिटणीस गिरीश वलवे यांच्या नेतृत्वाखालील श्री श्रमशक्ती पॅनल यांच्यात समोरसमोर परंतु चुरशीची लढत झाली. कामगार संघटनेच्या अध्यक्षपद १ जागा, उपाध्यक्ष ४, सरचिटणीस १, सहचिटणीस ४, खजिनदारपद एक जागा व सदस्यपदाच्या २० जागा अशा एकूण ३१ जागांसाठी झालेल्या मैदानात २८१२ मतदारांपैकी २६२७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. मतदान ९३.४२ टक्के झाले होते. त्यासाठी काल झालेल्या मतमोजणीत श्री आपला जागृती पॅनलचे सरचिटणीसपदाचे उमेदवार संजय कुटे ( १४६४), श्री श्रमशक्ती पॅनलचे सचिन ढोमसे (११५२) मते मिळाली. अटीतटीच्या लढतीत संजय कुटे हे ३१२ मतांची आघाडी घेऊन दुसऱ्यांदा विजयी झाले. तसेच खजिनदारपदाचे उमेदवार प्रशांत आहेर (१३६९) विरुद्ध श्री श्रमशक्ती पॅनलचे अमोल जोशी (१२४५) यांना मते मिळाली. यामध्ये प्रशांत आहेर १२४ मतांची आघाडी घेत विजयी झाले. तसेच अध्यक्षपदासाठी श्री आपला जागृती पॅनलचे अनिल त्र्यंबक मंडलिक व गिरीश वलवे यांच्यात लढत झाली. यामध्ये अनिल मंडलिक यांना १५६० तर गिरीश वलवे १०५७ मते मिळाली. यामध्ये अनिल मंडलिक यांना ५०३ मतांनी विजयी घोषित करण्यात आले. त्यामुळे गेल्या १९८६ आणि १९९० साली तत्कालीन अध्यक्ष सुरेश देसले हे सलग दुसऱ्यांदा कामगार संघटनेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले होते. त्यानंतर जवळपास पस्तीस वर्षांनी अनिल मंडलिक सलग दुसऱ्यांदा कामगार संघटनेचे अध्यक्ष झाले आहे.विरोधी गटाचे श्री श्रमशक्ती पॅनलचे उपाध्यक्ष गणेश गवारे व सहचिटणीसपदी योगेश अहिरे विजयाचे दिशेने घोडदौड सुरू आहे. सुरुवातीला मतमोजणी सुरू झाल्यानंतर खजिनदारपदासाठी दोन्ही पॅनलच्या उमेदवारांमध्ये घासून रस्सीखेच बघायला मिळाली. **श्री आपला जागृती पॅनल विजयी उमेदवार-** उपाध्यक्षपदासाठी राकेश सुभाष गर्जे, आनंद हिरामण गांगुर्डे, प्रकाश छबू गभाले, प्रवीण तुकाराम गाढे, सहचिटणीसपदासाठी प्रतीक विजय गोळेसर, जितेंद्र दामोदर जाधव, रोशन उत्तमराव कदम, जगन्नाथ पांडुरंग खोले, कार्यकारिणी सदस्यपदासाठी रवी अशोकराव गरुड, अश्पाक हमीद बागवान, आशिष प्रमोद भागवत, नरेंद्र प्रकाश खैरनार, प्रभाकर रंगनाथ ढाकणे, त्र्यंबक सोमनाथ बहिरम, खुशाल निंबा जाधव, हेमंत रघुनाथ ठाकूर, मुकुंद निवृत्ती क्षीरसागर, उमेश रतन जाधव, ऋषिकेश सुरेश जाधव, सचिन यशवंत वारुळे, सौ. लिना विजयानंद सोनार, कमलाकर अशोक बनकर, सोमनाथ दत्तू जाधव, हितेश केशव गंगापूरकर, परिमल प्रमोद जोशी, प्रकाश रवींद्र पतके, विकास बाबाजी जाधव, श्रीकांत भाऊसाहेब घुले या उमेदवारांची विजयाकडे घोडदौड सुरू होती.

# कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात चार मराठी चित्रपट प्रदर्शित होणार

**मुंबई :**

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने फ्रान्समधील कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी तीन मराठी चित्रपटांची निवड करण्यात आली आहे. यात 'स्थळ', 'स्नो फ्लॉवर' आणि 'खालिद का शिवाजी' या तीन मराठी चित्रपटांचा समावेश आहे. तर 'जुनं फर्निचर' या चित्रपटाची विशेष निवड करण्यात आल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री अँड आशिष शेलार यांनी दादर येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली.

फ्रान्समध्ये येत्या १४ ते २२ मे २०२५ या कालावधीत कान चित्रपट महोत्सव संपन्न होणार आहे. कान या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदा चार मराठी चित्रपटांची एन्ट्री झाली आहे. महामंडळामार्फत सन २०१६ पासून कान महोत्सवातील फिल्म मार्केटमध्ये मराठी चित्रपट पाठवले जात आहेत. मराठी चित्रपट आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचावा आणि जागतिक सिनेप्रेमींना मराठी चित्रपटाची भूरळ पडावी, हा यामागचा हेतू आहे. या चित्रपट निवडीसाठी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने तज्ज्ञ परीक्षण समिती तयार केली होती. आदित्य सरपोतदार, निखिल महाजन, गणेश मतकरी, इरावती कर्णिक, अपूर्वा शालिग्राम यांचा यात समावेश होता.



# प्रभाग २४ मध्ये कॉँक्रीट रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन उत्साहात

**नाशिक : वार्ताहर**

जुने सिडको परिसरातील प्रभाग २४ मधील महत्त्वाच्या रस्त्यांचे कॉँक्रिटीकरण करण्याच्या कामाचे भूमिपूजन मोठ्या उत्साहात पार पडले.

या महत्त्वपूर्ण कामासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि ना. दादाजी भुसे यांच्या सहकार्याने तसेच महानगरप्रमुख व माजी नगरसेवक प्रवीण (बंटी) तिदमे यांनी या कामासाठी सातत्याने पाठपुरावा केला.

या अंतर्गत महाराणा प्रताप चौक, वीर सावरकर चौक, डॉ. वाडेकर समोर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बडदेनगर, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे उद्यान, पारख इलेक्ट्रॉनिक्स ते डेक्कन पेट्रोलपंप कॉर्नर या मार्गावरील डांबरी रस्त्यांचे कॉँक्रिटीकरण करण्यात येणार आहे.

तदमे यांच्या संकल्पनेतून या या मार्गाचे कॉँक्रिटीकरण व्हाइट टॉपिंग या आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने करण्यात येणार असून, नाशिक महापालिकेच्या क्षेत्रात या तंत्रज्ञानाचा प्रथमच वापर होत आहे. यामुळे केवळ रस्त्याचा खर्च कमी होणार नाही, तर भविष्यातील देखभालीसुद्धा सुलभ होणार आहे. खराब झालेल्या रस्त्याच्या विशिष्ट भागाची दुरुस्ती शक्य होणार असून, मनपाची मोठी आर्थिक बचत होणार आहे.

कार्यक्रमस्थळी संदीप वाघ, शेखर देशमुख, बाळा पाटील, पंकज बोरसे, लकी पटेल, अनिल रिकामे, हेमंत कोठारी देवेंद्र रहाणे, रवी जाधव, सुभाष लचके, महेश मटकर, संदीप भोसले, सचिन भोसले, पप्पू राख, चेतन चांदवडकर, पिंटू खालकर, मनोज खैरनार, संजय पवार, निलेश काळोगे, नीता थोरात, सुनीता गायकवाड, चौधरी काकू, शारदा परदेशी, तांबोळी वहिनी, प्रवीण अहिराव, मथुरे काका, हेमंत वैद्य, धनश्री नाना आदी स्थानिक नागरिक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समग्र शिक्षा अंतर्गत उर्वरित कर्मचाऱ्यांना सामावून घेण्याबाबत शिक्षणमंत्र्यांना निवेदन

**नाशिक : प्रतिनिधी**

समग्र शिक्षा अंतर्गत उर्वरित कर्मचाऱ्यांना सामावून घेण्याबाबत समग्र शिक्षा पदाधिकाऱ्यांनी शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांना निवेदन दिले.



समग्र शिक्षा अंतर्गत राज्यभरातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करावे, या न्याय मागणीसंदर्भात समग्र शिक्षा संघर्ष समितीने आझाद मैदान मुंबई येथे आमरण उपोषण व अन्नत्याग आंदोलन सुरू केले होते. या आंदोलनास राज्यभरातील सर्व शिक्षक आमदार, सन्माननीय आमदार व सर्व शिक्षक संघटनांचा पाठिंबा असल्याने आंदोलनाचे व्यापक स्वरूप लक्षात घेऊन व शासनाविषयी नकारात्मक संदेश जनमानसात जाऊ नये म्हणून शासनाने समग्र शिक्षा करार कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याकरिता ४ मार्च २०२५ रोजी अभ्यास समितीचे पुनर्गठन करणेबाबत शासन निर्णय निर्गमित केला होता.

शासन निर्णयानुसार तीन महिन्यात शासनास अहवाल सादर करण्याबाबत नमूद करण्यात आलेले होते मात्र अद्यापही या पुनर्गठीत समितीची एकही बैठक घेण्यात न आल्याने समग्र शिक्षा संघर्ष समितीच्या वतीने बैठकीच्या नियोजनाबाबत शासनाकडे वारंवार निवेदन देऊन मागणी केली आहे. या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी तीव्र आंदोलन केल्यावर मार्चच्या पहिल्या आठवड्यात शिक्षणमंत्र्यांच्या निर्देशानुसार शिक्षण विभागाने तेरा सदस्यांची समिती पुनर्गठीत केली ही समिती अभ्यास करून बैठकीत सविस्तर चर्चा करेल आणि अंतिम अहवाल शासनास सादर करणार आहे. या समितीत १३ सदस्यांपैकी शिक्षक आमदारांसह संघटनेच्या प्रतिनिधींचाही समावेश असेल मात्र या संदर्भातील फाईल शिक्षण विभागातून मुख्यमंत्री महोदय यांच्या कार्यालयाकडे ८ ते १० दिवसांपासून सादर करण्यात आलेली आहे. मात्र अद्यापही या विषयावर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी अद्याप ठोस निर्णय घेतलेला नाही असे संघटनेने म्हटले आहे. त्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती व अन्य सेवा शर्ती याचा अभ्यास होणार कधी आणि अहवाल सादर करणार कधी असा सवाल समग्र शिक्षा संघर्ष समितीचे राज्य अध्यक्ष योगिता बलाक्षे, राज्य सरचिटणीस पराग चाटोरीकर, यांनी उद्विग्नपणे आमच्या प्रतिनिधी समक्ष सादर केला तसेच दि.१९ रोजी राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भूसे यांची भेट घेवून निवेदन दिले. सदरील फाईलवर लवकर चर्चा होणे साठी मी स्वतःमाहिती घेत असल्याचे शिक्षणमंत्र्यांनी सांगितले. शिक्षण मंत्री दादाजी भूसे यांच्या भेटी प्रसंगी समग्र शिक्षा संघर्ष समिती महाराष्ट्र राज्यअध्यक्षा योगिता बलाक्षे, राज्य सरचिटणीस पराग चाटोरीकर, राज्य कार्याध्यक्ष सुनील दराडे नाशिक जिल्ह्यातील समग्र शिक्षा संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य सदस्य अनिता देशमुख, काशिनाथ लाडे, महानगरपालिका मालेगाव संपर्क प्रमुख आतिक शेख व कायदेशीर सल्लागार यशवंत रायसिंग हे उपस्थित होते.



# सोमाणी गार्डनचे लोकार्पण

**नाशिक : प्रतिनिधी**

परिसरातील नागरिकांसाठी एक नवे आकर्षण ठरलेल्या सोमाणी गार्डनचे नूतनीकरण झाला असून, त्याचा लोकार्पण सोहळा ज्येष्ठ समाजसेविका शकुंतला करवा यांच्या हस्ते पार पडला. आमदार ॲड. राहुल ढिकले यांच्या स्थानिक विकास निधीतून हे उद्यान नव्याने साकारले गेले असून, ते नागरिकांसाठी खुले करण्यात आले आहे. उद्घाटनप्रसंगी आमदार ॲड. राहुल ढिकले, माजी नगरसेवक रमेश धोंगडे, विशाल संगमनेर, अंबादास पगारे, माजी नगरसेविका मीरा हांडगे, ज्योती खोले, कोमल महरोलिया, अशोक तापडिया, शंकरराव मंडलीक, रणजितसिंग आनंद, शिवनारायण सोमाणी, अण्णा आढाव, किरण मइड, राम कदम, युनूस सैय्यद, मयुरी करवा, मंगेश मोरे, अशोक गवळी, कमलकिशोर करवा, किरण देशमुख, धिरज पाटील, रोहित पानसरे, मंगेश जानोरकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.सूत्रसंचालन राजेश आढाव यांनी केले.या प्रसंगी बोलताना आमदार ॲड. राहुल ढिकले म्हणाले, ''सोमाणी गार्डनमुळे नाशिकरोडच्या सौंदर्यात भर पडली आहे. येथे संगीतावर चालणारे कारंजे, खेळणी आणि हिरवळ यामुळे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आनंद मिळणार आहे. नूतनीकरणानंतर उद्यानात २६ फूट उंच डायनासोर, १५ फूट उंच हल्क, विविध प्राणी-पक्ष्यांच्या आकृती, रोषणाईने सजवलेली खेळणी आणि संगीतावर नृत्य करणारे कारंजे लावण्यात आले आहेत. अंगावर उसळणारे तुषार आणि हिरवाईने नटलेले हे उद्यान आता परिसरातील प्रमुख आकर्षण ठरत आहे.

# चालताना छत्रीचा धक्का लागल्याने गर्दुल्ल्याचा महिलेवर हल्ला

**मुंबई :** वरळी सीफेसजवळ एका गर्दुल्ल्याने महिलेवर प्राणघातक हल्ला केल्याची घटना उघडकीस आली. या घटनेत संबंधित महिला गंभीर झाली असून तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मुंबई क्राइम युनिट ३ ने आरोपीचा शोध घेऊन अवघ्या पाच तासांत त्याला अटक केली. ही घटना १९ एप्रिल रोजी दुपारी वरळी सी फेस येथील जेके कपूर चौकाजवळ घडली.सचिन भगवान अवसरमोल (वय, ३५), असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपी मूळचा संभाजीनगरातील चिकलठाणा परिसरातील रहिवाशी आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वरळी कोळीवाडा येथील रहिवासी अनिता पाटकर शनिवारी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास रस्त्याने चालत असताना वरळी सीफेसजवळ आरोपीला त्यांच्या छत्रीचा धक्का लागला. त्यानंतर संतापलेल्या आरोपीने अनिता यांच्यावर धारदार काचेच्या तुकड्याने हल्ला केला. या हल्ल्यात अनिता गंभीर जखमी झाल्या. या हल्ल्यानंतर महिलेला ताबडतोब केईएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. अनिता यांचा मुलगा संदीप बाळू पाटकर (वय,२०) याने संध्याकाळी या घटनेबाबत वरळी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. वरळी पोलिस ठाण्यात आआरोपीविरोधात भारतीय न्याय संहिताच्या कलम ११८(२) अंतर्गत एफआयआर दाखल करण्यात आला. त्यानंतर गुन्हे युनिट ३ ने घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तपासून वरळीतील प्रेम नगर येथून आरोपीला अटक केली आणि वरळी पोलिसांच्या स्वाधीन केले.


## गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

### पाहिजेत

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क : ९२७२०९१४२५**

--------------------

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क- ९८९००१३१३६**

--------------------

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. **८२३७३११२११**

--------------------

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

--------------------

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर ९८३४१०९३३७**

--------------------

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-९८६०१३६५३६**

### Name changed

My Old Name TABASSUM BANO AHMED SAHEB KOKNI has been changed to My New Name **TABASSUM AHMED SAHAB KOKNI** as per Aadhar Card.

--------------------

My Old Name AHMED RAZA KOKNI has been changed to My New Name **AHMED RAZA ABDUL KADIR KOKNI** as per Aadhar Card.

### जमीन विकणे आहे

मंजूर तालुका कोपरगाव, जिल्हा अहिल्यानगर येथे जमीन विक्री करणे आहे, शिर्डी-लासलगाव हायवेजवळ/गोदावरी गंगा नदीचे पासून १.५ किलो मीटर अंतरावर ८ एकर विहीर बागायती जमीन विक्री करणे आहे. गट नंबर २८४/२,३,४,५ शिर्डीपासून २८ किलोमीटर मागे. **संपर्क-८७८८०९२४१५**

### महिला व पुरूष पाहिजेत

Draftsman part time आटोक्याड नॉलेज-१, ऑफिस कामासाठी-४, कोर्ट व महापालिकेच्या कामासाठी-२, ड्रायव्हर-१, वकील पार्ट टाइम-१, अकाऊंटंट पार्ट टाइम-१, भटजी देवपूजा करण्यासाठी-१

**एन.एन.असोसिएटस्**, तिसरा मजला, आय.डी.बी.आय. बँकेच्यावर, साठे बाग, एम.जी. रोड, नाशिक. वेळ- सकाळी १२ ते ५. संपर्क- 8668862801

### विकणे आहे

शरदचंद्र पवार फ्रुट मार्केट यार्डच्यामागे, विबगोर शाळा रोड, नाशिक येथील 2BHK फर्निचरनी सुसज्ज फ्लॅट त्वरित विकणे आहे. **संपर्क- ७२०८४९८५२३**

--------------------क

पाथर्डी फाटा, ज्ञानेश्वरनगर, साईसंकल्प बिल्डींग फ्लॅट विकणे आहे. पहिला मजला **संपर्क: ९९७००३९०४६**

**जाहिरात छोटी; किमया मोठी !**


# रेल्वेत गुन्हेगारी करणाऱ्या सराईतांवर धडक कारवाई

**नागपूर :** रेल्वेत गुन्हेगारी करणाऱ्या ठिकठिकाणच्या सराईत गुन्हेगारांवर रेल्वेच्या पोलिस अधीक्षकांनी धडक कारवाईची मोहिम राबविली आहे. त्यानुसार गेल्या दोन आठवड्यात विदर्भातील १९ गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.रेल्वेत गुन्हेगारी करणारे काही विशिष्ट सराईत गुन्हेगार वारंवार ईकडे तिकडे फिरून गुन्हे करतात. त्यांना रेल्वेत गुन्हेगारी केल्यानंतर कुठून कुठे पळून जायचे, याची माहिती असते. त्यामुळे हे भामटे गुन्हे केल्यावर पोलिसांच्याही हाती लागत नाहीत. त्यामुळे बरेचदा पोलिसांच्या विरोधात जनमत तयार होते. अनेकदा कायदा आणि सुव्यवस्थेचाही प्रश्न निर्माण होतो. रेल्वेत गुन्हेगारी करणारांना पायबंद घालण्यासाठी संशयीत आणि सराईत गुन्हेगारांची कुंडली गोळा करण्याचे आदेश गेल्या दोन आठवड्यांपूर्वी पोलीस अधीक्षक पोलीस अधीक्षक, आयपीएस डॉ. प्रियंका नारनवरे यांनी सर्व रेल्वे पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांना दिली होती. त्यानुसार, वेगवेगळ्या पोलीस ठाण्यातून दोन डझनवर नावे पुढे आली. १९ गुन्हेगारांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर वेगवेगळ्या शहरातील रेल्वे पोलीस ठाण्यात कलम १२६,१२७ आणि १२९ भारतीय नागरीक सुरक्षा संहितेनुसार प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.


**जाहीर नोटीस** नि.०६ नुसार प्रोसेस जमा

**श्री. अविनाश बी. मोरे ॲडव्होकेट, सटाणा (नाशिक)**

**जा.क्र.९४५/२०२५ दि.१९/०४/२०२५ वारस प्रमाणपत्र अर्ज क्र.७७/२०२५**

**सटाणा येथील मा.सि.ज.ज्यु.डि.सो., यांचे कोर्टात**

**१. श्री. चंद्रकांत हिरामण दळवी**, वय-५९ वर्षे, धंदा-शेती, **२. श्रीमती संपुर्णाबाई हिरामण दळवी उर्फ संपुर्णाबाई किसन ईगळे**, वय-६४ वर्षे, धंदा-घरकाम, दोन्ही रा. द्वारा लोकेश बापू सोनवणे, निताणे मळ्यात, ता. बागलाण, जि. नाशिक ह.मु. फ्लॅट नं.१२०२, कृष्णा बिल्डींग, सम्राट वृंदावन, ओम नगर, आडगांव नाका, नाशिक, ता. जि. नाशिक

**अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही** **सा.वाला**

ज्याअर्थी प्रस्तुतचे अर्जातील अर्जदार नं. १ यांची आजी व अर्जदार नं. २ यांची **सासू सारजाबाई श्रीपत दळवी** ह्या अर्जदारांसोबत एकत्र कुटुंबियांसमवेत राहत असताना **दि.३०/०३/१९९०** रोजी नाशिक, ता. जि. नाशिक येथे मयत झालेल्या आहेत. तसेच मयत **सारजाबाई श्रीपत दळवी** यांचे पती व अर्जदार नं.१ यांचे आजोबा व अर्जदार नं. २ यांचे सासरे **श्रीपत महादू दळवी** हे देखील पूर्वीच मयत झालेले आहेत. तसेच मयत **सारजाबाई श्रीपत दळवी** यांचा एकुलता एक मुलगा, अर्जदार नं. १ यांचे वडिल व अर्जदार नं. २ यांचे पती नामे **हिरामण श्रीपत दळवी** हे अर्जदारांसोबत एकत्र कुटुंबियांसमवेत राहत असताना **दि. ०३/१२/२०१४** रोजी **मौजे धारणगांव**, ता. कोपरगांव, जि. अ.नगर येथे मयत झालेले आहेत. मयताचे पश्चात अर्ज कलम ३ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, यासाठी त्यांनी मे. कोर्टात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे लिगल हेअरशिप सर्टिफिकेट (वारस दाखला) मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस आहेत/नाहीत असे कोणाचे म्हणणे अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्धीनंतर **३०** दिवसांचे आत **दि.१०/६/२०२५** पावेतो स्वतः अगर वकिलांमार्फत न्यायालयात हजर राहून आपले लेखी म्हणणे दाखल करणे वरील मुदतीत कोणाचे काहीही म्हणणे न दाखल झाल्यास मे. न्यायालय योग्य तो पुरावा देवून पुढील आदेश करेल त्यानंतर कोणाचे काहीही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही. आज **दि. १९/०४/२०२५** माझे सही व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

शिक्का

**सही/- कामगिरी लिपिक** **सही/- सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, सटाणा, नाशिक** **दिवाणी न्यायालय, सटाणा,नाशिक**

---

**जाहीर नोटीस** नि.०६ नुसार प्रोसेस जमा

**श्री. चंद्रशेखर नरेश पवार, ॲडव्होकेट सटाणा, ता. सटाणा (नाशिक)**

**जा.क्र.९४६/२०२५ दि.१९/०४/२०२५ वारस प्रमाणपत्र अर्ज क्र.६८/२०२५**

**सटाणा येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ट स्तर यांचे न्यायालयात...**

**श्रीमती सारिका धिरज जाधव, वगैरे -४** **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणी नाही** **सामनेवाले**

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार नं. १ हिचे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडील व अर्जदार नं. ४ चा मुलगा मयत **धिरज सदानंद जाधव** हे **दि. १६/०४/२०२१** रोजी मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार १ ते ४ हे एकमेव कायदेशिर वारस असल्याचे कथन करुन मे. कोर्टाकडून लिगल हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी उपरोक्त प्रस्तुत अर्जातील अर्जदार १ ते ४ हे मयत **धिरज सदानंद जाधव** यांचे मृत्यूनंतर कायदेशिर वारस आहेत/नाहीत अशी कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाले पासून **३०** दिवसांचे आत अगर **दि.९/५/२०२५** रोजी स्वत: अगर वकिलांमार्फत हजर होऊन आपले लेखी म्हणणे दाखल करावे. वरिल मुदतीत कोणाची हरकत अगर तक्रार न आल्यास मे. कोर्ट अर्जदारांचा योग्य तो पुढील पुरावा घेऊन आदेश करेल व मग त्यानंतर कोणाचे काहीही म्हणणे ऐकले जाणार नाही. आज **दि. ८/४/२०२५** रोजी माझी सही व मे. कोर्टाचे शिक्क्यांनिशी प्रसिध्दीस दिली असे.

शिक्का

**सही/- कामगिरी लिपिक दिवाणी न्यायालय, क.स्तर सटाणा, जि. नाशिक** **सही/- सहाय्यक अधीक्षक दिवाणी न्यायालय, क.स्तर सटाणा, जि. नाशिक**

---

**जाहीर नोटीस** नि.०६ नुसार प्रोसेस जमा

**ॲड. रेखा महेंद्र शिंदे सटाणा, जि.नाशिक**

**जा.क्र.२४८/२०२५ दि.१९/०४/२०२५ वारस प्रमाणपत्र अर्ज क्र.६६/२०२५**

**सटाणा येथील मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात......**

**१) श्रीमती कमळाबाई दगा मोरे**, वय ७६ वर्षे रा. एकलहरे-जायखेडा, ता.बागलाण, जि.नाशिक, **२) सौ. साखरबाई काकाजी म्हसदे**, वय-५४ वर्षे, रा. श्रीपुरवडे, ता. बागलाण, जि.नाशिक, **३) सौ.भिमाबाई मुरलीधर धिवरे**, वय-५३ वर्षे, रा. एन. ४१ बी सीडी - २२/५, नवीन सिडको, शनि मंदिराजवळ, पंडीतनगर, नाशिक, **४) सौ. हिराबाई सुनिल खरे**, वय ४५ वर्षे, रा. श्रमिकनगर, हनुमान मंदिर, सातपूर, ता. जि.नाशिक, **५) सौ. रत्ना भारत केदारे**, वय ३८ वर्षे, रा. वडाळीभोई, राजवाडा, ता. चांदवड, जि.नाशिक **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** **सा.वाला**

ज्याअर्थी, प्रस्तुत अर्जातील अर्जदारनं. १ चे पती व अर्जदार नं. २ ते ५ यांचे वडील नामे **दगा नामदेव मोरे** हे **दिनांक २६/१०/२०२४** रोजी मयत झालेले असून त्यांचे मृत्यूनंतर अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे कथन करुन अर्जदारांनी मे. कोर्टाकडून लिगल हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी, प्रस्तुत अर्जातील अर्जदार हे मयत **दगा नामदेव मोरे** यांचे मृत्यूनंतर कायदेशीर वारस आहेत/नाहीत याबाबत कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्दीपासून **३०** दिवसांचे आत अगर **दिनांक १६/६/२०२५** रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर होऊन आपले लेखी म्हणणे दाखल करावे. वरील मुदतीत कोणाची हरकत अगर तक्रार न आल्यास मे. कोर्ट अर्जदाराचा योग्य तो पुढील पुरावा घेऊन आदेश करेल. मग त्यानंतर कोणाचे काहीही म्हणणे ऐकले जाणार नाही. आज **दिनांक ८/०४/२०२५** रोजी माझी सही व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

शिक्का

**सही/- कामगिरी लिपिक** **सही/- सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, सटाणा, नाशिक** **दिवाणी न्यायालय, सटाणा,नाशिक**

---

**जाहीर नोटीस** नि.०६ नुसार प्रोसेस जमा

**ॲड. रेखा महेंद्र शिंदे सटाणा, जि.नाशिक**

**जा.क्र.९४७/२०२५ दि.१९/०४/२०२५ वारस प्रमाणपत्र अर्ज क्र.६९/२०२५**

**सटाणा येथील मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात......**

**१) श्रीमती लताबाई भाऊसाहेब देवरे**, वय ६० वर्षे, **२) श्री. किशोर भाऊसाहेब देवरे**, वय-४१ वर्षे, **३) श्री. गिरीष भाऊसाहेब देवरे**, वय-३९ वर्षे, नं. १ धंदा- घरकाम,नं.२ धंदा - नोकरी, नं. ३ धंदा व्यापार, सर्व रा. खिरमाणी नं. २ व ३ ह.मु. नाशिक, ता. जि. नाशिक **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** **सा.वाला**

ज्याअर्थी प्रस्तुत अर्जातील अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडील नामे **भाऊसाहेब माणिक देवरे** हे **दिनांक ०४/१२/२०२४** रोजी मयत झालेले असून त्यांचे मृत्यूनंतर अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे कथन करुन अर्जदारांनी मे. कोर्टाकडून लिगल हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी, प्रस्तुत अर्जातील अर्जदार हे मयत **भाऊसाहेब माणिक देवरे** यांचे मृत्यूनंतर कायदेशीर वारस आहेत/ नाहीत याबाबत कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्दीपासून **३०** दिवसांचे आत अगर **दिनांक १६/६/२०२५** रोजी स्वत: अगर वकीलांमार्फत हजर होऊन आपले लेखी म्हणणे दाखल करावे. वरील मुदतीत कोणाची हरकत अगर तक्रार न आल्यास मे. कोर्ट अर्जदाराचा योग्य तो पुढील पुरावा घेऊन आदेश करेल. मग त्यानंतर कोणाचे काहीही म्हणणे ऐकले जाणार नाही. आज **दिनांक ८/०४/२०२५** रोजी माझी सही व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे. शिक्का

**सही/- कामगिरी लिपिक** **सही/- सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, सटाणा, नाशिक** **दिवाणी न्यायालय, सटाणा,नाशिक**

## महत्त्वाचे

### सेंट फिलोमिनात अग्निसुरक्षा सप्ताह साजरा



**नाशिकरोड :** शहरात अगर ग्रामीण भागात, जंगलात तप्त उन्हात अगर शॉर्टसर्किट, गॅस सिलिंडर आदी अनेक कारणांनी अचानकपणे आग लागते. अशावेळी अग्निशमन दलाची सर्वांनाच आठवण होते. या जवानांनी नुकताच अग्निसुरक्षा सप्ताह साजरा केला. यात इंडिया सिक्युरिटी व करन्सी नोट प्रेसमध्ये तैनात असलेल्या सीआयएसएफच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी परिसरातील शाळा, कॉलेजात जाऊन विद्यार्थ्यांना सखोल माहिती देत जनजागृती व सुरक्षा कशी करावी याबद्दल विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांसह माहिती दिली. येथील सेंट फिलोमिना कॉन्व्हेन्ट हायस्कूलमध्येही या अग्निशमन दलाच्या जवानांनी प्रात्यक्षिके करत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देत आग कशा प्रकारे विझविली जाते. त्यासाठी पाणी, फोम, गॅस यांचा वापर कसा आणि केव्हा केला जातो हे प्रात्यक्षिकांतून दाखविले. यात मुकेश चतुर्वेदी, सुधीरकुमार ओझा, संजय मोरे, रामदास रहाटे, सचिन सोमवंशी, भारत निकाळजे, ओ.पी. कुशवाह, एस. सिंघा, विजय कुमार आदींचा सहभाग होता. शाळेच्या मुख्याध्यापिका आसिस फर्नांडिस यांनी सर्व जवानांचे स्वागत केले. सीआयएसएफच्या अग्निशमन दलाने विद्यार्थ्यांसमोर प्रात्यक्षिके दाखवत उद्बोधक माहिती दिल्याबद्दल त्या सर्वांचा सन्मानही केला.

### अपघातामध्ये दुचाकीस्वार गंभीर जखमी

**सुरगाणा :** सुरगाणा तालुक्यातील जाहुले येथे एका वळत्या वळणावर चारचाकी तसेच दुचाकी वाहनाची समोरासमोर धडक झाल्याने दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असून, त्यास प्राथमिक उपचारासाठी बाऱ्हे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### गौण खनिज विरोधी पथकाची धडक



### कारवाई

**दिंडोरी :** दिंडोरी येथे २० रोजी पहाटे २ वाजता तहसील कार्यालय दिंडोरी येथील अनधिकृत गौण खनिज विरोधी पथकाने दिंडोरी येथील शासकीय गट क्रमांक ९०८/१ येथे अनधिकृत मुरूम उत्खनन व वाहतूक करताना जेसीबी व वाहन क्रमांक एम. एच. १५ सी.वी. ५६०१ वर कारवाई करून सदर वाहन हे तहसील कार्यालय, दिंडोरी येथे लावण्यात आले. हायवा ट्रक हे वाहन क्रमांक एम.एच. १५ एफ. व्ही. ८८७४ हे प्रांत कार्यालय दिंडोरी येथे लावण्यात आले आहे. पंचनामा करून अहवाल सादर करण्यात आला आहे. सदर शासकीय गटातून अनधिकृतपणे गौण खनिज उत्खनन होत असल्याबद्दल, अनेक तक्रारी यापूर्वी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने अचानकपणे गोपनीयरीत्या सदर कारवाई करण्यात आलेली असून, यापुढे अशीच गोपनीय कारवाईत सुरू ठेवण्यात येईल, असे तहसीलदार दिंडोरी यांनी सांगितले आहे.

### सोन्याच्या दागिन्यांची बसमध्ये चोरी

**चांदवड :** नाशिकहून चांदवडकडे बसने प्रवास करत असलेल्या एका सेवानिवृत्त वृद्धाचे अज्ञात चोरट्याने सुमारे ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लांबवले. ही घटना १७ एप्रिल रोजी सकाळी ९ ते साडेदहाच्या दरम्यान घडली. राजाराम बिडगर (वय ७२, मूळ रा. उसवाड, हल्ली रा. नवीन सिडको, नाशिक) हे कल्याण-मालेगाव बसमधून प्रवास करत होते. नाशिक ते चांदवडदरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांच्याजवळ असलेली २० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन, २० ग्रॅम वजनाचा नेकलेस आणि १० ग्रॅम वजनाची अंगठी असा एकूण ३९ हजार ३८६ रुपयांचा ऐवज चोरी केला. या चोरीबाबत चांदवड पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### शेतीच्या वादातून महिलेला मारहाण

**चांदवड :** तालुक्यातील आडगाव शिवारात शेती नांगरणीच्या कारणावरून एका महिलेला पाच जणांच्या गटाने मारहाण केल्याची घटना घडली आहे. या मारहाणीत महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत तुटून नुकसान झाले आहे. याप्रकरणी चांदवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, परिघा त्र्यंबक केदारे (रा. सिडको, नाशिक) या आडगाव शिवारातील गट नंबर ६२ मध्ये आपल्या शेतात नांगरणी करण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी भास्कर बकाजी यशवंते, महिला यशवंते, प्रकाश भास्कर यशवंते, अनिल भास्कर यशवंते आणि उमेश भास्कर यशवंते (सर्व रा. आडगावटप्पा, ता. चांदवड) यांनी त्यांना घेरले. या पाच जणांनी परिघा यांना पकडून ठेवले, तर त्यांच्या भाचीला चौघांनी मिळून मारहाण केली. या झटापटीत परिघा यांच्या गळ्यातील सोन्याची पोत तुटली, ज्यामुळे त्यांचे मोठे नुकसान झाले. या घटनेनंतर परिघा केदारे यांनी तत्काळ चांदवड पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी या प्रकरणी संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ए. जी. शिरसाठ करत आहेत.



### येवल्यात सकल हिंदू समाजातर्फे रास्ता रोको

**येवला :** गोरक्षकावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ येवला शहरात सकल हिंदू समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. दरम्यान, हल्लेखोरांवर चोवीस तासांत कारवाई करण्यात आली नाही तर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. शहरातील नांदगाव रोड परिसरात जनावराचे मांस असल्याची माहिती गोरक्षकांना मिळाली होती. दरम्यान, या गोरक्षकांनी संबंधित ठिकाणी जाऊन पाहणी करीत असताना त्यांच्यावर काही लोकांनी हल्ला करून गंभीर जखमी केले. सदर जखमी गोरक्षकावर शहरातील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहे. या हल्ल्याचा तीव्र निषेध करीत सकल हिंदू समाजाच्या वतीने शहरातील विंचूर रोड चौफुली येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.
दरम्यान, गोरक्षकावर झालेल्या हल्ल्याचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला असून, हल्लेखोरांवर कारवाई करण्यात यावी, या मागणीचे निवेदन पोलिसांना देण्यात आले.

### रस्ता दुरुस्तीची मागणी

**नाशिक :** पंचवटी भागातील राधानगरातील रस्त्याला प्रचंड खड्डे पडले आहेत. गॅस पाइपलाइनमुळे हा रस्ता खोदून ठेवला आहे. या रस्त्यावरून चालताना कुठला खड्डा वाचवायचा, असा प्रश्न वाहनधारकांना पडतो. मनपाने या रस्त्याची त्वरित डागडुजी करावी, अशी मागणी परिसरातील रहिवाशांनी केली आहे.

# लग्नघरी चोरट्यांची स्वारी; अडीच लाखांचे दागिने लंपास

## जेलरोड भागातील घटना

**सिडको/नाशिकरोड : विशेष प्रतिनिधी**



लग्नसमारंभ म्हटले की घरात वर्दळ, गडबड आणि गर्दी... पण याच गडबडीत अज्ञात चोरट्याने सोन्याच्या दागिन्यांनी भरलेली बॅग लंपास केल्याने कुटुंब आर्थिक आणि भावनिक कचाट्यात सापडले आहे. ही घटना नाशिकरोड जेलरोड परिसरातील ड्रीम रेसिडेन्सीमध्ये घडली आहे.

लग्नासाठी आलेल्या गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने सुमारे २ लाख ५५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लंपास केले. या प्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रियांका प्रथमेश हाडपे (वय २९, रा. मखमलाबाद, नाशिक) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्या दि. १६ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजता ते १८ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजेच्या दरम्यान नाशिकरोड येथील ड्रीम रेसिडेन्सी, बी विंग येथील फ्लॅट नंबर ८ मध्ये विवाह कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या. गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या कपाटातील बॅगमधून राणीहार (३८ ग्रॅम) अंदाजे किंमत १,००,०००/-, मंगळसूत्र (४७ ग्रॅम) अंदाजे किंमत १,३०,०००/-, कर्णफुले (६ ग्रॅम) - अंदाजे किंमत २५,०००/ असे एकूण अडीच लाख रुपयांचे सोन्याचे दागिने ठेवलेले पाकीट चोरट्यांनी कपाटातून लंपास केले. याप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास उपनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पवार आणि गोसावी करीत आहेत.

### आनंदनगरमध्ये घरफोडी

नाशिकरोडच्या आनंदनगर परिसरात भरदुपारी अज्ञात चोरट्यांनी धाडसी घरफोडी करत सोन्या-चांदीचे एकूण १ लाख ३० हजार रुपयांचे दागिने चोरट्यांनी लंपास केले आहे. या प्रकारामुळे परिसरात चिंता आणि असुरक्षिततेचं वातावरण निर्माण झाले.

फिर्यादी मनोज दौलत तेली (४१) हे आनंदनगरमधील ज्योत रेसिडेन्सीमध्ये राहतात. शनिवारी (दि. १९) दुपारी १.४५ ते ३ च्या दरम्यान त्यांच्या घरात कोणीही नसल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून कपाटात ठेवलेले सोन्याची दोन तोळे वजनाची सुमारे ८० हजार रुपयांची चेन, २ ग्रॅमचे ओम पान, दोन ग्रॅमचे सोन्याचे मणी, चांदीच्या तोरड्या असा एकूण १ लाख ३० हजार रुपयांच्या सोन्या-चांदीचा ऐवज चोरट्यांनी लांबविला. या प्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपनगर पोलीस करीत आहेत.

# डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे दीड वर्षाच्या चिमुकलीचा मृत्यू

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

अंबड परिसरातील चुंचाळे शिवार येथील घरकुल योजनेत राहणाऱ्या अमर संदीप कांबळे यांच्या अवघ्या दीड वर्षाची चिमुरडी माहेश्वरी अमर कांबळे हिचा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याने डॉक्टरांविरोधात अंबड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा सरकारी रुग्णालयातील जळीत वार्डातील ऑन ड्युटी डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे हा मृत्यू झाल्याचा ठपका चौकशी अहवालात ठेवण्यात आला आहे.

ही घटना दि. १४ जून २०२४ ते १६ जून २०२५ च्या दरम्यान घडली. माहेश्वरीच्या अंगावर गरम पाणी पडून छाती, पोट आणि हात भाजले होते. यानंतर तिला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयाच्या जळीत वार्डमध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र, संबंधित डॉक्टरांनी उपचारात हलगर्जी व निष्काळजीपणा दाखवल्याने तिचा मृत्यू झाला, असा आरोप तिचे वडील अमर कांबळे यांनी केला होता. या प्रकरणी जिल्हास्तर तज्ज्ञ समिती आणि जिल्हा शल्यचिकित्सक, नाशिक यांनी अहवाल सादर केला.

त्यात डॉक्टरांच्या हलगर्जीपणाचा मुद्दा समोर आला आहे. अधिक तपास चुंचाळे एमआयडीसी पोलिस चौकीचे पोलीस निरीक्षक मनोहर कारंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक दिलीप भंडे करीत आहेत.

# गणवेश नको, अरेरावी मात्र ठणठणीत

## निरीक्षकाला दमबाजीनंतर हवालदार निलंबित

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

गंगापूर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका पोलीस हवालदाराचा शिस्तभंगाच्या सीमेलाही ओलांडणारा प्रकार समोर आला आहे. विजय सुकदेव जाधव नावाच्या या हवालदाराने गणवेश न घालता कर्तव्यावर हजर राहण्याचा हट्ट कायम ठेवत थेट वरिष्ठ निरीक्षकाशी वाद घालून तुला कामाला लावतो, राजीनामा देतो, अशी थेट धमकी दिली! या प्रकाराची गंभीर दखल घेऊन संबंधित हवालदाराला निलंबित करण्यात आले आहे.

गंगापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक जवेंद्रसिंग राजपूत हे बंदोबस्ताच्या पार्श्वभूमीवर स्ट्रायकिंग फोर्स तयार करत होते. यावेळी हवालदार विजय जाधव साध्या पोशाखात आले. वारंवार सूचना देऊनही ते गणवेश घालत नसल्याने राजपूत यांनी विचारणा केली. मात्र, त्यावर जाधव यांनी चक्क वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना अरेरावीची भाषा वापरत थेट वरिष्ठांच्या कॅबिनमध्ये घुसून तुला माझ्या ड्रेसचे काय पडले आहे? मी तुला कामाला लावतो असे शब्द वापरले. हा सर्व प्रकार पोलीस ठाण्याच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे दिसून आला. त्यामुळे पोलीस आयुक्तांच्या आदेशानंतर उपायुक्त चंद्रकांत खांडवी यांनी तत्काळ निलंबनाचे आदेश दिले.

**'फ्रीस्टाइल' मारामारीनंतर पुन्हा जुने पोलीस ठाणे**

सरकारवाडा पोलीस ठाण्यात काही दिवसांपूर्वी सुधीर पाटील आणि मुकेश राजपूत या दोन अंमलदारांमध्ये हाणामारी झाली होती. त्यानंतर त्यांची बदली दंगल नियंत्रण पथकात करण्यात आली होती. मात्र, तात्पुरत्या बदल्यांवर स्थगिती मिळाल्यामुळे दोघांनी पुन्हा सरकारवाडा पोलीस ठाण्यात हजेरी लावली आहे.

### चाकूचा धाक दाखवून मोबाइल लांबविला

**सिडको :** अंबड परिसरातील रामकृष्ण नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर तीन अज्ञात तरुणांनी एका सायकलस्वार युवकाला चाकूचा धाक दाखवून त्याचा मोबाइल हिसकावून नेल्याची धक्कादायक घटना घडली.

या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी रोशन कृष्णाप्रसाद (वय २२, रा. राजवाडा, सातपूर, मुळगाव - सल्लागाव, नालंदा, बिहार) हे दि. १८ एप्रिल रोजी सायंकाळी ७:३० वाजता त्यांच्या मित्रांसोबत सायकलवरून रामकृष्ण नगरकडे जात असताना, एक्स्लो पॉईंटजवळील नाल्याच्या ठिकाणी पांढऱ्या रंगाच्या ॲक्टीवा (एमएच १५ एफएक्स ९११५) गाडीवरुन आलेल्या तीन अज्ञात तरुणांनी त्यांना अडवले.

त्यानंतर फिर्यादीच्या पोटावर चाकू लावून त्यांच्याकडील निळ्या रंगाचा मोबाईल अंदाजे किंमत रु. १०,००० असा जबरदस्तीने हिसकावून नेला.

# फ्रँचायझीच्या आमिषाने ५० लाखांची फसवणूक

## इंदिरानगरला गुन्हा दाखल

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

'कॉफी अँड मोअर' या नावाने पॅन इंडिया व ग्लोबल फ्रँचायझी देण्याचे आमिष दाखवून नाशिकमधील एका उद्योजकाची ५० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी रवींद्र मारूती फड (वय ३५, रा. काशिकोनगर, नाशिक) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, संशयित आरोपी सचिन सुरेश साळुंखे, श्वेता सचिन साळुंखे, कबीर उर्फ मयूर सुहास आव्हाड, सुहास धोंडीबा आव्हाड (सर्व रा. पिंपरी-चिंचवडमधील २४ के. ओपुला, पिंपळे निळख, जि. पुणे) यांनी ग्लोकल फूड वर्ल्डस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत गुंतवणुकीसाठी प्रवृत्त केले. तसेच फिर्यादी फड यांना कंपनीच्या खोट्या बातम्या आणि बनावट माहिती दाखवून २ कोटी २५ लाख रुपयांची गुंतवणूक करण्यास भाग पाडले गेले. त्यानंतर कोणतीही फ्रँचायझी न देता आणि परतावाही न देता सुमारे ५० लाख रुपयांचा अपहार करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी उपनिरीक्षक भूषण सोनार यांनी फिर्यादी फड यांनी दिलेल्या तक्रारीनुसार महाराष्ट्र ठेवीदारांच्या वित्तीय संस्थांमधील हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम १९९९ अंतर्गत गुन्हा दाखल केला. पुढील तपास इंदिरानगर पोलीस ठाण्याच्या महिला वरिष्ठ पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# नाशिक विभागीय शालेय जम्परोप स्पर्धा उत्साहात

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकच्या विभागीय क्रीडा संकुल, पंचवटी येथे दि. २० नाशिक विभागीय शालेय जम्प रोप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

नाशिक महानगरपालिका गट आणि नाशिक जिल्हा या गटातून सहभागी झालेल्या खेळाडूंनी खेळाचे प्रदर्शन करून आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

या स्पर्धेत ३० सेकंद स्पीड, डबल अंडर, तीन मिनिट इंडूरन्स, फ्रीस्टाइल आणि ३० सेकंद स्पीड रीले या प्रकारांचा समावेश होता. यामध्ये सर्व प्रकारात नाशिकच्या खेळाडूंनी सुंदर खेळ करून विजेतेपद मिळविले.

यामध्ये आराध्य काऱ्हेकर, राजुल लुंकड, समीक्षा डुकरे, अवनी कांबळे यांनी दोन प्रकारामध्ये सुवर्णपदके मिळवून ही स्पर्धा गाजवली. विजेत्या खेळाडूंची राज्य स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जिल्हा जम्परोप असोसिएशनचे सचिव विक्रम दुधारे, राष्ट्रीय प्रशिक्षक तन्मय कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा असोसिएशनच्या पंचांनी परिश्रम घेतले.

# महात्मा जोतिबा फुले विकास मंडळाच्या अध्यक्षपदी वसंत खैरनार

**नाशिक : प्रतिनिधी**

नुकत्याच संपन्न झालेल्या चुरशीच्या निवडणुकीत सेवाभावी संस्था म्हणून कार्यरत असलेल्या महात्मा जोतिबा फुले विकास मंडळ, गोविंदनगर येथे अध्यक्षपदी वसंत खैरनार (२५७ मते) निवडून आले.

प्रतिस्पर्धी शांताराम महाजन यांना (१८८ मते) पराभव पत्करावा लागला. तसेच उपाध्यक्षपदी श्यामराव मानकर (२४४ मते) तर प्रतिस्पर्धी प्रभाकर गवांदे यांना (१९९ मते) मिळाली. तसेच सचिवपदी श्रीराम जाधव (२८० मते) प्रतिस्पर्धी एखंडे यांना (१६५ मते) पराभव पत्करावा लागला तसेच सहसचिवपदी प्रदीप वाघ (२४२ मते) तर प्रतिस्पर्धी भिकन क्षीरसागर यांना (१९८ मते) मतांवर पराभव स्वीकारावा लागला. तसेच कोषाध्यक्षपदी भरत सावळे यांना (२६३ मते) तर प्रतिस्पर्धी पराभूत अशोक पाटील यांना १८० मते मिळाली. त्याचप्रमाणे कार्यकारिणी सदस्यपदी ज्ञानेश्वर घरटे, सौ. अनिता घरटे, महेश नंदन, राजेंद्र शिरवाडकर, सीताबाई पवार, के. पी. सोनवणे, साईदास पाटील, सुभाष पगारे, सौ. सोनाली नेरकर, दिलीप एस. पाटील हे विजयी झालेत. संस्थेच्या या पंचवार्षिक (२०२५-३०) निवडणुकीत वसंत खैरनार यांच्या राजा सगर समाज विकास पॅनलला १५ पैकी १३ जागांवर विजय मिळाला. तर प्रतिस्पर्धी शांताराम महाजन यांच्या पॅनलचे केवळ दोन जण निवडून आले. महात्मा जोतिबा फुले विकास मंडळ हे विद्यार्थी गुणगौरव व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करीत असते.

# विद्यालयाचे पटांगण की डम्पिंग ग्राउंड?

## जिजामाता शाळेजवळ घाणीचे साम्राज्य

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

सातपूर कॉलनी येथील जिजामाता विद्यालयाच्या पटांगण परिसरातील नागरिकांकडून दररोज मोठ्या प्रमाणात कचरा आणि घाण टाकली जात असल्याने हे पटांगण एखाद्या शिक्षण संस्थेचे आहे की खेडेगावातील उकिरड्याचे? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

दरम्यान, या ठिकाणी कचऱ्यातील प्लास्टिक, कागद आणि इतर घातक पदार्थ मोकाट जनावरांच्या पोटात जात असून, त्यामुळे या गोमातांचाही जीव धोक्यात आला आहे.

दररोज सकाळी व रात्रीच्या वेळी परिसतील नागरिक खरकटे, घाण व कचरा आणून या ठिकाणी टाकतात. त्यामुळे या ठिकाणी घाणीचा ढीग साचला आहे.

> कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या गोमातांचे रक्षण करणाऱ्यांनी या प्रकाराकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. कारण प्लास्टिक पोटात जाऊन होणारा मृत्यू कत्तलीसारखाच क्रूर आहे.
> **– गोकुळ भदाणे,** नागरिक

उन्हाळ्यात ही परिस्थिती आहे. पावसाळ्यात पावसाच्या पाण्याने घाण कुजून दुर्गंधी पसरण्याबरोबरच साथीच्या आजारांना निमंत्रण मिळणार असल्याचीही भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. विद्यार्थ्यांसाठी खेळाचे व व्यायामाचे ठिकाण असलेले हे पटांगण सध्या दुर्गंधीचे आणि अस्वच्छतेचे केंद्र ठरले आहे. संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरली असून, या समस्येकडे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे साफ दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे प्राणीमित्र आणि सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, घाण व कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर कारवाई करण्याबरोबरच गोमातेचे रक्षण करण्याची मागणी जोर धरत आहे.



> विद्यालयासारख्या पवित्र ठिकाणी कचरा टाकला जाणे हे केवळ अस्वच्छतेचा मुद्दा नाही, तर विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा, शिक्षणाच्या वातावरणाचा आणि जनावरांच्या जीविताचा देखील गंभीर प्रश्न आहे. 'गोमाता' म्हणून पूजल्या जाणाऱ्या जनावरांच्या मृत्यूमुळे धार्मिक आणि भावनिक संतापदेखील निर्माण होत आहे.
> **–शांताराम जमदाडे,** योगशिक्षक

# म्हसोबा महाराज यात्रोत्सवात भाविकांची गर्दी

**नाशिकरोड : वार्ताहर**

नाशिक-पुणे महामार्गावरील श्री पाच बंगला म्हसोबा महाराज देवस्थानची दोन दिवसांची यात्रा अतिशय उत्साहात पार पडली.

पहाटे ५ वाजता संदीप कदम, प्रियंका कदम यांनी मूर्तीवर दुग्धाभिषेक केला. मंत्रघोषात केलेल्या या अभिषेकाने परिसर मंगलमय झाला होता. म्हसोबाला यानिमित्ताने शेंदूर लेपण केल्याने व मूर्तीवर दागिन्यांचा साज चढविण्यात आला. ध्वजारोहण पहिलवान अशोक जाधव, हभप सुधाकर घोडके, ॲड. ज्ञानेश्वर डावखर यांच्या उपस्थितीत झाले. जय भवानी रोडवरील मळेकऱ्यांनी बैलगाड्या व टेम्पोमधून सवाद्य मिरवणुकीने मांडव डहाळे आणले होते. ज्ञानेश्वर जाचक, रानडे या गाडीवानांचे संगीता शिंदे, प्रियंका कदम यांनी औक्षण करून बैलांना पुरणपोळी दिली. देवस्थानचे अध्यक्ष दशरथ कदम यांनी या सर्वांचे भगवे फेटे बांधून स्वागत केले. जयाभाई कॉलनी रोडवर मिठाई, खेळणी आदी अनेक दुकानांची रेलचेल होती. सायंकाळी जय भवानी रोडपासून म्हसोबा मंदिरापर्यंत म्हसोबा महाराजांच्या प्रतिमेची सवाद्य मिरवणूकही काढण्यात आली. या रथाचे संदीप कदम, मनोज कदम, प्रियंका कदम, खंडेराव मेढे, डॉ. सोनिया कदम, मोनिया पाटील, सुनीता कदम आदींनी पूजा करत आरती केली. दिवसभरापासून रात्री उशिरापर्यंत भाविकांनी रांगा लावून दर्शन घेतले. दुपारी देवळाली गाव पंच कमिटीचे कार्याध्यक्ष बाळनाथ सरोदे यांनी दशरथ कदम यांचा सत्कारही केला. दुसऱ्या दिवशी सकाळी चिंचोली येथील गुरुदत्त मंडळाने गण, गवळण, पोवाडा सादर केला. वामनराव झाडे, शशिकांत सानप, दत्ता उगले, पंढरी लांडगे, निवृत्ती लांडगे, प्रकाश लांडगे, मनोहर सानप, या कलाकारांचा यात समावेश होता. त्र्यंबकराव गायकवाड, गिते मामा, आनंद कंपनीचे गुल्लूशेठ आनंद, शम्मीशेठ आनंद, किंतीशेठ आनंद या आनंद परिवारानेही दशरथ कदम यांचा फेटा बांधून सत्कार केला. सेवानिवृत्त तलाठी येवलेकर, संदीप कदम, मनोज कदम, खंडेराव मेढे यांनी त्यांना गौरविले. यावेळी बाळासाहेब वाघ, सुदाम राजोळे, विश्वास खांडरे, श्रीपाद खांडेकर, सुनील टिळे, रुंजाजी पाटोळे, अशोक डावखर, पोपटराव जाचक, रावसाहेब बागूलसह मळेकरी व नागरिक उपस्थित होते. तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.





# उद्योगांच्या सुरक्षेला प्राधान्य देणार

## पोलीस उपायुक्त मोनिका राऊत यांचे आश्वासन

**नाशिक :** सातपूर व अंबड औद्योगिक क्षेत्रात सध्या मोठ्या प्रमाणावर उद्योग सुरू असून, नव्या उद्योगांचीही स्थापना होण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. मुंबई व पुणे येथील उद्योजक आता नाशिककडे वळत असून, गुंतवणुकीच्या दृष्टीने नाशिक हेच पुढील महत्त्वाचे केंद्र ठरणार असून, मोठ्या प्रमाणावर रोजगार व आर्थिक संधी निर्माण होणार आहेत. त्या अनुषंगाने निमा अध्यक्ष आशिष नहार यांनी लक्ष वेधले व औद्योगिक क्षेत्राचा हा झपाट्याने होत असलेला विकास लक्षात घेता या भागातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावा, असे आवाहन केले. यासंदर्भात नाशिक इंडस्ट्रीज मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (निमा) च्या पदाधिकाऱ्यांनी नाशिक शहराच्या पोलीस उपायुक्त मोनिका राऊत यांची भेट घेऊन सविस्तर कायदा-सुव्यवस्थेच्या अनुषंगाने चर्चा केली. या चर्चे दरम्यान उपायुक्त मोनिका राऊत यांनी सांगितले की, उद्योजकांच्या सुरक्षेला पोलीस विभागातर्फे प्रथम प्राधान्य दिले जाईल. उद्योजकांनी जर काही अडचणी अथवा समस्या पोलीस विभागास कळवल्यास त्या तत्काळ सोडविल्या जातील. तसेच, कुठल्याही प्रकारचा त्रास उद्योजकांना होत असल्यास संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करावी व त्यास पोलीस विभाग तत्काळ कारवाई करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीस निमा अध्यक्ष आशिष नहार, सचिव राजेंद्र अहिरे आणि निमा बुलेटिनचे चेअरमन संजय राठी उपस्थित होते.

## महत्त्वाचे



### पाटणे सोसायटी चेअरमनपदी वसंत आहिरेंची बिनविरोध निवड

**नाशिक :** राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे यांच्या नेतृत्वाखाली पाटणे येथील सोसायटी चेअरमनपदी वसंत आहिरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. शेतकरी विकास पॅनलच्या संचालकपदासाठी १२ उमेदवार निवडणूक लढवीत होते. मात्र ही निवडणूक बिनविरोध करण्यात यश आले आहे. पाटणे वि.का. सोसायटीचे विद्यमान चेअरमन वसंत लक्ष्मण आहिरे यांची इतर मागासप्रवर्गातून बिनविरोध संचालक म्हणून निवड झाली असून, पाटणे विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित पाटणेच्या २०२५-२०३० या पंचवार्षिक निवडणुकीचे निवड निकालपत्र निवडणूक निर्णय अधिकारी स्वप्नील मोरे, संस्थेचे चेअरमन वसंत आहिरे यांच्याकडे सादर केले. संचालक रत्नकांत निकम, प्रदीप शेवाळे, सुधाकर आहिरे, नितीन खैरनार, सचिव सुरते आदी उपस्थित होते.

### पसंद अपनी अपनी मैफलीत श्रोते तल्लीन

**नाशिक :** श्रोत्यांच्या आवडीच्या हिंदी, मराठी गाण्यांनी मैफल सजविण्यात आली. सुरेल गाणी ऐकताना नाशिककर रसिक श्रोते तल्लीन झाले. टाळ्या व वन्स मोअर देत गायक कलाकारांना प्रोत्साहन दिले. ही दाद बघून कलाकारांनीही विविधरंगी दिलखुलास गाणी सादर केली. गायक संजय डेरे आणि अमर कुमार प्रस्तुत पसंद अपनी अपनी या सुरेल मैफलीचे काल रविवारी (दि.२०) आयोजन करण्यात आले. ही विनामूल्य मैफल परशुराम साईखेडकर नाट्यगृहात सायंकाळी ६ वाजता झाली. माजी महापौर यतीन वाघ, हरीशभाई ठक्कर, गायक, संगीतकार नंदकुमार देशपांडे, पत्रकार संजय देवधर, यू. बी. पवार, डॉ. शरद पाटील, डॉ. सदानंद नायक, माजी नगरसेवक संदीप लेनकर, कैलास शिंदे, उमेश वालझाडे आदी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. रितिका जगताप हिने भरतनाट्यम नृत्याद्वारे गणेशवंदना व सरस्वती आराधना सादर केली. गायक अजय पाटील, मनोहर देवरे, सुभाष ईसोकर तसेच गायिका स्मिता पांडे, डॉ. रेखा सोनवणे, नीता पवार, डॉ. अनिता पाटील, नेहा आहेर, गायत्री नायक आदी सुरेल कलाकारांनी रसिकांच्या पसंतीची गाणी सादर केली. अभिनेता मनोज कुमार यांच्या स्मरणार्थ मै ना भुलुंगा... या गाण्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सावन का महिना..., तुमसे मिलके..., एक मै और एक तू...,सागर किनारे...,जानेमन जानेमन..., प्रियतमा ओ प्रियतमा....मेहेबूब मेरे..., दिल तेरा दिवाना...या व अशा हिंदी गाण्यांना जबरदस्त दाद मिळाली.

### डोंगराळ परिसरात तोरणे बहरली

**दिंडोरी :** सुरगाणा, पेठ, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी या आदिवासी भागातील डोंगराळ परिसरात तोरणं फळे बहरली असून, ही फळे संकलन करण्यासाठी आदिवासी भटकंती करताना दिसत आहे. आदिवासी निसर्ग कवी काळूदास कनोजे यांच्या कवितेत उल्लेख असलेल्या जंगलातील तोरण फळांचे प्रत्यक्षात दर्शन डोंगराळातील झाडांवर घडत आहे. आदिवासी डोंगराळ भागात आजही जंगल क्षेत्र जास्त प्रमाणात असल्यामुळे वेगवेगळ्या वनस्पतींचे साम्राज्य पाहायला मिळत आहे. शिशिरात होणारी पानगळ थांबल्यानंतर डोंगराळ भागात उष्ण वातावरणात अनेक रानटी फळझाड बहरायला सुरुवात होते. वसंत ऋतूच्या आगमनात निसर्गाच्या सान्निध्यातील प्रसन्न वातावरणात तोरण हे जंगली वेलवर्गीय काटेरी फळझाड पांढऱ्या रंगाच्या लहान, लहान फळांनी बहरून गेलेली आहेत. यावर्षी अवकाळी पाऊस उशिरापर्यंत झाल्यामुळे फळझाड पांढऱ्या रंगाच्या रानफळांनी लवून आलेली दिसतात. तोरणीची फळ अगदी शेंगदाण्याच्या आकारासारखे लहान असतात, परंतु चवीला आंबट, गोड लागतात. आदिवासी भागात तोरणीच्या बिया भाजून खातात. तोरण हे वेलवर्गीय काटेरी फळझाड जंगलात अडचणीच्या ठिकाणी अळव, धामोडा, सादडा, असंद अशा दणकट झाडावर तोरणीच्या फांद्या पांगलेल्या असतात. तर कुठे स्वतंत्र वाढून फळांनी खाली वाकलेल्या असतात. अशावेळी जंगलातील खार, तितर, लावर, कोकतर अशा वेगवेगळ्या प्रजातींचे पक्षी फळे खाण्यासाठी झाडाच्या खालीवर गिरकी घेतात. शेतशिवारात काम करणारे शेतकरी हे तोरण फळ आवडीने खातात. रानात गुरं चरायला जाणारे गुराखी हे तोरणावर भूक भागवतात.




### कानडगाव शिवारात ५००० किलो मांस जप्त

**चांदवड :** तालुक्यातील कानडगाव शिवारात मनमाड-मालेगाव रोडवर चांदवड पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ५००० किलो गोवंश जातीच्या जनावरांचे मांस आणि मांस वाहतूक करणारा ट्रक जप्त केला आहे. या कारवाईत पोलिसांनी एकूण ६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, या प्रकरणी तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चांदवड पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती की, मनमाड-मालेगाव रोडवर एका ट्रकमधून (एमएच ४१ जी ९९९०) गोवंश जातीच्या जनावरांचे मांस बेकायदेशीरपणे विक्रीसाठी वाहतूक केले जात आहे. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार बी. व्ही. सांगळे आणि त्यांच्या पथकाने कानडगाव शिवारातील पाणपोई फाट्याजवळ सापळा रचला. शुक्रवारी पहाटे पोलिसांनी या वाहनाची तपासणी केली असता, ट्रकमध्ये १ लाख रुपये किमतीचे ५००० किलो गोवंश जातीचे मांस आढळून आले. पोलिसांनी मांस आणि ५ लाख रुपये किमतीचा ट्रक असा एकूण ६ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला. या संदर्भात पोलीस शिपाई सदानंद वानखडे यांनी चांदवड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनी या प्रकरणी आमीर खान अन्वर खान पठाण (वय ३३), रफीक शेख युसूफ शेख कुरेशी (३३) आणि फय्याज सय्यद हस्सू सय्यद (२३), सर्व रा. मालेगाव, यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

## निधन वार्ता

### सखूबाई गांगुर्डे



**सोग्रस :** सखूबाई बाबूराव गांगुर्डे (७४, रा. वडाळीभोई) यांचे निधन झाले. संजय गांगुर्डे, लताबाई मोरे, सत्यभामाबाई पवार, मंदाबाई मोरे, बायजाबाई वाघ यांच्या त्या मातोश्री आणि अर्चना जाधव, समाधान गांगुर्डे, आनंदा गांगुर्डे यांच्या त्या आजी होत.

### अयोध्याबाई जोशी



**वावी :** पाथरे येथील अयोध्याबाई बाळकिसन जोशी यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुले, ३ मुली, सुना, नातवंडे, पणती असा परिवार आहे. डॉ. अशोक जोशी व सामाजिक कार्यकर्ते संतोष जोशी यांच्या त्या मातोश्री होत.

# इगतपुरी तालुक्यात पिण्याच्या पाण्यासाठी महिलांची भटकंती

## पंचायत समितीच्या ढिसाळ कारभारामुळे नागरिक त्रस्त

**इगतपुरी : प्रतिनिधी**

पावसाचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या व धरणांचा तालुका असलेल्या या तालुक्याला उन्हाळ्याच्या एप्रिल महिन्यातच पिण्याच्या पाण्याचा भीषण टंचाईचा सामना करावा लागत प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे डोंगराळ व दुर्गम भागातील नागरिकांचे पाण्यासाठी तोंडचे 'पाणी' पळाले आहे.

प्रशासकराज असल्याने पंचायत समिती कार्यालयात सुरू असलेली मनमानी, ज्याला वेळ भेटेल त्याप्रमाणे येणारे अधिकारी यांच्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांचे हेलपाटे थांबता थांबेना. जि.प. सदस्य किंवा पंचायत समिती सदस्य नसल्याने समस्या सांगायच्या तरी कोणाकडे हाच प्रश्न निर्माण झाला आहे.

एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यातच पावसाळी हंगामातील पूर्ण क्षमतेने भरलेली सर्व धरणे काही महिन्यांतच साठा निम्म्यावर आल्याने तालुक्यातच नव्हे तर उत्तर महाराष्ट्रात पावसाळ्यात सर्वांत पहिले भरणारे धरण म्हणून ज्या भावली धरणाचे नाव प्राधान्याने घेतले जाते, त्याच धरणाचा जलसाठा झपाट्याने घटला असून, पुढे दोन महिने कसे जाणार याची चिंता शेतकरी वर्गात होत आहे.



तालुक्यातील मोठ्या धरण प्रकल्पांमध्येही या महिन्याभरात जलसाठा मोठ्या प्रमाणात घटला आहे. त्यात दारणा, कडवा, मुकणे, भाम या धरणांचा साठा कमालीचा घटला आहे तर भावली धरणात जेमतेम २८ टक्के पाणी शिल्लक राहिले आहे. या शिल्लक पाण्यात आगामी दोन महिन्यांचे नियोजन प्रशासनाला करावे लागणार आहे.

इगतपुरी तालुक्याची जीवनवाहिनी म्हणून समजल्या जाणाऱ्या भावली धरणात अवघा २८ टक्के जलसाठा शिल्लक राहिल्याचे चित्र आहे. तर पूर्व भागातील कडवा धरणात जेमतेम २० टक्के तर भाम धरणात जलसाठा २५ टक्केवर आला आहे. यावर्षी समाधानकारक पाऊस झाल्याने तालुक्यातील सर्वच धरणे ओव्हरफ्लो झाली होती. त्यात मराठवाडा येथील जायकवाडी धरणातही मोठ्या प्रमाणात जलसाठा होता. त्यामुळे तालुक्यातील धरणांत जलसाठा टिकून होता. मात्र, गेल्या काही दिवसांतच जलसाठ्यात घट होऊ लागली.

| तालुक्यातील धरणे | धरणातील जलसाठा |
|---|---|
| भावली | २८ टक्के |
| भाम | २५ टक्के |
| मुकणे | ४९ टक्के |
| वाकी | ४१ टक्के |
| कडवा | २० टक्के |
| दारणा | ४४ टक्के |

# आदिवासी महिलांची पाण्यासाठी भटकंतीची दखल

## सामाजिक संघटनेने मदत केल्याने सुटला पाण्याचा प्रश्न



**इगतपुरी : प्रतिनिधी**

इगतपुरी तालुक्यातील पावसाच्या माहेरघरीच मार्च, एप्रिल महिन्यातच पाणीटंचाईच्या तीव्र झळा बसत असून, हंडाभर पाण्यासाठी वाड्यापाड्यातील महिलांची भटकंती सुरू झाली आहे. तालुक्यातील आवळखेड ग्रामपंचायत हद्दीतील वाड्यावस्त्यांवर पाणीटंचाई निर्माण झाल्याच्या सोशल मीडियावर प्रसिद्ध झाल्या होत्या.

याची दखल मुंबई येथील मनसेचे पाणीदूत म्हणून ओळख असलेले डॉ. मनोज चव्हाण यांनी मनसेचे तालुकाप्रमुख रामदास आडोळे यांच्याशी संपर्क साधून या आदिवासी पाड्यांवर दिवसाआड टँकर सुरू करण्यात यावा, असा आदेश दिला होता.

या पार्श्वभूमीवर मनसेचे तालुकाप्रमुख रामदास आडोळे व पदाधिकारी यांनी या पाड्यावर भेट देऊन रविवार दि.२० पासून या आदिवासी पाड्यांवर दिवसाआड टँकरने पाणीपुरवठा सुरू केला. त्यामुळे या आदिवासी महिला बांधवांची घोटभर पाण्यासाठी होणारी पायपीट तात्पुरती थांबली आहे. या वाडीतील शालेय विद्यार्थिनी, महिला चिमुकल्यांची दऱ्याखोऱ्यांतून पायवाटेने पाण्यासाठी कसरत करावी लागत आहे.

शिकायच्या वयात चिमुकल्यांना पाणी भरावे लागत असून, तीन किलोमीटर खाली उतरून विहिरीतील गढूळ पाण्याने तहान भागवावी लागत आहे. त्यातच गावकऱ्यांनी विहिरीतील पाणी तपासले असता ते पिण्यायोग्य नसल्याचे समोर आले आहे. १० तारखेला टँकरचा प्रस्ताव देऊनही अजूनही टँकर सुरू झालेला नाही. पाण्याअभावी ग्रामस्थांना जनावरे विकण्याची वेळ तर दूषित पाण्यामुळे अनेकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दिवसाआड टँकर सुरू झाल्याने येथील महिलांनी त्यांचे आभार मानले आहे.

या स्तुत्य उपक्रमात मनसेचे ज्येष्ठ नेते दिनकर पाटील, रतनकुमार इचम, तालुकाप्रमुख रामदास आडोळे, अंकुश पवार, जिल्हा संघटक भागीरथ मराडे, उपतालुकाप्रमुख भोलेनाथ चव्हाण, वाहतूक तालुकाप्रमुख कृष्णा भगत, शत्रुघ्न भागडे, पिंटू चव्हाण, आत्माराम मते, रामदास चव्हाण, नागेश गायकर, गणेश मुसळे, युनूस रंगरेज, भरत लंगडे, विजय बोराडे आदी सहभागी झाले होते.

# कादवा गळीत हंगामाची सांगता

## ३,५२,५५७ लाख मे. टन ऊस गाळप

**दिंडोरी : तिनिधी**

कादवा सहकारी साखर कारखान्याने प्रतिकूल परिस्थिती असतानाही गळीत हंगामाची यशस्वी सांगता होत ३,५२,५५७ लाख मे.टन उसाचे गाळप करून सरासरी१२.१४ टक्के उतारा मिळवत ३,९३,५०० क्विटल साखर निर्मिती झाली आहे,

यंदा दुष्काळी स्थिती असल्याने उसाची उपलब्धता कमी असल्याने त्यातच ऊसतोड मजूर टंचाईने राज्यातील सर्वच कारखान्यांना अडचणींचा सामना करावा लागला आहे. कादवाने १३० दिवसांत गळीत हंगाम पूर्ण केला असून, गळीत हंगाम सांगता चेअरमन श्रीराम शेटे यांच्या हस्ते गव्हाणीत नारळ टाकून झाली. यावेळी बोलताना श्रीराम शेटे यांनी हंगाम यशस्वी केल्याबद्दल ऊस उत्पादक, कामगार, ऊसतोड कामगार, ऊस वाहतूकदार, मालपुरवठादार यांचे आभार मानत पुढील वर्षी जास्तीत जास्त गाळप करण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे सांगितले. इतर कारखान्यांनी गाळप क्षमता वाढवल्याने मोठ्या प्रमाणात ऊस पळवापळवी होत त्याचा फटका छोट्या कारखान्यांना बसत आहे. त्यामुळे कमी दिवसांत जास्त गाळप करण्यासाठी कादवाची गाळप क्षमता वाढवावी लागेल असे सांगितले. ऊस लागवड वाढविण्यासाठी दरवर्षीप्रमाणे उधारीने रासायनिक खते, इफको, १०:२६:२६ वाटप करण्यात येईल तरी शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त ऊस लागवड करावी व कादवाला ऊस पुरवठा करावा, असे आवाहन श्रीराम शेटे यांनी केले.

यावेळी युनियन अध्यक्ष भगवान जाधव यांची भाषणे झाली. यावेळी सर्व मुकादम यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्रभारी कार्यकारी संचालक विजय खालकर यांनी केले. यावेळी व्हा. चेअरमन शिवाजीराव बस्ते, सर्व संचालक मंडळ, सर्व विभागांचे खातेप्रमुख, कामगार उपस्थित होते. कारखान्यातर्फे सभासदांना सवलतीच्या दरात दिली जाणारी साखरेची अंतिम मुदत बुधवार ३० एप्रिल असून, त्यानंतर कोणतीही मुदत वाढ दिली जाणार नाही. कारखाना कार्यस्थळावरून घेऊन जाण्याचे आवाहन कादवा प्रशासनाने केले आहे.

# पोस्ट कार्डवर झळकली नैताळे येथील बारव

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

जागतिक वारसा दिनानिमित्ताने अमिताभ सिंग, मुख्य पोस्टमास्टर जनरल, महाराष्ट्र पोस्टल सर्कल यांनी महाराष्ट्रातील २ बारवांचे छायाचित्र प्रसिद्ध केले आहे. यासाठी नैताळे येथील ऐतिहासिक बारवाचा समावेश झाल्याने यानिमित्ताने नैताळे गावाला बहुमान मिळाला आहे.

नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील नैताळे गावातील ही बारव नंदा प्रकारची -आकाराची भव्य मोठ्या स्वरूपाची बारव आहे. बारवेत उतरण्यासाठी एकाच बाजूने प्रवेश आहे. बारवेत देवकोष्टे, कमानीयुक्त झरोके, विविध खोल्या असून, मराठा कालखंडातील स्थापत्यशैलीची आहे. या बारवेचे बांधकाम मल्हारी प्रतापी मल्हारराव होळकर यांचे सेवक गंगोबा चंद्रचूड यांनी शके १६६९ प्रभव नाम सवंत्सरात चैत्र शुद्ध प्रतिपदा गुढीपाडवा या दिवशी केले. मराठा विद्या प्रसारक समाज शरदचंद्रजी पवार कॉलेज ऑफ आर्किटेक्चर यांचे प्राचार्य डॉ. प्राजक्ता बस्ते मॅडम, प्रो. गीतांजली पाटील, प्रो. मेघा बुट्टे आणि प्रो. शर्मिष्ठा सुरजीवाले यांचा सहभाग होता आणि वारसाप्रेमी संजय बिरार सर या सर्वांनी बारवेपाशी जाऊन त्याचे दस्तऐवजीकरण केले आणि वारसाप्रेमीकरण सोनी यांनी ड्रोनवरून काढलेला फोटो.



### महाराष्ट्र बारव मोहिमेचे ध्येय

१) संशोधन आणि संवर्धनाच्या उद्देशाने भारतातील बारवाचा सर्वांत मोठा आणि विश्वासार्ह डेटाबेस तयार करणे. २) हजारो बारवचे गूगल मॅपिंग करणे. ३) बारवचे छायाचित्र / ड्रोन शॉट्स ४) पायऱ्यांच्या विहिरींचे स्थापत्य दस्तऐवजीकरण ५) श्रमदानातून बारव स्वच्छता मोहिमेचे आयोजन करणे आणि जतन-संवर्धन करणे. ६) ऐतिहासिक वारसा संवर्धन आणि पर्यटन विकास, ७) महाशिवरात्रीनिमित्ताने महाराष्ट्र बारव दीपोत्सव.

– **रोहन काळे** समन्वयक, महाराष्ट्र बारव मोहीम

महाराष्ट्र बारव मोहीम अंतर्गत लोकसहभागातून आतापर्यंत २०२९ बारव, पायऱ्यांच्या विहिरी, पुष्करणी, बावडी, कुंड, घोडेबाव, पोखरबाव यांचे गूगल मॅपवर मॅपिंग करण्यात आले आहे. महाराष्ट्रात चार प्रकारच्या बारव आहेत : नंदा बारव : १ बाजूने प्रवेशद्वार, भद्रा बारव : २ बाजूने प्रवेशद्वार, जया बारव : ३ बाजूने प्रवेशद्वार, विजया बारव : ४ बाजूंनी प्रवेशद्वार बारव या व्यापारी मार्गावर, घाटवाटामध्ये प्राचीन शिवमंदिराच्या परिसरात, गावातील ग्रामदैवत मंदिराच्या परिसरात, ज्योतिर्लिंग आणि अष्टविनायक मंदिराच्या परिसरात, जुन्या वाड्यात, समाधीच्या बाजूला, यात्रा मार्गावर, दुष्काळी भागात आणि कित्येक गावांत किमान एक बारव बांधल्या होत्या. या बारव चालुक्य, यादव, शिवकालीन अशा वेगवेगळ्या राजवटीमध्ये बांधल्या गेल्या आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी महाराष्ट्रभर भरपूर बारव बांधल्या आहेत.




# पाऱ्याची चाळिशी; आठवडे बाजारात शांतता

**लासलगाव : वार्ताहर**

लासलगाव शहरातील नागरिक वाढत्या उन्हामुळे भलतेच हैराण झाले आहेत. याचा परिणाम काल येथील रविवारच्या आठवडे बाजारावर सुद्धा दिसून आला. रविवारी पाऱ्याने चाळिशीचा टप्पा गाठल्यामुळे नेहमी गर्दीने भरून असलेल्या आठवडे बाजारात दुपारी १२ ते ४ वाजेच्या दरम्यान शुकशुकाट दिसून आला.

लासलगाव येथे दर रविवारी आठवडे बाजार भरतो. लासलगावसह परिसरातील अनेक गावांतील शेतकरी भाजीपाला व अन्य शेतमाल विक्री करण्यासाठी येथे येतात व तो भाजीपाला खरेदी करण्यासाठी ग्राहकही मोठ्या प्रमाणात येत असतात. परंतु आठ दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढ होत असल्याने नागरिक देखील घराच्या बाहेर पडण्याचे टाळत असून, याचा फटका रविवारी आठवडे बाजाराला बसला आहे.

शहरातील स्थानिक बाजारपेठेवरदेखील वाढत्या उन्हाचा परिणाम दिसून येत आहे. बाजारपेठेतील दैनंदिन उलाढाल ठप्प झाली आहे. उन्हाच्या या लाटेमुळे नेहमी गजबजून राहत असलेले छत्रपती शिवाजी महाराज चौक, बाजारपेठ, टिळक रोड, मेन रोड इत्यादी भागांत असलेल्या दुकानांत दुपारच्या वेळी शुकशुकाट दिसून येत आहे. तसेच सध्या लग्नसराई सुरू आहे. लग्नसमारंभाच्या उत्साहालादेखील उन्हाचे चटके बसत असल्यामुळे वऱ्हाडी मंडळींच्या अंगाची लाही लाही होत आहे. वाढत्या तापमानामुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत असल्याचे चित्र दिसत आहे. सकाळी दहानंतर घराबाहेर निघणे आणि उन्हाचा मारा सोसणे लासलगावकरांना त्रासदायक ठरते.



**लासलगाव : येथील रविवारच्या आठवडे बाजारात वाढत्या उन्हामुळे दिसत असलेला शुकशुकाट. (छाया : समीर पठाण)**

### कडक उन्हामुळे विहिरी आटल्या

एप्रिल महिन्यातच कडक उन्हामुळे अनेक भागात पाणीटंचाई निर्माण झाली आहे. शिवारातील विहिरींच्या पाण्याच्या पातळीत घट झाली आहे. उन्हामुळे शेतातील पिकांनासुद्धा मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज भासू लागली आहे. सकाळी पाणी भरूनही कडक उन्हामुळे सायंकाळी जमीन कोरडी दिसून येत आहे. तेव्हा पिके कशी जतन करावी, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.

ऊन जास्त असल्यामुळे येथील आठवडे बाजारात खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांवर परिणाम झाला आहे. आम्हाला सकाळी दहानंतर उन्हापासून संरक्षण करण्यासाठी कसरत करावी लागत आहे. उन्हामुळे विक्रीसाठी आणलेला भाजीपाला खराब होत असल्यामुळे मोठा आर्थिक फटका बसत आहे.

– **रोहित गांगुर्डे**
शेतकरी भाजीपाला विक्रेते

# वाकदची मुलगी थेट टोकियोच्या मेट्रो साइटवर; अंकिताची भरारी

**लासलगाव : वार्ताहर**

शेतकऱ्याच्या घरात जन्म, जि. प. शाळेत शिक्षण व थेट जपानच्या टोकियो शहरात मेट्रो प्रकल्पावर साइट इंजिनिअरची जबाबदारी ! लहानशा गावातून उंच भरारी घेणं हे स्वप्न वाटतं, पण ती भरारी खरंच घेणाऱ्या काही जिद्दी व्यक्ती असतात.

शिरवाडे वाकद येथील कु. अंकिता संतोष काकड हिची. आई -वडिलांना मुलगी पोलीस व्हावी असं वाटत होतं, पण अंकिताच्या मनात काहीतरी वेगळंच चाललं होतं. आपली ओळख आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण करायची. आणि तिने ते करूनही दाखवलं. आज ती जपानमधील टोकियो शहरात, मेट्रो रेल प्रकल्पावर साइट इंजिनिअर म्हणून जबाबदारी सांभाळणार आहे. वाकद गावातील जिल्हा परिषद शाळेतून शिक्षणाची सुरुवात, कोपरगावच्या संजीवनी महाविद्यालयातून स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगपर्यंतचा प्रवास आणि त्यातून थेट जपानमध्ये मोठ्या पदावर निवड. जगदीश शिंदे यांच्याकडून ऑनलाइन माध्यमातून जपानी भाषा आत्मसात करत, डॉ. ए. एस. सय्यद, अतुल मोकळ व सुधीर गायखे यांच्या मार्गदर्शनाखाली अंकिताने जपानी 'ओपन अप कन्स्ट्रक्शन' या नामांकित कंपनीत साइट इंजिनिअर म्हणून जागा मिळवली. मेट्रो प्रकल्पात काम करताना तिला राहण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था, वाहन आणि तब्बल १८ लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज मिळणार आहे.



माझ्या यशामध्ये कुटुंबाचं आणि शिक्षकांचं अनमोल योगदान आहे. कुटुंबाची साथ आणि शिक्षकांचं मार्गदर्शन यामुळेच मी आज इथे आहे. माझ्या पालकांना मी पोलिस व्हावं अशी इच्छा होती, मात्र ते प्रत्येक पावलावर माझ्या निर्णयांचा आदर करत मला ध्येय प्राप्त करण्यासाठी प्रेरणा देत होते. आवड असलेले ध्येय मोठे असले तरी ते साध्य करण्यासाठी जिद्द आणि मेहनत दोन्ही महत्त्वाचे आहेत. कोणत्याही परिस्थितीत हार मानू नका. आपल्या स्वप्नांच्या मागे जाण्याची क्षमता तुमच्यात आहे. केवळ विश्वास ठेवा आणि धैर्याने पुढे जा. – **अंकिता काकड**

गांवकरी



## महत्त्वाचे

### मुसळगाव शाळेचे नवोदय परीक्षेत यश

**सिन्नर :** जवाहर नवोदय प्रवेश परीक्षेचा नुकताच निकाल जाहीर करण्यात आला. नाशिक जिल्ह्यात परीक्षेत एकूण १५,४२० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ८० विद्यार्थ्यांची इयत्ता सहावीसाठी गुणवत्तेवर आधारित मेरिट लिस्ट प्रसिद्ध करण्यात आली. अभिमानाची गोष्ट म्हणजे या यादीत जिल्हा परिषद मुसळगाव शाळेचे विद्यार्थी आर्यन चतुर व श्लोक शिरसाट यांची खेडगाव, या. दिंडोरी येथील जवाहर नवोदय विद्यालयासाठी निवड झाली आहे. विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक विकास गुंजाळ, स्वाती येवले, जयश्री खर्जुल यांचे उत्तम मार्गदर्शन लाभले. शाळेच्या वेळेव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना जादा तास घेऊन केलेले मार्गदर्शन व विद्यार्थ्यांच्या बौद्धिक शिक्षणासोबत शारीरिक शिक्षणावरही विशेष भर देण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांना हे यश संपादन करता आले. विकास गुंजाळ यांच्या चुटकीसरशी आकडेमोड करत अगदी अवघडात अवघड गणित ट्रिक वापरून सोडविण्याच्या क्लृप्त्यामुळे सर्वच विद्यार्थ्यांना फायदा झाला. शाळेचा विद्यार्थी आर्यन चतुर यांने यावर्षी जिल्हा परिषद अध्यक्ष चषक स्पर्धेत मॅथ बी, सी. एस. हॅकथॉन यात अव्वल स्थान पटकावत जिल्हास्तरासाठी मजल मारली आहे. तसेच राज्यस्तरीय मंथन परीक्षेतही घवघवीत यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. श्लोक शिरसाट यानेही विविध स्पर्धांमध्ये उत्तम कामगिरी बजावली आहे. शाळेतील विविध स्पर्धांसाठी नेहमीच मुख्याध्यापिका रंजना भालेराव यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना व विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. गटशिक्षणाधिकारी राजेंद्र डामसे यांचेसह मुसळगावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, विस्ताराधिकारी मंजुषा साळुंखे, कैलास सांगळे , विजय बागुल, केंद्रप्रमुख हेमंत भुजबळ आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे अभिनंदन केले.






### दुसंगवाडीच्या विद्यार्थ्यांचे मंथन परीक्षेत यश

**वावी :** येथून जवळच असलेल्या दुसंगवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत उत्तुंग भरारी घेऊन गुणवत्ता यादीत यश संपादित केले आहे. सन २०२४-२०२५ या वर्षाची मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेची गुणवत्ता यादी शासनाने नुकतीच जाहीर केली. श्रद्धा भाऊपाटील मुंगसे (इयत्ता पहिली - राज्यात आठवी),सार्थक अण्णा देव्हाड (इयत्ता चौथी - राज्यात त्र्येपणावा),समृद्धी आण्णासाहेब दौंड(इयत्ता दुसरी - राज्यात एकोणतीसावी) आली आहे.यशस्वी विद्यार्थ्यांचा शाळेच्या मुख्याध्यापिका स्वाती घोडके, उपशिक्षिका जयश्री खैरनार यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. राज्यस्तरीय यशाबद्दल सर्वत्र शिक्षक व विध्यार्थी यांचे कौतुक होत आहे.



### चौथीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**ठाणगांव :** येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ नुकताच संपन्न झाला. कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक गायकवाड होते. वर्गशिक्षक रामदास सदगीर व समीर आरोटे यांनी मनोगत व्यक्त केले. गावातील प्रसिद्ध किराणा व्यावसायिक दीपक हनुमान बैरागी यांनी आपले वडील कै. हनुमान रघुनाथ बैरागी यांच्या स्मरणार्थ शाळेतील सर्व १ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांना स्नेहभोजन दिले. चौथीची विद्यार्थिनी कु. कार्तिकी सगर हिने सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक, बैरागी परिवार, शाळा व्यवस्थापन समिती व गावातील नागरिक यांनी परिश्रम घेतले.

### वावीला आजपासून श्री भैरवनाथ महाराज यात्रोत्सव

**वावी :** येथील ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज यांचा यात्रोत्सव



आज दि.२१ पासून सुरू होणार असून, दोन दिवस यात्रोत्सव चालणार आहे.गंगेच्या पाण्याची आज ९ वाजता कावड मिरवणूक गावातून निघणार आहे. त्यानंतर सकाळी ११ वाजता अभिषेक सत्यनारायण करून सायंकाळी ६ वाजता भव्य रथाची मिरवणूक निघून रात्री ९ वाजता शोभेची दारू उडवून होमहवन पूजा संपन्न होणार आहे. उद्या मंगळवार दि.२२ रोजी रात्री ८ वाजता महाप्रसादाचा कार्यक्रम होऊन नाथसागर मंडळाचा भजनाचा कार्यक्रम पार पडणार आहे. तरी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे.



### पाटोळे आरोग्यवर्धिनी केंद्रास साहित्य भेट

**सिन्नर :** तालुक्यातील पाटोळे येथील पाटोळे आरोग्य आरोग्यवर्धिनी केंद्रास मुख्यमंत्री यांच्या १०० दिवस कार्यक्रमांतर्गत सिन्नर येथील उत्साह फाउंडेशनच्या वतीने साहित्य रॅक, डॉ. अभिजित कांगणे नर्सिंग होम यांच्या वतीने पाणी जार, वनप्रस्थ फाउंडेशनच्या वतीने बर्ड फिडर, तसेच गोरख खताळे यांच्या वतीने शू रॅक आदी साहित्य भेट देण्यात आले. पाटोळे आरोग्यवर्धिनी केंद्र येथे झालेल्या एका छोटेखानी कार्यक्रमात उत्साह फाउंडेशनचे विकास बिन्नर यांच्या हस्ते नुकतेच हे साहित्य पाटोळे केंद्राच्या समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. वंदना खेडकर यांच्या स्वाधीन करण्यात आले. यावेळी आरोग्य सेविका जयश्री चव्हाणके, आरोग्यसेवक अभिजित देशमुख, मीना आंधळे, वैशाली साळवे आदी उपस्थित होते.

# पाडळीच्या जवानास पश्चिम बंगालमध्ये वीरमरण

## शासकीय इतमामात अंत्यसंस्कार, कोलकाता येथे सर्पदंशाने मृत्यू

**ठाणगाव : वार्ताहर**

**भारतीय सैन्यदलात पश्चिम बंगालमध्ये कोलकाता येथे कार्यरत असलेले सिन्नर तालुक्यातील पाडळी येथील जवान वाळीबा शांताराम रेवगडे (४०) यांना कर्तव्य बजावत असताना शुक्रवारी (दि. १८) वीरमरण आले. दोन-तीन दिवसांपूर्वी त्यांना सर्पदंश झाला होता, उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. शनिवारी (दि. १९) रात्री उशिरा शोकाकुल वातावरणात पाडळी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने रेवगडे कुटुंबासह अवघा गाव शोकसागरात बुडाला होता.**



जवान रेवगडे गेल्या २० वर्षांपासून भारतीय सैन्यदलात एनडीआरएफमध्ये कर्तव्य बजावत होते. त्यांनी यापूर्वी आसाम, त्रिपुरा, गुवाहाटी, लखनौ येथे देशसेवा बजावली. वाळीबा यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, आई-वडील, भाऊ, भावजई असा परिवार आहे.

शनिवारी जवान वाळीबा रेवगडे यांचे पार्थिव विशेष विमानाने कोलकाता येथून मुंबई व नंतर मुंबई येथून नाशिकला आणण्यात आले. देवळाली कॅम्प येथून लष्करी वाहनाने सायंकाळी ६.३० च्या सुमारास पार्थिव पाडळीत पोहोचले. पाडळी फाटा ते पाडळी गावापर्यंत शहीद जवान अमर रहे, भारत माता की जय, अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. पाडळी येथे पार्थिव पोहोचल्यानंतर रेवगडे कुटुंबीयांसह नातेवाइकांनी हंबरडा फोडला. उपस्थितांनाही अश्रू अनावर झाले.

अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी लष्करी जवानांनी बंदुकीच्या फैरी झाडून जवान वाळीबा रेवगडे यांना मानवंदना दिली.

खा. राजाभाऊ वाजे, पोलिस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्यासह वीरपत्नीने पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण केले.

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. भगीरथ शिंदे, तहसीलदारांच्या वतीने मंडल अधिकारी संदीप शिरोळे, तलाठी राहूल कालबोगवार, ठाणगावचे सरपंच नामदेव शिंदे, ग्रामसेवक प्रवीण शिंदे, पोलिसपाटील गणेश रेवगडे, चंद्रभान रेवगडे, भगीरथ रेवगडे, अशोक रेवगडे, सुभाष जाधव आदींसह मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

# शासनाकडून शेतकरी, कामगारांची फसवणूक

## सिन्नरला प्रहार जनशक्ती पक्षाची आढावा बैठक

**सिन्नर : प्रतिनिधी**

शासनाकडून राज्यातील शेतकऱ्यांची फसवणूक केली जात असून, राज्यकर्त्यांना त्यांनी दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती तालुकाध्यक्ष कैलास दातीर यांनी दिली.

सिन्नर तालुका प्रहार जनशक्ती पक्षाची आढावा बैठक नुकतीच संपन्न झाली. या बैठकीत शेतकरी कर्जमाफी, तालुक्यातील उपसा जलसिंचन योजनांची कर्जमाफी, कामगारांना रोजगार, पेन्शन, पक्षाची सभासद नोंदणी आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. विधानसभा निवडणुकीदरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र सत्ता मिळताच राज्यकर्त्यांना दिलेल्या आश्वासनांचा विसर पडला असून, अजितदादा पवार यांनी काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे शक्य नसल्याचे वक्तव्य केले. त्यामुळे राज्यभरातील शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण असून राज्यकर्त्यांना त्यांच्या आश्वसनांची जाणिव करुन देण्यासाठी तसेच शेतकरी व कामगारांच्या प्रश्नांवर आवाज उठविण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री बच्चू कडू ४ मे रोजी सिन्नर तालुका दौऱ्यावर येत आहेत. यावेळी कडू यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात येणार असून या आंदोलनासंदर्भात तयारी करण्यासाठी कोअर कमिटीची स्थापना बैठकीत करण्यात आली. बैठकीस तालुकाध्यक्ष कैलास दातीर, महिला तालुकाध्यक्ष पुष्पा भोसले, संपर्क प्रमुख सुनील जगताप, ॲड विलास खैरनार, युवा तालुकाध्यक्ष दत्तात्रय लोंढे, महिला शहराध्यक्ष संगीता आगळे, चंद्रकांत डावरे, शहर कार्याध्यक्ष गणेश थोरात, पांडुरंग आगळे, खंडेराव सांगळे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्टाइसमध्ये ५ लाख लिटर क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचा मार्ग मोकळा

## भुवनेश्वरच्या भारतीय प्रौद्योगिक संस्थानची प्रकल्प अहवालास मंजुरी

**सिन्नर : प्रतिनिधी**

सिन्नर तालुका औद्योगिक सहकारी वसाहत तथा स्टाइस संस्थेच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या सामान्य सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या (सीईटीपी) अहवालास भुवनेश्वर येथील भारतीय प्रौद्योगिक संस्थानची मंजुरी मिळाल्याने प्रकल्प उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे संस्थेच्या कार्यक्षेत्रातील रासायनिक कंपन्यांच्या दूषित पाण्यामुळे लगत शेतकऱ्यांच्या शेतीचे होणारे नुकसान थांबण्यास मदत होणार आहे.

स्टाईसमध्ये सद्या ३६२ उद्योग कार्यरत असून, त्यापैकी रासायनिक, औषध निर्माण आणि इंजिनिअरिंग अशा एकूण ९८ प्रक्रिया उद्योगांच्या उत्पादन प्रक्रियेतून बाहेर पडणाऱ्या रसायनयुक्त पाण्यामुळे संस्थेलगत असलेली शेतातील विहिरींचे पाणी प्रदूषित झाले आहे. हे पाणी पिण्यायोग्य नसून, शेतीसाठीही उपयुक्त नसल्याने परिसरातील शेतकऱ्यांच्या सातत्याने तक्रारी वाढत होत्या. त्याची दखल घेत स्टाईसने उद्योजकांशी चर्चा करुन प्रतिदिन ५ लाख लिटर क्षमतेचा २५.५२ कोटी अंदाजपत्रकीय किमतीचा सामान्य सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला आहे. सहकारी तत्वावरील औद्योगिक वसाहतीत



उभारला जाणारा हा राज्यातील पहिलाच प्रकल्प ठरणार असून, भविष्यातील औद्योगिक विकासास त्यामुळे हातभार लागणार आहे. या प्रकल्पाच्या प्रकल्प अहवालास भारतीय प्रौद्योगिक संस्थान, भुवनेश्वर यांनी गुरुवारी (दि.१७) मंजूरी दिल्याने प्रकल्पाकरीता आवश्यक असलेल्या सर्व शासकीय कार्यालयांकडील मंजुरी मिळविण्याचा मार्ग खुला झाला आहे.

प्रकल्प उभारणीसाठी संस्थेचे चेअरमन नामकर्ण आवारे, व्हा. चेअरमन अतुल अग्रवाल यांच्यासह सर्व संचालक तसेच सिन्नर एनव्हायरो फाऊंडेशनचे सदस्य प्रवीण गद्रे, नवनाथ निफाडे, महेंद्र परचुरे, पुष्कर सराफ परिश्रम घेत आहेत.

# कुमावत विकास सेवा संस्थेच्या अध्यक्षपदी प्रफुल्ल कुमावत यांची निवड

**सिन्नर : प्रतिनिधी**

कुमावत विकास सेवा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची शिर्डी येथे झालेल्या कार्यक्रमात सर्वानुमते निवड करण्यात आली. अध्यक्षपदी प्रफुल्ल कुमावत, नाशिकच्या सचिवपदी रवींद्र बैताडे, तर जिल्हानिहाय उपाध्यक्षांची निवड करण्यात आली.

साहेबराव कुमावत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात व्यासपिठावर उपजिल्हाधिकारी नितिन मुंडावरे, सहसचिव पंडीतराव कुमावत, झोन अध्यक्ष भाऊसाहेब परदेशी, महीला सचिव भारतीताई कुमावत आदी उपस्थित होते.

समाजात आपण कुठेही कमी पडता कामा नये. समाजातील प्रत्येक थरापर्यंत विकास संस्थेने पोहचले पाहिजे. समाजाला अशा संस्थांकडून अपेक्षा असतात, समाज उपयोगी कामे केली पाहीजे असे प्रतिपादन उपजिल्हाधिकारी नितिन मुंडावरे यांनी केले. सहसचिव पंडितराव कुमावत, झोन अध्यक्ष भाऊसाहेब परदेशी यांनी मनोगत व्यक्त करून नूतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. महीला सचिव भारती कुमावत यांच्या 'विवाहा पलीकडील सत्य 'पुस्तकाचे प्रकाशन मान्यवराच्या हस्ते करण्यात आले.

सुत्रसंचालन सचिव अशोकराव मोराडे यांनी केले. निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचे नाशिक जिल्हा कुमावत बेलदार समाज उन्नती मंडळ तसेच उन्नती मंडळ उपशाखा सिडको यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमास महाराष्ट्रातुन कुमावत विकास संस्थेचे आजी माजी पदाधिकारी, समाज बाधंव व महिला मोठ्या प्रमाणात हजर होते.

नवनिर्वाचित कार्यकारिणी- अध्यक्षपदी प्रफुल्ल कुमावत, नाशिकच्या सचिवपदी रवींद्र बैताडे, वरिष्ठ उपाध्यक्षपदी शिवाजीराव कारवाळ, संजय परदेशीर, उपाध्यक्षपदी नानाभाऊ कुमावत, लक्ष्मनराव कुमावत, सहसचिवपदी पंडितराव कुमावत, युवा अध्यक्ष स्वप्नील नाईक यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मावळते अध्यक्ष साहेबराव कुमावत, उपजिल्हाधिकारी नितीन मुंडावरे व मान्यवरांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

# भोकणीत प्रेमाच्या प्रतीकांची उभारणी

## तरुण, तरुणींसह ज्येष्ठांना सेल्फी पॉइंटची भुरळ

**भोकणी : नारायण आभाळे**

तालुक्यातील भोकणी ग्राम पंचायतीने माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत सरपंच अरुण वाघ यांच्या संकल्पनेतून ग्रामपंचायत कार्यालयासमोर असलेल्या ऑक्सिजन झोनमध्ये प्रेमाचं प्रतीक असलेल्या आय लव्ह भोकणी या चिन्हांची उभारणी केली आहे.

गावातील तरुणाईसह ज्येष्ठ नागरिक, महिला, तरुणी, सर्वांनाच या आय लव्ह भोकणी चिन्हाची भुरळ पडली आहे. प्रत्येकजन या चिन्हासोबत सेल्फी घेऊन आपल्या स्टेट्सला ठेवून, गावाविषयी असलेले प्रेम व्यक्त करताना दिसत आहे. हिरवाईने नटलेल्या भोकणी गावात पर्यटक, शासकीय अधिकारी, शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी भेट देण्यासाठी येत असतात. माझी वसुंधरा अभियानांतर्गत राबवलेल्या उपक्रमाची पहाणी केल्यानंतर, नैसर्गिक धबधबा, नक्षत्र वन, पक्षी उद्यानात सेल्फी घेण्याचा मोह उपस्थितांना होतो.

त्यामुळे येथील परिसर सेल्फी पॉइंट म्हणून नावारूपाला आलेला आहे. सेल्फी घेणे हा ट्रेड तरुणाईमध्ये कमालीचा वाढलेला आहे. गावातील तरुणांसह महिला, विद्यार्थी व जेष्ठ नागरिक यांना सेल्फीचा आनंद लुटता यावा




यासाठी सरपंच वाघ व ग्रासेवक योगेश राहाणे यांनी गावात वेगवेगळ्या ठिकाणी सेल्फी पॉइंट उभारले आहे. २०१२ मध्ये उभारण्यात आलेल्या ऑक्सिशन झोनमध्ये गावातील शेतकरी यांच्या मोडकळीस आलेल्या बैलगाडीचे चाके उपलब्ध केले. त्या चाकांना रंगरंगोटी करून लोखंडी ब्रेकेट बनवले व त्याचा उपयोग ज्येष्ठांना बसण्यासाठी होत आहे. त्याच ठिकाणी आय लव्ह यू भोकणी या चिन्हाचे लोखंडी सपोर्ट देऊन आय लव्ह भोकणी हा सेल्फी पॉईंट उभारला. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांची कन्या सीमंतिनी कोकाटे यांनी भोकणी गावास भेट देऊन कृषीनीती अंतर्गत माझी वसुंधरा अभियानाची माहिती जाणून घेतली.

# राष्ट्रीय प्रधान मुखीया सरपंच संघाच्या विभागीय अध्यक्षपदी सोनवणे

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील गोदे येथील सरपंच, सामाजिक व ग्रामविकास कार्यात सक्रिय असलेले दत्तात्रय बबन सोनवणे यांची राष्ट्रीय प्रधान मुखीया सरपंच संघाच्या उत्तर महाराष्ट्र नाशिक विभागीय अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. उत्तर महाराष्ट्रात नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव या जिल्ह्यांचा सम विश असलेला महत्त्वाचा विभाग असून, या भागातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामविकासासाठी कार्यरत असलेल्या प्रतिनिधींना संघटित करून त्यांच्या समस्या, मागण्या व प्रश्न राष्ट्रीय पातळीवर नेण्याचे मोठे दायित्व या पदासोबत येते. उत्तर महाराष्ट्रातील प्रत्येक सरपंचाचा आवाज संघटनेच्या माध्यमातून बुलंद करू. गावांचा सर्वांगीण विकास हा आमचा केंद्रबिंदू असेल अशी ग्वाही नवनियुक्त अध्यक्ष दत्तात्रय सोनवणे यांनी निवडीनंतर बोलताना दिली. या निवडीबाबत संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ठाकुर चंदन सिंग, राष्ट्रीय कार्याध्यक्ष आदित्य उपाध्याय, राष्ट्रीय उपाध्यक्ष राहुल उके, महासचिव मुकेश सकीया, सचिव रविंद्र यादव, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रमोद पांडुरंग सांगोले, कार्याध्यक्ष प्रा. अरुण देवडे, कोअर कमिटी सदस्य प्रेम साहू , प्रवक्ते जयराम गौरव, महेंद्र यादव, अर्पिता पांडा, ईश्वर साहू , पद्माकर मलीक, सुबत्ता सामंत, सुनिल पाटील यांनी सोनवणे यांचे अभिनंदन केले आहे.

# १५ कृत्रिम पाणवठ्यांवर जंगली जनावरांची भागवली जाते तहान

## ट्रॅप कॅमेऱ्यात बिबटे, हरीण, मोर, सायाळ यांच्या हालचाली कैद

**सिन्नर : भरत घोटेकर**

अल्प पर्जन्यमानामुळे यंदा तालुक्यात जलसंकट गडद झाले आहे. याच्या मानवासह वन्यप्राण्यांना झळा सोसाव्या लागत आहेत. ही बाब लक्षात घेता वनविभागाने तालुक्यातील वनपरिक्षेत्रांत वन्यप्राण्यांच्या तृष्णा-तृप्तीकरिता कृत्रिम १५ पाणवठ्यांची निर्मिती केली आहे. याशिवाय प्राण्यांच्या हालचालींवर वॉच ठेवण्याकरिता ट्रॅप कॅमेरे लावले आहेत.

तालुक्यात सुमारे १४ हजार हेक्टरवर वनक्षेत्र असून त्यात मोठ्या प्रमाणात वन्य प्राण्यांचा अधिवास आहे. दरवर्षी उन्हाळ्यात पाणी प्रश्न निर्माण होत असतो. यावेळीही वनविभागाच्या परिक्षेत्रात पाणीटंचाईने उग्र रूप धारण केले आहे. जंगल परिसरातील नदी-नाल्यांना कधीचीच कोरड पडली आहे. वनविभागाकडून साधारणत: मार्चच्या सुमारास कृत्रिम आणि नैसर्गिक पाणवठ्यांची निर्मिती केली जाते. वन्यप्राण्यांकरिता टाके, बशी टाके, नैसर्गिक झरा, तलाव आदी प्रकारचे पाणवठे असून वन्यप्राण्यांची तहान भागविण्यास उपयोगी ठरत आहेत. सिन्नर वनपरिक्षेत्रात माळेगांव, वडझिरे, पास्ते, पांगारवाडी, देशवंडी, दापूर, ठाणगाव, वडगाव पिंगळा परिसरात १५ पाणवठ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्येक वनपरिक्षेत्रात ट्रॅप कॅमेरे लावण्यात आले आहेत. या माध्यमातून वन्यप्राण्यांच्या सुरक्षेसोबतच हालचालींवर वनविभागाकडून विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. बशी सारख्या आकाराच्या पाणवठ्यांमध्ये चार ते पाच हजार लिटरचा टँकर पाणी मावते. वन्यप्राणी पाणी पिण्याबरोबरच त्याचे काही प्रमाणात कडक उन्हामुळे बाष्पीभवन होत असल्याने आठ - दहा दिवसात वनविभागाला टँकरच्या साह्याने हे पाणवठे पाण्याने भरावे लागत आहे.



पाणवठ्यांवर पाणी पिताना १) बिबट्या २) हरीण ३) मोर ४) सायाळ.

### बांध घालून नैसर्गिक स्त्रोतांना अडवले

पश्चिम भाग नाशिकचे उपवनसंरक्षक सिद्धेश सावर्डेकर, सहाय्यक वनसंरक्षक प्रशांत खैरनार, वनपरिक्षेत्राधिकारी हर्षल पारेकर यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक संजय गिते यांनी एप्रिल महिन्यात उन्हाचा पारा ४० अंशांच्या आसपास पोहोचत असताना सिन्नर तालुक्यातील देशवंडी नियत क्षेत्रातील वन्यप्राण्यांची तहान भागविण्यासाठी देशवंडी, वडझिरे, माळेगाव, पास्ते, पांगरवाडी वनक्षेत्रात तसेच परिसरात श्रमदानाने जमिनीतील जिवंत पाण्याचा स्त्रोत असलेल्या ठिकाणी वनराई बंधारे बांधून वन्यप्राण्यांना पिण्यासाठी पाणी अडवले आहे.

### आश्वास प्रतिष्ठानची मदत

माळेगाव, देशवंडी शिवारात वनरक्षक संजय गिते यांनी स्वखर्चातून प्लास्टिक टिपाडाच्या गव्हाणी जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी बनवल्या होत्या. मात्र त्या चोरी गेल्याने नाशिक रोड येथील आश्वास प्रतिष्ठानच्या वतीने १० सिमेंट गव्हाणी देण्यात आल्या. त्यात प्रत्येकी २०० लिटर पाणी सामावते. या गव्हाणी जंगली जनावरांची तहान भागवत आहेत. नैसर्गिक आणि कृत्रिम पाणवठे, सिमेंटच्या गव्हाणी येथे पाणी पिण्यासाठी येणारे बिबटे, मोर, हरीण, सायाळ आदी प्राणी ट्रॅप कॅमेऱ्यात कैद होत आहेत. पाणवठ्यांमधील पाणी पिऊन हे प्राणी तृप्त होत आहेत.

उन्हाळ्यात पाण्याच्या शोधार्थ वन्यप्राणी भटकंती करतात. बहुतांशवेळी गावाकडे धाव घेतात. याच दरम्यान जंगल परिसरातील नदी-नाल्यांना कोरड पडत असल्याने वन्यप्राण्यांकरिता कृत्रिम पाणवठे तयार केले जातात. मात्र, शिकाऱ्यांकडून धोका उद्भवू नये म्हणून पाणवठ्यात टाकल्या जाणार्या पाण्याची दर दोन दिवसांनी वनरक्षकाकडून लिटमस पेपरच्या माध्यमातून तपासणी केली जाते. पाण्याचा रंग बदलला म्हणजे ते विषारी झाल्याचे समजून पाणवठ्यातील पाणी बदलविले जाते. कर्मचार्यांकडून सातत्याने गस्त घातली जाते. वनपरिक्षेत्रातील संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून यावर विशेष लक्ष ठेवले जाते.



इगतपुरी तालुक्यात पिण्याच्या पाण्यासाठी महिलांची भटकंती
पान ५

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



पाऱ्याची चाळिशी; आठवडे बाजारात शांतता
नाशिक आज

■ gavakari.in ■ gavkarinews.com

■ नाशिक, सोमवार, दि. २१ एप्रिल २०२५

## महत्त्वाचे



### योग विद्या गुरुकुल कॅम्पसमध्ये विजन हॉस्पिटलतर्फे कार्यशाळा

**नाशिक : प्रतिनिधी**

विजन हॉस्पिटलच्या चॅरिटी फाउंडेशनतर्फे योग विद्या गुरुकुल कॅम्पसमध्ये तळवाडे, त्र्यंबक, नाशिक येथे सीपीआर कार्यशाळा घेण्यात आली. ६० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना कार्डिएक अरेस्ट रेसुसिटेशनचे प्रशिक्षण देण्यात आले. यापूर्वीही योग विद्या गुरुकुलच्या इतर शाखांमध्ये अनेक कार्यशाळा घेतल्या आहेत. ही कार्यशाळा डॉ. सृष्टी विक्रांत विजन आणि डॉ. विनोद विजन व त्यांचे हॉस्पिटल कर्मचारी यांनी एकत्रितपणे घेतली. आमचे अंतिम उद्दिष्ट नाशिकला हृदयसुरक्षित आणि हृदयदृढ बनवणे हे आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

### शांतीनगर परिसरात सोन्याची चेन खेचली

**पंचवटी :** मुलीची तब्येत बरी नसल्याने तिला दवाखान्यात तपासण्यासाठी घेऊन जात असताना मखमलाबाद रोडवरील शांतीनगर परिसरात दुचाकीवरून आलेल्यांनी सोन्याची चेन खेचून पोबारा केला. याबाबत अधिक माहिती अशी की, पूनम अमोल परदेशी (३५) गृहिणी, रा. समर्थ कॉलनी, शांतीनगर, मखमलाबाद या दि.१९ रोजी रात्री ८ वाजून १० मिनिटांनी मुलगी त्रिषा हिची तब्येत बरी नसल्याने तिला शांतीनगर स्टॉप परिसरातील एका दवाखान्यात उपचारासाठी राजकमल बंगल्याच्या बाजूने कन्हैया स्वीट दुकानाकडे जाणाऱ्या पायी जात असताना पाठीमागून शाईन मोटारसायकलवरून भरधाव वेगाने आलेल्या हिरव्या रंगाचा शर्ट व चष्मा घातलेल्या २५ ते २८ वर्षे वयोगटातील इसमाने ४० हजार रुपये किमतीची ९ ग्रॅम वजनाचे दोन शिंपले असलेली सोन्याची चेन खेचून पोबारा केला. याबाबत म्हसरूळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक अंकुश चिंतामण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक दीपक पटारे करीत आहेत.



## एसटी कार्यशाळेत भीषण आग

### आरटीओ विभागाने जप्त केलेली वाहने जळून खाक

**पंचवटी : वार्ताहर**

**पेठरोडवरील एसटी कार्यशाळेतील परिसरात रविवार दि.२० रोजी दुपारच्या सुमारास आग लागल्याने तब्बल नऊ रिक्षा व दोन चारचाकी अशी अकरा वाहने जळून खाक झाली. आग कशामुळे लागली हे कारण मात्र समजून आले नाही. शॉर्टसर्किट झाल्याने आग लागली असे बोलले जात आहे. घटनास्थळी पंचवटी अग्निशमन दलाच्या जवानांनी जाऊन दोन पाण्याच्या बंबांनी आग आटोक्यात आणल्याने मोठा अनर्थ टळला आहे.**

आगीच्या या घटनेत जळालेल्या नऊ रिक्षा, एक टेम्पो ट्रॅव्हलर आणि एक स्विफ्ट डिझायर अशी अकरा वाहने नाशिक आरटीओने विविध गुन्ह्यात जप्त केली होती असे समजते. याबाबत माहिती अशी, पेठरोड परिसरात एसटी कार्यशाळा असून, कार्यशाळेच्या मोकळ्या जागेत प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) जप्त केलेली वाहने एसटी वर्कशॉपच्या आवारात लावली जातात.

रविवारी दुपारी कार्यशाळेच्या आवारात गाजरगवतात उभ्या असलेल्या वाहनांच्या ठिकाणावरून अचानक धूर निघाला आणि झाडाचा पाचोळा पेटल्याने वाहने आगीच्या भक्ष्यस्थानी सापडली. सदर आग कार्यशाळेच्या कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास येताच त्यांनी अग्निशमन दलाला माहिती कळविली.

सदर घटनेनंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत दोन पाण्याच्या बंबांनी आग विझवली. पंचवटी अग्निशमन दल प्रभारी केंद्रप्रमुख संजय कानडे, संतोष मेहेंदरे, मनोहर गायकवाड, विजय शिंदे, विजय पाटील आदींनी प्रयत्न केले.



**मोठ्या प्रमाणात वाहने जळून खाक?**

प्रादेशिक परिवहन विभागाकडून वायुवेग पथकाकडून रस्त्यावर वाहनांची तपासणी केली जाते. यात कर थकवण्यात आलेली वाहने, नियमांचे उल्लंघन केलेले वाहन आदींचा समावेश असतो. तसेच मुदतबाह्य रिक्षा रस्त्यावर चालवताना आढळल्यास त्या रिक्षादेखील जमा केल्या जातात. अग्निशमन दलाकडून देण्यात आलेल्या आकड्यांपेक्षा जास्त वाहन जळून खाक झाल्याचे खात्रीलायक समजते. यात सर्वाधिक प्रमाण रिक्षांचे आहे.

## मनसेचे आज मनपासमोर घंटानाद आंदोलन

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक शहरातील विविध समस्यांसंदर्भात मनसे चांगलीच आक्रमक झाली असून, आज सोमवार दि.२१ रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत नाशिक महानगरपालिकेसमोर घंटानाद आंदोलन करणार आहे.

शहरात गोदावरी प्रदूषण, राज ठाकरे यांच्या संकल्पनेतून सीएसआर फंडातून साकारलेले प्रकल्प सुव्यवस्थित करून जनतेसाठी खुले करावेत. रस्त्यावरील खड्डे बुजवावेत. पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवावी, रस्ते, ड्रेनेज यांसारखे प्रश्न तत्काळ मार्गी लावावेत, सिंहस्थासाठी ५०० एकर जागा निश्चित करावी, सिंहस्थ कामास तत्काळ सुरुवात करण्यात यावी. आयटी पार्क प्रकल्पाला गती द्यावी. स्मार्ट सिटीच्या कामाची चौकशी करावी, रखडलेल्या पदोन्नती तत्काळ देण्यात याव्यात, सातपूर -अंबड औद्योगिक वसाहतीतील मूलभूत समस्या तत्काळ मार्गी लावाव्यात. सिंहस्थाची कामे स्थानिक भूमिपुत्रांना देण्यात यावी यांसह नाशिककरांच्या मूलभूत समस्या तत्काळ सोडवण्यात याव्यात यासाठी मनसेकडून घंटानाद आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात जनतेनेही सहभागी व्हावे, असे आवाहन मनसेचे प्रदेश सरचिटणीस दिनकर अण्णा पाटील, प्रदेश उपाध्यक्ष रतनकुमार इचम, प्रदेश उपाध्यक्ष सलीम मामा शेख, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, महिला प्रदेशाध्यक्ष सुजाता डेरे यांनी केले आहे.

## क्रीडा स्पर्धेत फायरमन विद्यार्थ्यांचा विजय

**नाशिक : प्रतिनिधी**

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या वतीने नाशिकरोड येथे क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. एकदिवसीय क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. संस्थेच्या वतीने नाशिकरोड येथील मुक्तिधाम येथे झालेल्या स्पर्धेत स्वच्छता निरीक्षक आणि फायरमनच्या विद्यार्थ्यांमध्ये क्रिकेट आणि कबड्डी या दोन विभागांत स्पर्धा रंगली. यात फायरमनच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली.

स्पर्धेचे उद्घाटन माजी नगरसेवक जगदीश पवार यांच्या हस्ते व क्रिकेटपटू आदित्य कपिले यांच्या उपस्थितीत झाले. स्पर्धेचा समारोप व बक्षीस वितरण सोहळा माजी नगरसेवक संभाजी मोरूस्कर यांच्या हस्ते व संस्थेचे विभागीय संचालक जीवन सोनवणे यांच्या उपस्थितीत झाला. मोरूस्कर यांनी खेळाडूंनी एकसंघपणे प्रदर्शन केल्यास यश नक्कीच मिळते. खेळाडूंनी कौशल्य टिकवून ठेवले पाहिजे. फायरमनच्या विद्यार्थ्यांना मजबूत आणि काटक राहावे लागते. आजच्या स्पर्धेत त्यांनी विजेता होऊन यश संपादन केल्याबाबत अभिनंदन केले. संयोजन फायर प्रशिक्षक अभिजित बनकर,आसावरी दातार यांनी केले. यावेळी प्राचार्य के. एम. सोनवणे, डॉ. दिलीप मेनकर, अक्षदा आहेर, दुर्गेश भामरे, विकास सोनवणे, रूपेश दाणी उपस्थित होते. प्रास्ताविक आणि आभार संस्थेचे संचालक जीवन सोनवणे यांनी मानले.

## विद्यार्थ्यांना दहावी, बारावीला क्रीडा क्षेत्राचे ग्रेस गुण मिळणार!

**नाशिक : प्रतिनिधी**

दहावी-बारावीच्या बोर्ड परीक्षेत विद्यार्थ्यांना राष्ट्रीय, राज्य, विभाग आणि जिल्हा पातळीवर क्रीडा प्रकारात यश मिळविल्यानंतर त्यांना ग्रेस गुण दिले जातात. यासाठी दि. १७ एप्रिलपर्यंत ऑनलाइन अर्ज करण्याची अंतिम मुदत होती. यापुढील प्रक्रियेत जे अर्ज नियमानुसार मंजूर होतील, त्यांना ग्रेस गुणांचा लाभ मिळणार आहे. आज २१ तारखेपर्यंत अर्ज प्रक्रिया सुरूच राहणार आहे.

या विद्यार्थ्यांपैकी जे खेळाडू आहेत, त्यांना ग्रेस गुण मिळतात. त्यासाठी संबंधित खेळाडूंकडून अर्ज मागविण्यात आले होते. याची मुदत गुरुवारी (दि. १७) संपली होती. क्रीडा ग्रेस गुणांचे प्रस्ताव प्रतिवर्षी ऑफलाइन पद्धतीने मागविले जायचे. त्या माहितीचे संकलन करून क्रीडा अधिकारी कार्यालयाद्वारे हे गुण माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळास पाठविले जायचे. मात्र, सन २०२४-२५ पासून ग्रेस गुणांसाठी केली जाणारी प्रक्रिया शासनाच्या आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाइन करण्यात आली आहे.

> शासनाने ग्रेस गुणांसाठी ऑनलाइन प्रक्रिया राबविल्यामुळे खेळाडू विद्यार्थ्यांचा वेळ व पैसा वाचला. त्यांना सोयीच्या ठिकाणाहून अर्ज भरता आले, ही प्रक्रिया झटपट झाली.
>
> – **सुनंदा पाटील,** जिल्हा क्रीडा अधिकारी

**किती अर्ज दाखल?...**

नाशिक जिल्ह्यातून तीन हजारपेक्षा अधिक अर्ज दाखल झाले आहेत. यापैकी किती मंजूर व नामंजूर याची माहिती येत्या आठवड्यात कळू शकेल. त्यांचे प्रस्ताव पाठविण्याचे कार्य सुरू आहे. शिक्षण मंडळाकडे पोर्टलद्वारे अर्ज पोर्टलच्या माध्यमातून सर्व अर्ज ऑनलाइन प्रणालीद्वारे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळास सादर करण्याची सुविधा निर्माण करून देण्यात आली आहे.

## १,३८७ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी आज सोडत

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ८१० आणि अनुसूचित क्षेत्रातील ५७७ अशा एकूण १,३८७ ग्रामपंचायत सरपंचपदाच्या सोडतीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, त्यातच महिला सरपंचपदाचेही आरक्षण काढले जाणार आहे. प्रथम एकत्रित आरक्षण आज २१ रोजी काढल्यानंतर २३ आणि २४ रोजी तालुकानिहाय महिला आरक्षण जाहीर करण्यात येणार आहे.

एकूण २०२ बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीकरिता सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी प्रवर्गनिहाय सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे त्या जागा सोडून जिल्ह्यातील इतर जागांसाठी आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. अशा सुमारे १,३८७ जागा असून, त्यांची सोडत २१ एप्रिल रोजी काढण्यात येईल. त्यानंतर महिला आरक्षण सोडत २३ व २४ एप्रिल रोजी काढली जाईल. त्यामध्ये ७०४ जागा महिला सरपंचपदासाठी राखीव आहे. जिल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ८१० ग्रामपंचायती आहेत. त्यापैकी ४१४ महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींची संख्या ५७७ असून, त्यापैकी २९० जागा महिलांसाठी राखीव आहेत.

सोमवार दि. २१ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता प्रत्येक तालुक्यात आरक्षण सोडत सभा तहसील कार्यालयात होणार आहे. तहसीलदारांच्या उपस्थितीत इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, कळवण, चांदवड, दिंडोरी, नाशिक, निफाड, बागलाण, मालेगाव, येवला या तालुक्यांत महिला आरक्षण सोडत सभा २३ एप्रिल रोजी १२ वाजता होणार असून, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, कळवण, चांदवड, निफाड, येवला येथे दि. २४ रोजी महिला आरक्षण सोडत होणार आहे.

| बिगर अनुसूचित क्षेत्राबाहेरील जागा | |
|---|---|
| अनुसूचित जाती | ५४ |
| अनुसूचित जमाती | १०७ |
| नागरिकांचा मागास प्रवर्ग | २१८ |
| सर्वसाधारण प्रवर्ग | ४३१ |
| एकूण जागा | ८१० |
| अनुसूचित जमाती आरक्षण एकूण जागा | ५७७ |
| महिला आरक्षण | २९० |

## सिटीलिंक कर्मचाऱ्यांचे आंदोलन मागे

**नाशिक : प्रतिनिधी**



तीन दिवसांपासून सिटीलिंक कर्मचारी आणि सिटीलिंक महिला बसचालक मीना लांडगे यांचे सुरू असलेले बेमुदत धरणे आंदोलन चौथ्या दिवशी सिटीलिंक महाव्यवस्थापक यांच्याशी झालेल्या बैठकीत मागण्या मान्य झाल्याने अखेर मागे घेण्यात आले.

सीटूचे पदाधिकारी तथा माकप नेते माजी नगरसेवक तानाजी जायभावे यांच्यासह सीटू प्रतिनिधी कॉ. राहुल गायकवाड आणि सिटीलिंक महाव्यवस्थापक मिलिंद बंड, याचबरोबर कामगार प्रतिनिधी या सर्वांची दि.१९ रोजी दुपारी झालेल्या बैठकीमध्ये सिटीलिंक महाव्यवस्थापक यांच्याकडून असे आश्वाासित करण्यात आले की, कुठल्याही कर्मचाऱ्याकडून राजीनामा घेतला जाणार नाही. त्याचबरोबर रु.२५ हजारांचे डिपॉझिटदेखील घेतले जाणार नाही. कोऱ्या बॉण्ड पेपरवर कोणाच्याही सह्या घेतल्या जाणार नाहीत. तसेच पुढील तीन दिवसांत ड्युटी बंद असलेल्या कर्मचाऱ्यांची पुन्हा ड्युटी सुरू करण्यात येईल. याचबरोबर सिटीलिंक महिला चालक मीना भगवान लांडगे यांची ड्युटीदेखील नाशिक रोड डेपोमध्ये चर्चा करून येत्या आठ दिवसांत सुरू करण्यात येईल, असे आश्वासित करण्यात आले आहे. या निर्णयाने कर्मचाऱ्यांचे समाधान झाल्यामुळे नाशिक वर्कर्स युनियन (सीटू संलग्न) यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेले बेमुदत धरणे आंदोलन कर्मचाऱ्यांनी अखेर एकमताने मागे घेतले. या आंदोलनाला विशेष मार्गदर्शन युनियनचे अध्यक्ष डॉ. डी.एल. कराड, जिल्हाध्यक्ष सीताराम ठोंबरे, देवीदास आडोळे, तुकाराम सोनजे, संतोष काकडे, संतोष कुलकर्णी, शहापुरे यांनी केले.

## मुख्यमंत्री घेणार सिंहस्थाच्या तयारीचा आढावा

### आज मंत्रालयात बैठक; रिंगरोड कामाचे सादरीकरण

**नाशिक : प्रतिनिधी**

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सिंहस्थात महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या रिंगरोडच्या कामाचे सादरीकरण सोमवार दि.२१ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर संबंधित विभागाकडून करण्यात येणार आहे. या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा आणि मनपा आयुक्त मनीषा खत्री उपस्थित राहणार आहेत.

नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. सिंहस्थाच्या नियोजनासाठी बैठका घेण्यात येत आहेत. मात्र, अंतिम आराखड्याला मंजुरी मिळत नसल्याने सिंहस्थाची कामे प्रत्यक्षात सुरू होण्यास विलंब होत आहेत. त्यातच सर्वाधिक वेळ लागणारा आणि सर्वाधिक खर्चिक प्रकल्प रिंगरोडचा आहे. दादा भुसे हे सार्वजनिक बांधकाममंत्री असताना बाह्य रिंगरोडचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार तत्कालीन आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी रिंगरोडचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला एमएसआरडीसी सादर केला होता.एमएसआरडीसीने या प्रकल्पासाठी पुण्यातील मोनार्क या सल्लागार संस्थेमार्फत सर्वेक्षण करून अहवाल सादर केला आहे. मोनार्क या सल्लागार संस्थेने महापालिका हद्दीतून जाणाऱ्या पाथर्डी ते आडगावदरम्यान ६० मीटर रुंदीचा बाह्य रिंगरोड, तसेच आडगाव ते गरवारे पॉइंट या दरम्यान ३६ मीटर रुंदीचा बाह्य रिंगरोडचे सर्वेक्षण करून अहवाल सादर केला होता.

नवीन भूसंपादन कायद्यानुसार मनपा हद्दीत रिंगरोडसाठी भूसंपादन मोबदल्यापोटी अडीच हजार कोटींचा खर्च अपेक्षित आहे. हा खर्च जास्त असल्याने मोनार्क कंपनीने एनएमआरडीएच्या हद्दीतही सर्वेक्षण केले होते. बीओटीवर रिंगरोड उभारणीचा प्रस्ताव कंपनीने एमएसआरडीसीला दिला होता. या दोन्ही प्रस्तावांचे सादरीकरण मुख्यमंत्री फडणवीसांसमोर केले जाणार आहे.

## साहेब, आता तुम्हीच राजसाहेबांना 'मातोश्री'चे आमंत्रण द्या!

### उद्धव ठाकरेंच्या शिवसैनिकांचे शहरात होर्डिंग्ज

**नाशिक : प्रतिनिधी**

आम्हाला आमिष दिले गेले, मोठमोठ्या ऑफर्स आल्या. दबावही टाकला गेला पण आम्ही डगमगलो नाही, घाबरलो नाही. तुमच्या नेतृत्वावर आणि आदित्य साहेबांवरील आमचा विश्वास अढळ राहिला. एकनिष्ठ राहिलो. साहेब, आता आमची मागणी आहे की, आता तुम्हीच राज ठाकरे साहेबांना मातोश्रीवर आमंत्रित करा आणि महाराष्ट्राला आनंदवार्ता द्या, अशा आशयाचे होर्डिंग्ज ठाकरेंच्या शिवसैनिकांनी लावले आहेत. हे होर्डिंग्ज नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. राज्यात दोन दिवसांपासून ठाकरे बंधूंच्या युतीची जोरदार चर्चा रंगताना दिसत आहे. विशेष म्हणजे शिवसैनिक व मनसैनिकांनाही दोन्ही भाऊ एकत्र यावेत असे वाटत आहे. त्यामुळे कार्यकर्ते होर्डिंग्ज लावत, सामाजिक माध्यमातून आपल्या भावना व्यक्त करत दोन्ही नेत्यांनी एकत्र यावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

नाशिक हा शिवसेनेचा सुरुवातीपासूनच बालेकिल्ला राहिला आहे. राज ठाकरे यांनी मनसे स्थापन केल्यानंतर नाशिकमधून मनसेला सर्वाधिक प्रतिसाद मिळाला.

नाशकात ठाकरेंना मानणारा मोठा वर्ग आहे. त्यामुळे दोन्ही ठाकरे बंधूंनी एकत्र येत बाळासाहेबांनी निर्माण केलेला ठाकरे ब्रॅण्ड जपावा अशी भावना ही ठाकरेप्रेमींकडून व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे आगामी काळात राज्याच्या राजकारणात दोन्ही बंधू एकत्र येणार की नेहमीप्रमाणे एकत्रिकरणाची फक्त चर्चा होणार हे स्पष्ट होणार आहे.




## भूजल पातळीत यंदा समाधानकारक वाढ

### येवला, बागलाणच्या पाणीपातळीत मात्र घट

**नाशिक : प्रतिनिधी**

**गत पाच वर्षांच्या तुलनेत यंदा जिल्ह्यातील चौदा तालुक्यांच्या भूजल पातळीत काही प्रमाणात वाढ झाली असल्याने पाणी समस्येवर समाधानकारक स्थिती आहे. गेल्या पाच वर्षांपासून जिल्ह्यातील भूजल पातळीचा आलेख घसरल्याने गंभीर झालेला पाणीप्रश्न काही अंशी सुटण्याची चिन्हे आहेत.**

येवल्याची पाणीपातळी ०.२८ मीटरने घटल्याने पाणीटंचाईचा प्रश्न कायम आहे. अशातच यंदा उन्हाचा चटकाही प्रचंड जाणवत असल्याने पाण्याचा उपसा अधिक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाणीपातळीतही सन २०२० ते २०२४ दरम्यान जिल्ह्यातील भूजल पातळीत सतत घट झाली आहे. भूजल सर्वेक्षण यंत्रणेने मार्च महिन्यात जिल्ह्यातील १८५ विहिरींच्या भूजल पातळीची तपासणी केली. यंत्रणेच्या सर्वेक्षणानुसार गेल्या पाच वर्षांच्या सरासरी पातळीनुसार यंदा पाणी पातळी दीड मीटरपर्यंत वाढली आहे.

गतवर्षीच्या आकडेवारीनुसार पाणीपातळीत तीन मीटरपर्यंतची वाढ झाली आहे.



जिल्ह्यातील १४ तालुक्यांतील पाणीपातळी वाढलेली असताना येवला तालुक्यातील पाणीपातळी ०.२८ मीटरने घटली असून, मार्च महिन्यात ६.४६ मीटर पाणीपातळीची नोंद झाली आहे. सध्या पाणीपातळी वाढलेली असली तरी येत्या काही दिवसांत उन्हाच्या वाढत्या प्रमाणामुळे उपसा वाढण्याची शक्यता आहे. इगतपुरीतील पाणी पातळी तीन मीटरच्या खाली गेली असून, सर्वाधिक पावसाचे प्रमाण असलेल्या तालुक्यात पाणीपातळी २.९८ मीटर आली आहे. त्याचबरोबर दिंडोरी, त्र्यंबकेश्वर, सुरगाणा, पेठ, निफाड, नाशिक या तालुक्यांची पातळी सहा मीटरहून कमी आहे. जिल्ह्यात बागलाण तालुक्याची पाणीपातळी सर्वांत कमी आहे. भूजल पातळी निरीक्षण विहिरी ठरविलेल्या आहेत. या निरीक्षण विहिरींच्याद्वारे भूजल सर्वेक्षणाच्या पाणलोट क्षेत्रनिहाय १८५ निरीक्षण विहिरी आहेत. साधारणतः ८० पाणलोट क्षेत्र मिळून १८५ निरीक्षण विहिरी आहेत. वर्षातून चार वेळा ऑक्टोबर, जानेवारी, मार्च आणि मे या महिन्यात भूजल पातळीचे सर्वेक्षण केले जाते.

**भूजल पातळी कमी होण्याची कारणे**

नैसर्गिक गोष्टींवर, हवामान, पाऊस आदींवर भूजल पातळी अवलंबून असते. वातावरणातील बदल, कधी ढगफुटीसारखा पाऊस तर दुसरीकडे कमी पाऊस. पाऊस जास्त, पाऊस कमी वेळात झाल्यास पाणी मुरण्याऐवजी वाहून जाण्याचे प्रमाण जास्त होते. शेतीसाठी, पिण्यासाठी, वापरासाठी पाण्याचा उपसा केला जातो. भौगोलिक परिस्थिती, जमिनीचा उतार, मातीची जाडी, दगडाचा प्रकार या सर्व गोष्टींवर एकत्रितरीत्या पाणीपातळी कमी किंवा जास्त होते.



◀◀ इन्व्हेस्को इंडिया मिड कॅप फंड ◀◀ पान ३

नाशिक आज
# गांवकरी



◀◀ वैश्विक आव्हाने असतानाही भारताचा वस्त्रोद्योग तेजीत ◀◀ पान ३

■ नाशिक, सोमवार, दि. २१ एप्रिल २०२५

## महत्त्वाचे

### जनसुरक्षा कायद्याविरोधात मंगळवारी राज्यभर भाकपाचे आंदोलन

**नाशिक : प्रतिनिधी**

महायुती सरकारने पहिल्याच अधिवेशनात लोकशाहीला गाडणारा जनसुरक्षा विधेयक मांडले आहे. या विधेयकाच्या विरोधात भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे २२ एप्रिल रोजी संपूर्ण महाराष्ट्रात आंदोलन छेडण्यात येणार आहे. हे विधेयक सरकारवर टीका करणारे सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, यूट्यूबर्स, संघटना आणि सामान्य जागरूक नागरिक यांचा आवाज दडपण्याचा कट आहे. नव्या कायद्यानुसार कोणतीही व्यक्ती किंवा संघटना बेकायदेशीर ठरवली जाऊ शकते, त्यांच्या मालमत्तेवर टाच आणली जाऊ शकते आणि त्यांना मदत करणाऱ्यांवरही कारवाई होऊ शकते. सल्लागार मंडळाची गरज न ठेवता, कोणतीही माहिती गोपनीयतेच्या कारणाने लपवता येईल अशी या कायद्याची रचना आहे. नक्षलवादाचे कारण पुढे करून सरकार लोकशाही चळवळींवर गंडांतर आणत आहे. हाच लोकशाहीचा घातक टप्पा रोखण्यासाठी 'जनसुरक्षा विधेयक संघर्ष समिती, महाराष्ट्र'च्या पुढाकाराने २२ एप्रिल रोजी राज्यभर आंदोलनांची हाक देण्यात आली आहे. नाशिकमध्ये या आंदोलनाअंतर्गत २२ एप्रिल रोजी दुपारी ३.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे निदर्शने होणार आहेत. या निदर्शनात सर्व लोकशाहीप्रेमी आणि संविधाननिष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पक्षाचे राज्य सहसचिव राजू देसले, जिल्हा सचिव महादेव खुडे, शहर सचिव तल्हा शेख, शहर सहसचिव मीनाताई आढाव आणि प्राजक्ता कापडणे यांनी केले आहे.

### बालाजी देवस्थानतर्फे आजपासून ब्रह्मोत्सव

**नाशिकरोड :** नाशिकरोडच्या शिखरेवाडीतील बालाजी देवस्थानतर्फे आजपासून वार्षिक ब्रह्मोत्सव होणार आहे. २४ एप्रिलला त्याचा समारोप होईल. २१ एप्रिलला सकाळी सातला पंचामृत अभिषेक होईल. सायंकाळी साडेसहाला आचार्य महंत कालिकानंदजी महाराज यांचे प्रवचन होईल. २२ एप्रिलला सकाळी सातला पुण्याहवाचन, पंचगव्य आराधना, ध्वजारोहण व अन्य धार्मिक विधी होतील. सायंकाळी सहाला स्वामी संविदानंद सरस्वती, महंत गिरिजानंद सरस्वती, महंत भक्तीचरणदासजी महाराज यांच्या उपस्थितीत शोभायात्रा व बालाजी मूर्ती ग्राम प्रदक्षिणा होईल. बालाजी मंदिर, गंधर्वनगरी, बिटको फॅक्टरी, एलआयसी रोड, बालाजी मंदिर अशी ही प्रदक्षिणा होईल. २३ एप्रिलला सकाळी सातला आरती, हवन, पूजन तर सायंकाळी सहाला कल्याणोत्सवम, श्री बालाजी विवाह सोहळा, महाप्रसाद होईल. २४ एप्रिलला सकाळी सातला चक्रस्नान, पूर्णाहुती, सायंकाळी पाचला बालाजी मंदिर परिक्रमा, शयन उत्सव तर सायंकाळी साडेसहाला माधवदास राठी महाराज यांचे प्रवचन होईल. भाविकांनी कार्यक्रमांना उपस्थित राहावे, असे आवाहन बालाजी सोशल फाउंडेशनने केले आहे.

### स्वप्नपूर्ती महोत्सवासाठी नोंदणीचे आवाहन

**नाशिक :** कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य (वन्यजीव विभाग नाशिक) आणि स्वप्नपूर्ती सामाजिक संस्था, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.२२) घाटघर इको सिटी, ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथे जागतिक वसुंधरादिन साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी नाशिकहून जवळपास २५ महाविद्यालयांतून १०० निसर्गप्रेमी सहभागी होणार आहेत. भंडारदरा परिसरातील अभयारण्यालगतच्या १५ गावांतील सरपंच, उपसरपंच, मुख्याध्यापक, विविध संघटनांचे प्रमुख, समाजसेवक, पत्रकार आणि आपत्कालीन बचाव पथकाचे सदस्य यांना आमंत्रण देण्यात आले आहे. तरुणांना जल-जंगल-जमीन यांचे महत्त्व समजावे यासाठी एकदिवसीय वन सहल आयोजित केली आहे, असे स्वप्नपूर्तीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सचिन काकडे यांनी सांगितले. निसर्ग संवर्धनासाठी कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य (वन्यजीव विभाग, नाशिक) वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करत असते. जागतिक वसुंधरा दिनानिमित्त अशाच एका अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी तरुणांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा, असे आवाहन सहाय्यक वनसंरक्षक अनिल पवार यांनी केले आहे. उपक्रमात सहभागी होण्यासाठी https://swapnapurti-web.vercel.app संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे.

# नाशिकरोडला भटक्या कुत्र्यांचा चिमुकलीसह नागरिकांवर हल्ला

**नाशिकरोड : विशेष प्रतिनिधी**

**नाशिकरोड परिसरातील भटक्या कुत्र्यांनी थैमान मांडले आहे. त्यामुळे नागरिकांना आपला जीव मुठीत घेऊन वावर करावा लागत आहे. पंचम सोसायटी, डावखरवाडी, सद्गुरूनगर या भागांमध्ये भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट वाढला असून, या कुत्र्यांकडून नागरिकांवर हल्ले होत असल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नुकत्याच घडलेल्या प्रकारात मनसेचे शहर उपाध्यक्ष ॲड. नितीन पंडित त्यांच्या शेजारी राहणाऱ्या देवंशी सोरे ही चिमुकली तसेच सतीश चंदनशिवे, राज पिंजारी यांच्यावर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्याची घटना घडली आहे.**



या घटनेनंतर नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, महापालिकेच्या हलगर्जीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. वेळोवेळी तक्रारी करूनही नाशिक महापालिका व प्राणी नियंत्रण विभागाकडून कुठलीही ठोस कारवाई झालेली नाही. परिणामी, नागरिक सायंकाळनंतर घराबाहेर पडण्यासही घाबरत आहेत. विशेषतः लहान मुलं, वृद्ध आणि महिलांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

या समस्येवर तोडगा काढण्यासाठी नागरिकांनी काही ठोस उपाययोजनांची मागणी केली आहे. यामध्ये भटक्या कुत्र्यांची मोजणी करून त्यांना निर्बंधित करणे, त्यांचे निर्बीजीकरण तातडीने करणे, नागरिकांच्या तक्रारी तत्काळ नोंदवता याव्यात यासाठी स्वतंत्र हेल्पलाइन सुरू करणं, तसेच जनजागृतीसाठी विशेष मोहिमा राबवणं यांचा समावेश आहे. मनसेनेदेखील या प्रकाराचा तीव्र निषेध नोंदवला असून, प्रशासनाला कठोर शब्दांत धारेवर धरले आहे. महापालिकेने त्वरित उपाययोजना न केल्यास मनसेतर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शहर उपाध्यक्ष नितीन पंडित यांनी दिला आहे.

# शहरातील सिग्नलच्या वेळेत कपात

## वाहनधारकांना दिलासा:उन्हामुळे सिग्नल ब्लिंकर मोडवर

**नाशिक : प्रतिनिधी**

**भर दुपारच्या वेळात रस्त्यावरील सिग्नलची वेळ दहा सेकंदाने कमी करण्यात आली आहे. त्यामुळे वाहनधारकांसह पादचाऱ्यांनाही दिलासा मिळाला आहे. शहर वाहतूक शाखेकडून सिग्नलची वेळ दहा सेकंदाने कमी आणि काही सिग्नल ब्लिंकर मोडवर ठेवण्यात आल्याची माहिती पोलिस उपायुक्त शहर वाहतूक शाखा चंद्रकांत खांडवी यांनी दिली.**



उन्हाची तीव्रता कमी झाल्यावर साधारण जूनपर्यंत सिग्नलच्या वेळेत कपात आणि ब्लिंकर मोडवर असणार आहेत. त्यामुळे वाहनधारकांना विनाकारण सिग्नलवर जास्त वेळ थांबावे लागणार नाही. जूननंतर सिग्नलच्या वेळा पूर्ववत केल्या जातील.
**– चंद्रकांत खांडवी,** पोलिस उपायुक्त, शहर वाहतूक शाखा



वाहतूक शाखेच्या उपायुक्तांच्या आदेशानुसार गुरुवार (दि. १७) पासून अंमलबजावणी सुरू केली आहे. दिवसाचे तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक नोंदविण्यात आले होते. त्यामुळे वाढत्या उन्हापासून बचाव करीत घराबाहेर जाणे टाळले जाते. परंतु नोकरी-व्यवसायानिमित्ताने बाहेर पडावे लागते. सिग्नल सकाळी आठ ते अकरापर्यंत सुरू असतात. काही सिग्नल रात्री दहापर्यंत सुरू राहतात. उन्हाच्या तडाख्यामुळे शहरातील काही मुख्य सिग्नलच्या वेळात कपात केली आहे. यामुळे वाहनचालकांना जास्त वेळ सिग्नलवर थांबावे लागणार नाही. सिग्नलच्या वेळा रहदारी जास्त असलेल्या मार्गावर १०० ते ९० सेकंद आहेत. काही १५, २० सेकंदाच्या तर काही ४५ सेकंदांच्या आहेत. दुपारी वाहनांची वर्दळ कमी असली तरी सिग्नलवर वाहनचालक, दुचाकीचालक, पादचारी यांना उन्हात थांबावे लागते. या गोष्टीचा विचार करून शहर वाहतूक शाखेचे उपायुक्त चंद्रकांत खांडवी यांनी शहरातील बहुतांशी सिग्नलच्या वेळेत कपात केली आहे.

शहरातील वाहतूक नियमन अधिक कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने वाहतूक विभागाने काही सिग्नल यंत्रणा ब्लिंकर मोडवर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. वाहतूक विभागाने या बदलाबाबत नागरिकांना सूचित करण्यात आले आहे. संबंधित भागातील वाहनचालकांनी या सिग्नलवर ब्लिंकर संकेतानुसार वाहतुकीचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

जुना मुंबई–आग्रा महामार्गावरील सीबीएस सिग्नलची वेळ ४० सेकंदावरून ३० सेकंद, एबीबी सिग्नल ४५ सेकंदावरून ३० सेकंद, सिटी सेंटर मॉल सिग्नल गोविंदनगरकडून एबीबी सर्कल व एबीबी सर्कलकडून गोविंदनगरकडे जाणाऱ्या सिग्नलच्या वेळेत पाच ते दहा सेकंदांची कपात. नाशिकरोड, दत्त मंदिर आणि उपनगर नाका सिग्नलच्या वेळेत १० ते १५ सेकंदांपर्यंत कपात.

# स्वरगंगेच्या काठावरती, वचन दिले तू मला!

## स्वर सावाना कार्यक्रमात रसिक मंत्रमुग्ध

**नाशिक : प्रतिनिधी**

छम छम नाचत, स्वरगंगेच्या काठावरती, प्रथम तुज पाहता यांसह अनेक सुमधुर गाण्यांनी रसिक मंत्रमुग्ध झाले.

शास्त्रीय संगीत अभ्यास व सुप्रसिद्ध गायिका इंद्रायणी पटणी यांनी विविध रागांवर आधारित गाणे सादर केले. वीणा गोखले, आनंद अत्रे यांनी या कार्यक्रमात राग बसंत, राग भैरवी, राग सारंग, राग मारवा, राग नंदा आलापी इत्यादी रागांवर गाणे सादर करण्यात आली. संगीत संयोजन अमोल पालेकर यांचे होते तर निवेदन स्नेहा रत्नपारखी यांनी केले. ध्वनी व्यवस्था सचिन तिडके यांची होती.



सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने स्वर सावाना या कार्यक्रमाचे नवे पुष्प गुंफण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. सावानाचे प्रमुख सचिव सुरेश गायधनी, अर्थसचिव गिरीश नातू, डॉ. धर्माजी बोडके, सुहास भणगे, मंगला भणगे, अनिल देशपांडे, प्रवीण कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी सुहास भणगे, मंगला भणगे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक सांस्कृतिक सहसचिव प्रशांत जुन्नरे यांनी केले. सूत्रसंचालन बालभवन प्रमुख प्रेरणा बेळे यांनी केले. आभार गिरीश नातू यांनी मानले. कलाकारांचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

## अनधिकृत शेड हटविण्याची मागणी

**नाशिक : प्रतिनिधी**

मखमलाबाद येथील सर्व्हे क्रमांक ३१ या मिळकतीच्या साइड मार्जिनमध्ये पत्र्याच्या शेडचे अनधिकृत बांधकाम उभारण्यात आले आहे. महापालिका प्रशासनाने यासंदर्भात वेळोवेळी नोटिसा बजावूनदेखील संबंधित अतिक्रमण काढण्यात आलेले नाही. हे अतिक्रमण त्वरित हटविण्यात यावे, अशी मागणी सनील पगारे यांनी मनपा आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे. अतिक्रमणामुळे सदनिकाधारकांना दररोज येण्या-जाण्यात अडचण निर्माण होत आहे.

अतिक्रमण काढण्याबाबत महानगरपालिकेने दोनदा नोटिसा संबंधितांना बजावूनदेखील कुठलीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे संबंधित विभागीय अधिकारी यांच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. महापालिका कारवाई करणार नसेल तर आम्ही न्यायालयात जाऊ, असा इशारा पगारे यांच्यासह सोसायटीने दिला आहे.

# चंद्रकांत शिंदे यांच्या भीमगीतांनी अंबडवासीय मंत्रमुग्ध

## सिद्धार्थ मित्रमंडळातर्फे आयोजन

**नाशिक : प्रतिनिधी**

**चांदण्याची छाया कापराची काया, माऊलीची माया होता माझा भीमराया यांसह एकाहून एक सरस भीमगीते तसेच अन्य गाणी सादर करून शिंदे घराण्याचे ताज चंद्रकांत (दादा) प्रल्हाद शिंदे यांनी मने जिंकली. प्रत्येक गाण्याला वन्स मोअर मिळत असल्याने हा कार्यक्रम सुरेख झाला.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून बहुजन वंचित आघाडी प्रणीत सिद्धार्थ मित्रमंडळातर्फे अंबड येथील महालक्ष्मीनगरमध्ये नुकताच हा कार्यक्रम आयोजित केला होता. आपल्या सुरेल आवाजात पावले चालती पंढरीची वाट, जगी जीवनाचे सार, जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो रे ईश्वर, नांदण नांदण माझ्या रमाचं नांदण, माझ्या भीमाच्या संसारी जसं




टिपूर चांदणं आदी गीतांची बरसात करून चंद्रकांत शिंदे यांनी उपस्थित सर्व रसिकांची मने जिंकली. कोणत्याही गाण्याची फर्माइश आली तरी ती सादर करून शिंदे यांनी आपल्या गाण्याच्या जादूने सर्वांवर मोहिनीच घातली.

वंचित बहुजन आघाडीचे महानगरप्रमुख अविनाश शिंदे आणि आयोजक सुनील साळवे यांनी प्रारंभी चंद्रकांत शिंदे यांचे स्वागत व सत्कार केला. प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा वैद्यकीय आघाडीच्या प्रदेश संयोजक डॉ. चंचल साबळे, आघाडीचे उत्तर महाराष्ट्र महासचिव वामनदादा गायकवाड, संजय साबळे, रवी पगारे, माजी नगरसेवक दीपक दातीर, सागर नागरे, तुकाराम मोजाड, नामदेव गांगुर्डे, विशाल हिवराळे, सिद्धार्थ मित्रमंडळाचे सुनील अशोक साळवे, तुकाराम मोजाड, नामदेव गांगुर्डे, मधुकर पराडे, गुलशन खैरनार, विशाल हिरवाळे, सागर परदेशी, जयदीप वनिस, विकी महिरे, सागर महिरे, शुभम खरे, कुलदीप केदारे, गोकुळ सारीक्ते, नीलेश प्रधान, सचिन शिंदे, रूपेश गायकवाड आदी पदाधिकारी आणि रसिक उपस्थित होते.



# पक्षी व प्राण्यांसाठी थोडेसे धान्य - पाणी, थोडंसं प्रेम

## उन्हाळ्यात मुक्या जीवांसाठी उपक्रम

**नाशिक : प्रतिनिधी**

उन्हाच्या वाढत्या कडाक्यामुळे शहरातील चिमण्या व इतर पक्ष्यांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर राजे संभाजी क्रीडासंकुल आणि पवननगर क्रीडासंकुल, नवीन नाशिक जॉगिंग क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने थोडंसं धान्य - पाणी, थोडेसे प्रेम या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत झाडांवर कृत्रिम घरटी लावण्यात आली असून, पक्षी आणि इतर प्राण्यांसाठी अन्न व पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. निसर्गाच्या रक्षणासाठी ही छोटीशी कृती खूप मोठा संदेश देणारी ठरली आहे. घरच्या अंगणात, बाल्कनीत किंवा इतरत्र थोडंसं धान्य आणि पाणी ठेवून आपणही या उपक्रमात सहभागी होऊ शकतो, असे आवाहन आयोजकांनी केले.

या उपक्रमात जॉगिंग क्लबचे बाळा धाकराव, प्रशांत लोणारी, नितीन ढिकले, सुभाष पाटील,



गजानन गवारगुर, केशव भवर, आत्माराम खरात, भाग्येश पाचारणे, संजीव बोंडे, अमोल साळवे, चेतन सोनवणे, नरसिंगा देशमुख, कमलाकर दिवे, गोपाळ जायभावे, रवी चौधरी, सचिन दंडगव्हाळ, पंकज चांदवडकर, दत्ता डोके, भिकन पाटील, सूर्यकांत शेट्टी, स्वप्निल आव्हाड, गणेश दोंदे, योगेश सानप, मोनिका राठोड, स्नेहा काळे, मनीषा सूर्यवंशी, लीना महाले, देवश्री पावसे, ललिता थोरात, आशा पाटील, माधुरी जाधव, भाग्यश्री ढोकणे, सपना गांगुर्डे, कविता निकम यांची उपस्थिती होती.

# हे भगवान कहाँ रे तू?

## भग्न झालेल्या देवीदेवतांच्या मूर्ती वाऱ्यावर

**नाशिक : प्रतिनिधी**

**अनेकदा नागरिक घरातील भग्न झालेल्या देवीदेवतांचे फोटो, मूर्ती नदी, तलाव, विहीर आदी जलाशयाच्या ठिकाणी विसर्जित करतात. किंवा मंदिरे, छोट्या -मोठ्या मंदिरांच्या पसिरात, झाडांजवळ आणून ठेवतात. त्यामुळे आसपासचा परिसर विद्रूप होण्याबरोबर प्रदूषणात वाढ होत असल्याचे चित्र शहरात पाहावयास मिळत आहे.**



विधिवत किंवा योग्य पद्धतीने मूर्ती, पोथी, माळा देवांचे वस्त्र आदींचे योग्य पद्धतीने विघटन केले जाते. देवाच्या मूर्ती संकलित करण्यासाठी संपूर्णम सेवा फाउंडेशनने नाममात्र शुल्क भरून मूर्तींना आधुनिक पद्धतीने विघटित करण्याचा उपक्रम हाती घेतला असून, त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे.

शहर आणि उपनगरांमध्ये नदी अथवा जलाशयाच्या ठिकाणी निर्माल्य कलश ठेवले असले तरी त्याचा उपयोग इतर कचरा टाकण्यासाठी नागरिक करीत आहेत. अनेकदा सेवाभावी संस्थांनी भग्न मूर्ती, फोटो गोळा करून निर्माल्य कलशात टाकण्याबाबत प्रबोधन करण्यात आले होते. परंतु पुन्हा परिस्थिती जैसे थे झाल्याचे चित्र आहे.

घरातील भग्न झालेल्या देवांचे फोटो, मूर्ती देव्हाऱ्यात, घरात ठेवत नाही अशी मान्यता आहे. त्यामुळे खराब झालेले देवांचे फोटो, मूर्ती, इतर साहित्यांची विल्हेवाट लावताना मंदिरे, नदी आदी ठिकाणी ठेवल्या जातात. यामुळे देवांच्या फोटोफ्रेमच्या काचा, खिळे यामुळे दुखापत होऊ शकते. पाण्यात प्रवाहित केल्यास प्रदूषण होते. कधी जनावरांच्या पोटात कचरा जातो. त्यामुळे निष्पाप जनावरांचा बळी जाऊ शकतो. कचरा वेचणाऱ्यांनाही काच, खिळे आदींमुळे दुखापत होऊ शकते.

मूर्ती प्लास्टर ऑफ पॅरिसच्या असल्याने त्या वितळत नाही. परिणामी, जलप्रदूषण होऊन पाण्यातील जीवांना धोका निर्माण होतो. देवळात, झाडाखाली मूर्ती, फोटो ठेवल्याने विद्रुपीकरणाबरोबर कचरा जमा होतो. निर्माल्य किंवा देवीदेवतांच्या मूर्तीबद्दल शहरात निर्माल्य कलश ठेवलेले असूनही कलशाबाहेर अनेकदा कचरा इतस्ततः पडलेला दिसून येतो. अनेकवेळा तीर्थस्थळाहून येताना आठवण म्हणून तेथील देवीदेवतांच्या मूर्ती आणून देव्हाऱ्यात, घरात लावल्या जातात. परंतु कालांतराने खराब झाल्यावर देवाला वाऱ्यावर सोडले जाते. त्यामुळे समाजमनाच्या कल्पनेप्रमाणे संकटाच्यावेळी धावून येणाऱ्या देवाला अशा पद्धतीने वाऱ्यावर सोडल्यावर पी.के. सिनेमातील आमिरखानच्या गीताची आठवण येते. हे भगवान कहाँ रे तू या गीताची आठवण आल्याशिवाय राहत नाही.

संपूर्णम सेवा फाउंडेशनतर्फे पुणे, मुंबई, नाशिक दर दोन महिन्याला कलेक्शन पॉइंट ड्राइव्ह ठेवला जातो. गाडीसोबत स्वयंसेवक असतात. ते सर्व जमा करून नाशिकला देवळाली कॅम्पमध्ये आणले जाते. संपूर्ण भारतात अशा प्रकारच्या भंग झालेल्या मूर्ती जमा केल्या जातात. **–ॲड. तृप्ती गायकवाड,** संपूर्णम सेवा फाउंडेशन

## अग्रलेख

# केवळ चर्चा, बोलणी कधी?



शिवसेना-उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उध्दव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे एकत्र येऊन राजकारण करतील काय? गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत असलेल्या या प्रश्नाला पुन्हा एकदा फोडणी दिली गेली ती एका मुलाखतीने. दोघांनी एकत्र यावे ही शिवसैनिक आणि मनसैनिक यांची गेल्या अनेक वर्षांपासून इच्छा आहे. ती काही फलद्रुप होऊ शकलेली नाही. दोन्ही नेत्याच्या विचारांत साम्य आहे. मराठी आणि हिंदुत्वावर दोघांचे एकमत असूनही दोघे एकत्र का येत नाहीत? हा प्रश्न दोघांच्याही सैनिकांना पडलेला आहे. अर्थात, यामागे राजकारण आहे. शिवसेनेचे संस्थापक प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हयातीतच म्हणजे ९ मार्च २००६ रोजी राज ठाकरे यांनी शिवसेनेतून बाहेर पडून महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा नवा पक्ष स्थापन केला. या पक्षाच्या माध्यमातून आधी मराठीच्या मुद्द्यावर आणि नंतर त्याला हिंदुत्वाची जोड देऊन राज ठाकरे यांनी स्वतःची एक वेगळी प्रतिमा निर्माण केली. त्यांनी राज्यात कोणत्याच पक्षाशी युती केली नाही. भाजपाशी युती होण्याच्या शक्यता वर्तविण्यात येत होत्या. त्या शक्यताच ठरल्या. दोन वेळा (२०१४ व २०२४) लोकसभा निवडणुकीत त्यांनी भाजपाला पाठिंबा दिला, तर एकदा (२०१९) त्यांनी लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या विरोधात भूमिका घेताना काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेसला प्रत्यक्षात पाठिंबा दिला नाही. सन २००९ ची लोकसभा निवडणूक मनसेने स्वबळावर लढविली होती. त्यावेळी अपेक्षित यश आले नाही. नाशिक महापालिकेत २००७ साली सत्ता मिळाली. मुंबई आणि ठाणे महापालिकेत काही जागा मिळाल्या. सन २००९ च्या विधानसभा निवडणुकीत मनसेला १३ जागा मिळाल्या. त्यानंतर २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत केवळ एक जागा मिळाली, तर २०२४ ला एकही आमदार होऊ शकला नाही. सध्याच्या परिस्थितीत मनसेची राजकीय ताकद कमालीची घसरली आहे. दुसरीकडे बाळासाहेब ठाकरे यांचा वारसा जपत उध्दव ठाकरे यांनी शिवसेना पुढे नेली. तीन वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत उभी फूट पाडूनही लोकसभा निवडणुकीत उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेला चांगले यश मिळाले. मात्र, विधानसभा निवडणुकीत त्यांच्या शिवसेनेचा पालापाचोळा झाला. थोडक्यात, मनसे आणि शिवसेना (ठाकरे) हे दोन्ही पक्ष राजकीयदृष्ट्या कमजोर झाले आहेत. अशा परिस्थितीत प्रसिद्ध दिग्दर्शक महेश मांजरेकर यांनी त्यांच्या यूट्युब चॅनेलवर घेतलेल्या मुलाखतीत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे अजूनही एकत्र येऊ शकतात का? असा थेट सवाल राज ठाकरे यांना केला. यावर राज ठाकरे म्हणाले की, कोणत्याही मोठ्या गोष्टींसमोर आमच्यातील वाद, भांडणे किरकोळ आहेत. महाराष्ट्र खूप मोठा आहे. मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी या गोष्टी अत्यंत क्षुल्लक आहेत. एकत्र येणे, एकत्र राहणे यात फार कठीण गोष्ट वाटत नाही. विषय फक्त इच्छेचा आहे, कारण हा माझ्या एकट्याचा विषय नाही. सर्व राजकीय पक्षातील सर्व मराठी माणसांनी एकत्र येऊन एकच पक्ष काढावा, हे माझे म्हणणे आहे. येथे त्यांनी महाराष्ट्र हिताची भाषा केली. मी शिवसेना सोडल्यानंतर बाळासाहेब सोडून कोणाच्याही हाताखाली काम करणार नाही, हा माझा विचार होता. पण, मी शिवसेनेत होतो तेव्हा उद्धवबरोबर काम करायला मला काहीच हरकत नव्हती. पण समोरच्या माणसाच्या मनात आहे का, मी त्यांच्याबरोबर काम करावं? महाराष्ट्राची इच्छा असेल तर महाराष्ट्राने जाऊन सांगावे. अशा लहान-मोठ्या गोष्टींत मी माझा इगो आणत नाही, असेही म्हणत राज ठाकरे त्यांनी उद्धव ठाकरेंसोबत युती करण्याचे संकेत दिले. यावर उध्दव ठाकरे यांनीही भारतीय कामगार सेनेच्या मेळाव्यात बोलताना लागलीच सकारात्मक प्रतिसाद दिला. महाराष्ट्र हितासाठी किरकोळ वाद बाजूला ठेवण्याची माझीही तयारी असल्याचे सांगत उध्दवजींनी युतीसाठी एक हात पुढे केला आहे. महाराष्ट्र व मराठी माणसाच्या हितासाठी माझीसुद्धा आपसातील किरकोळ वाद बाजूला ठेवण्याची तयारी आहे. पण माझी अट एक आहे. महाराष्ट्राच्या हिताआड जो कुणी येईल, त्याचे स्वागत मी करणार नाही, त्याला मी घरी बोलावणार नाही, मी त्याच्या घरी जाणार नाही हे प्रथम ठरवा. त्यानंतर महाराष्ट्राच्या हिताच्या गोष्टी करा. बाकी आमच्यात माझ्याकडून कोणतीही भांडणे नव्हतीच. होती, तर मी आजच ती मिटवून टाकली, असे ते म्हणाले. यावरुन राजसाहेब आणि उध्दवजी एकत्र येण्याची शक्यता बळावली आहे. दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते जी चर्चा गेल्या काही वर्षांपासून करत आहेत ती आणखी वाढली आहे. राज आणि उध्दव हस्तांदोलन करतानाचा एक जुना फोटो शिवसेनेने सोशल मीडियावर पोस्टही केला आहे. त्यातून उध्दव ठाकरे हेही तितकेच सकारात्मक असल्याचा संदेश दिला गेला आहे. दोन्ही पक्ष राजकीय पटलावर हतबल झाल्यासारखे दिसत असल्याने त्यांना एकमेकांची गरज वाटतही असेल. दोन्ही नेते एकत्र येण्याची चर्चा केवळ मीडियात सुरू आहे. अशा चर्चा यापूर्वी अनेकदा होऊनही दोघे एकत्र आले नाहीत आणि येऊ शकले नाहीत. एकत्र येण्यासाठी बोलणी होणे तितकेच आवश्यक आहे. जोपर्यंत बोलणी होत नाही किंवा दोन्ही बाजूंकडून याच विषयांवर प्रतिनिधींमार्फत संवाद होत नाही तोपर्यंत ही चर्चाच राहणार आहे. दोन्ही बाजूंच्या काही अटी आणि शर्तीही असू शकतात. राज ठाकरे यांनी नंतर भाजपा, शिंदेंच्या शिवसेनेशी ऊठबैस करू नये, अशी उध्दव ठाकरे यांची अपेक्षा असेल तर उध्दव ठाकरे यांनीही काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसशी उठबैस करू नये, अशी अपेक्षा राज ठाकरे यांची असू शकते. दोन्ही नेते एकत्र येण्याच्या शक्यतेवर राजकीय प्रतिक्रिया उमटल्या आहेत. ते दोघे एकत्र आले, तर त्यांचा प्रश्न आहे. त्यांनी काय ते ठरवावे, असे भाजपा, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस या पक्षांच्या नेत्याकडून सांगण्यात आले. शिवसेनेचे एकनाथ शिंदे यांनी मात्र प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. ते दोघे एकत्र आले, तर सर्वांत मोठा धोका आपल्याला आणि आपल्या पक्षाला पोहचू शकतो, याची जाणीव एकनाथ शिंदे यांना असल्याने त्यांनी प्रतिक्रिया देण्याचे टाळले. दोन नेते एकत्र आले, तर महाराष्ट्रातील राजकीय चित्र बदलू शकते. चर्चा होत राहणार, पण बोलणी कधी होणार? हाच महत्वाचा प्रश्न आहे.

# बांगलादेशात 'अल्पसंख्य खतरे में'!

**बांगलादेश पूजा उद्यापन परिषदेच्या बिरल युनिटचे उपाध्यक्ष भाबेश चंद्र रॉय यांचे अपहरण करून त्यांची हत्या केल्याची घटना गुरुवारी उघडकीस आली. त्यांच्या राहत्या घरातून त्यांचे अपहरण करण्यात आले आणि जवळच्या गावात नेऊन त्यांना बेदम मारहाण करण्यात आली. बेशुद्ध अवस्थेत त्यांना घरी सोडण्यात आले. त्यांना रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.**

बांगलादेशात गेल्या ५ ऑगस्टला शेख हसीना यांचे सरकार पडल्यानंतर तेथे मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला. दंगली झाल्या, प्रचंड प्रमाणात जाळपोळ झाली. शेख हसीना यांनाही देश सोडून भारतात पलायन करावे लागले. या दंगलीमध्ये स्थानिक हिंदूंना जाणीवपूर्वक लक्ष्य केले जाऊ लागले. हिंदूंना घरात घुसून मारहाण होऊ लागली. त्यांची घरे, दुकाने लुटून ती जाळण्यात येऊ लागली. त्यांच्या जमिनी हडपण्यात आल्या. त्यांना त्यांच्याच घरातून हाकलले जाऊ लागले. हिंदूंच्या मंदिरांवर हल्ले होऊ लागले. देवतांच्या मूर्तींची तोडफोड होऊ लागली. हिंदू स्त्रियांवर, बालकांवर अत्याचार होऊ लागले. ऑगस्ट महिन्यात देशभरात पसरलेले हे हिंदूविरोधी लोण आजही कायम आहे.

ढाका येथील मानवाधिकार संघटना 'ऐन ओ सलीश केंद्र'च्या गेल्या मासातील एका अहवालात असे म्हटले होते की, बांगलादेशात हिंदूंची घरे, मंदिरे आणि व्यावसायिक प्रतिष्ठान यांची तोडफोड करण्याच्या एकूण १४७ घटना घडल्या आहेत. या घटनांमध्ये अनुमाने ४०८ घरांची तोडफोड करण्यात आली. ज्यात ३६ जाळपोळीच्या घटनांचा समावेश आहे. याखेरीज अल्पसंख्याकांच्या मालकीच्या व्यावसायिक प्रतिष्ठानांची तोडफोड करण्याच्या ११३ घटना घडल्या आहेत. मागील आठ महिन्यांपासून बांगलादेशमध्ये अराजकसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, देशातील बहुसंख्याकांकडून जाणीवपूर्वक अल्पसंख्याकांना लक्ष्य केले जात आहे. बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचाराचे पडसाद भारतातही उमटले असून, भारतातील हिंदुत्ववादी संघटनांनी बांगलादेशातील या दडपशाहीच्या विरोधात आजतागायत देशभर आंदोलने केली आहेत. भारतातील अल्पसंख्याकांची तळी उचलण्यास सदैव तत्पर असणारा अल्पसंख्याक आयोग बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचाराच्या विरोधात मूग गिळून गप्प का, असाही सवाल आज



विचारला जात आहे.

१९४७ साली पूर्व पाकिस्तानमध्ये म्हणजे आताच्या बांगलादेशमध्ये एक तृतीयांश हिंदू होते. २०२२ मध्ये जेव्हा देशात जनगणना झाली तेव्हा तेथे ७.९६ टक्के हिंदू शिल्लक राहिल्याची अधिकृत आकडेवारी जाहीर करण्यात आली होती. फाळणीनंतर तेथील हिंदूंची संख्या कमी होत गेली तर मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत गेली. फाळणीपासूनच स्थानिक अल्पसंख्य हिंदूंना लक्ष्य केले जात आहे. स्थानिकांच्या छळाला कंटाळून दरवर्षी लाखो हिंदू देशातून पलायन करतात. हे प्रमाण गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढले आहे. बांगलादेशातील हिंदूंना दिली जाणारी अन्याय्य वागणूक हा जुना विषय असला तरी गेल्या सात-आठ महिन्यांत तेथील हिंदूंची स्थिती अत्यंत बिकट झाली आहे, हे असेच चालत राहिले तर पुढील काही महिन्यांतच बांगलादेशात नावालाही हिंदू शिल्लक राहणार नाही. याउपरांत बांगलादेशातील गरिबीला कंटाळून बांगलादेशी मुसलमानांचे लोंढेच्या लोंढे भारतात येत आहेत. आजमितीला ही संख्या १० कोटींहून अधिक झाली आहे. भारतातील विकसनशील शहरी भागात बांगलादेशी नागरिकांच्या वस्त्या तयार झाल्या आहेत.

**हेमंत चोपडे**
**७३५०७०५०९१**

येथील स्थानिक झोपडपट्टी दादा पैशांच्या मोबदल्यात या बांगलादेशी घुसखोरांच्या निवाऱ्याची, नोकरी-व्यवसायाची आणि कागदपत्रांची व्यवस्था करून देतात. आजमितीला अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये आणि अनधिकृत कामांमध्ये बांगलादेशी घुसखोरांचा सहभाग असल्याचे उघड होत आहे. घुसखोरांना त्यांच्या देशात हाकलण्याचा कायदाही अस्तित्वात आहे; मात्र त्याची कठोरपणे अंमलबजावणीच केली जात नाही. एकीकडे बांगलादेशातील हिंदू नामशेष होऊ लागला आहे तर दुसरीकडे भारतात आलेले बांगलादेशी घुसखोर भारताची अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात आणू लागले आहेत. भारतात अवैधपणे राहणाऱ्या बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांना हाकलून देण्यासाठी देशभरात विशेष मोहीम राबवण्यात यावी तसेच भारताच्या शेजारील राष्ट्रांत अल्पसंख्य हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात भारताने आंतरराष्ट्रीय पातळीवर आवाज उठवावा, अशी मागणी सातत्याने करण्यात येत आहे; मात्र दर वेळेस अशा काही घटना घडतात तेव्हा त्या घटनेचा तीव्र निषेध करण्याव्यतिरिक्त सरकारकडून अन्य काही पावले उचलली जात नसल्याचे लक्षात येते. आज जसे बांगलादेशात हिंदूंना लक्ष्य केले जात आहे तसे ज्यू लोकांना लक्ष्य करण्याची हिम्मत कोणत्याही देशाची नाही. ज्यू लोकांवर जगभरात कोठेही हल्ले झाले तर इस्त्रायल पेटून उठतो, ज्यू लोकांना संरक्षण देण्यासाठी आक्रमक होतो. भारत अशा प्रकारची भूमिका केव्हा घेणार आहे?

# भक्तिभाव जागवणारे अजरामर सूर

ईश्वराच्या भक्तीचे अनेक मार्ग आहेत. कोणीतरी ध्यानधारणेत मन रमवतो, तर कोणीतरी सेवा-पूजेत तल्लीन होतो. परंतु सामान्य माणसाच्या मनाला भिडणारा आणि सर्वाधिक भावस्पर्शी मार्ग म्हणजे भक्तिगीत - अर्थातच भजने. हिंदी चित्रपटांनी या भक्तिपर परंपरेचा नेहमीच जागर केला आहे. आजही अशी असंख्य गाणी आहेत जी केवळ चित्रपटांच्याच नव्हे तर लोकांच्या आयुष्याचाही अविभाज्य भाग झाली आहेत.

**चित्रपट आणि भक्तिगीत :**
**मनाचा सच्चा संवाद**

चित्रपट हे केवळ मनोरंजनाचं माध्यम न राहता, अनेकदा आध्यात्मिक भावनाही जागवणारे ठरले आहेत. अनेक वेळा चित्रपटातील एखादं भक्तिगीत परिस्थिती बदलवून टाकतं, आशेचा किरण देतं आणि मनामध्ये श्रद्धेची जाणीव निर्माण करतं. विशेष बाब म्हणजे भक्तिगीतं फक्त धार्मिक चित्रपटापुरती मर्यादित नाहीत; ॲक्शन, रोमान्स, कौटुंबिक कथानकांमध्येही अशी गाणी आपलं स्थान निर्माण करतात.

**जय संतोषी माँ :**
**भक्ती आणि यश यांचा संगम**

१९७५ साली आलेला 'जय संतोषी माँ' हा चित्रपट भक्तीप्रधान चित्रपटांचं उत्तम उदाहरण ठरतो. अगदी कमी बजेटमध्ये तयार झालेला हा चित्रपट इतका लोकप्रिय झाला की, त्याने ब्लॉकबस्टर चित्रपटांची यादी गाठली. या यशामध्ये उषा मंगेशकर, महेंद्र कपूर आणि मन्ना डे यांनी गायलेल्या भक्तिगीतांचा मोठा वाटा होता. 'करती हूं तुम्हारा व्रत', 'मदद करो संतोषी माता', 'जय संतोषी माँ' ही गाणी लोकांच्या मनामध्ये आजही तितकीच भावतात.





इतकंच नव्हे तर या चित्रपटात संतोषी मातेची भूमिका साकारणारी अभिनेत्री अनिता गुहा यांना लोकांनी प्रत्यक्ष पूजायला सुरुवात केली होती. महिपाल यांच्यासारख्या कलाकारांनी 'संपूर्ण रामायण', 'वीर हनुमान'सारख्या अनेक धार्मिक चित्रपटांमधून देवभूमिका साकारून भक्तीचा ठसा अधिक खोलवर उमटवला.

**मच्छिंद्र ऐनापुरे**
**जत, जि. सांगली**

**'सुहाग'मधील देवीची भक्ती**

१९७९ मधील 'सुहाग' या अमिताभ बच्चन आणि शशी कपूर यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या चित्रपटातील 'नाम रे सबसे बड़ा तेरा नाम ओ शेरोवाली' हे दुर्गेची स्तुती करणारे गीत अजूनही नवरात्रीत वाजताना ऐकायला मिळते. आशा भोसले आणि मोहम्मद रफी यांच्या गोड आवाजातले हे गाणं आजही गरब्याच्या तालावर उचल घेतं.

**'ओ दुनिया के रखवाले' ते 'बड़ी देर भई नंदलाला'**

भक्तिगीतांची ही परंपरा काळाच्या ओघात अधिकच बहरली. १९५२ मधील 'बैजू बावरा' चित्रपटातील 'ओ दुनिया के रखवाले' हे गीत आजही दु:खी मनाला आधार देतं. मोहम्मद रफी यांच्या भावस्पर्शी आवाजातलं हे गीत हिंदू भक्तिगीतांमधील मोलाचं स्थान पटकावून आहे.

त्याचप्रमाणे, १९६५ साली आलेल्या 'खानदान'मधील 'बड़ी देर भई नंदलाला' हे श्रीकृष्णावर आधारित गाणं जन्माष्टमीला घरोघरी वाजतं. रफी यांच्या स्वरातून निघालेला हा नंदलालाचा साद अजूनही कानात रेंगाळतो. १९५४ मध्ये आलेल्या 'तुलसीदास' चित्रपटातील 'मुझे अपनी शरण में ले लो राम' या गीतात रामभक्तीची आर्त भावना प्रभावीपणे व्यक्त झाली आहे.

**मनाला भिडणाऱ्या भक्तिगीतांची यादी संपणार नाही**

ही केवळ काही निवडक उदाहरणं आहेत. असंख्य भक्तिगीतांनी केवळ चित्रपटांना यश मिळवून दिलं नाही, तर प्रेक्षकांच्या मनात श्रद्धा, आशा आणि विश्वासाचं बीजही रोवलं. भक्तिगीत हे केवळ श्रवणीय न राहता, मन:स्पर्शी ठरतं. हे गाणं जसं ऐकताना डोळ्यांत पाणी आणतं, तसंच मनामध्ये शांतीचा अनुभवही देते. आजही मंदिरे असो वा घरातील पूजास्थळ, अशा भक्तिगीतांशिवाय पूजन पूर्णच होत नाही.

शेवटी एवढंच म्हणता येईल की, भक्तिगीत हे आपल्या चित्रपटसृष्टीचं आध्यात्मिक भान आहे - जे कालातीत आहे आणि मनाला भावणाऱ्या श्रद्धेचं सुंदर रूप आहे.

# महाराष्ट्राचा बहुमान

महाराष्ट्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण गवई हे लवकरच भारताचे नवे मुख्य सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतील. भारताच्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले असून, १४ मे पासून ते भारताचे मुख्य सरन्यायाधीश म्हणून सूत्र हाती घेतील.



विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येत आहे. न्यायमूर्ती भूषण गवई हे भारताचे ५२ वे सर न्यायाधीश असतील. याआधी न्या. प्रल्हाद गजेंद्रगडकर, न्या. यशवंत चंद्रचूड, न्या. सॅम भरूचा, न्या. सरोश कपाडिया, न्यान शरद बोबडे, न्या. उदय लळीत आणि न्या. धनंजय चंद्रचूड या सात मराठी न्यायमूर्तींना हा मान मिळाला आहे. महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण गवई यांना भारताच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या पुढील महिन्यात १४ तारखेला सर न्यायाधीशपदाची शपथ देतील त्यावेळी इतिहास रचला जाईल. भारताचे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेणारे भूषण गवई हे केवळ दुसरेच दलित न्यायमूर्ती आहेत. याआधी के. जी. बालकृष्णन पहिले दलित सरन्यायाधीश बनले होते.

**श्याम ठाणेदार**
**९९२२५४६२९५**

न्यायमूर्ती भूषण गवई यांची देशाच्या सरन्यायाधीशपदी नियुक्ती होणे हा महाराष्ट्राचा बहुमान होय. कारण ते महाराष्ट्राचे सुपुत्र आहेत. रिपाइं नेते व माजी राज्यपाल रा. सू. गवई यांचे सुपुत्र असलेले न्यायमूर्ती भूषण गवई यांचा जन्म अमरावतीत झाला असून, त्यांचे प्राथमिक व कायद्याचे शिक्षण मुंबईत झाले. मुंबईतच त्यांनी वकिली सुरू केली. २००५ मध्ये त्यांची उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली. वकील आणि न्यायाधीश म्हणून त्यांना दांडगा अनुभव आहे. छत्रपती संभाजीनगर, नागपूर, पणजी येथे त्यांनी न्यायाधीश म्हणून काम केले आहे. २४ मे २०१९ रोजी त्यांची सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. अनेक ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण निकाल न्यायमूर्ती भूषण गवई यांनी दिले आहेत. नोटबंदी वैध ठरवणारा २०२३ चा निर्णय त्यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाचा निर्णय ठरला. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० वे कलम हटवण्याचा निर्णय देणाऱ्या घटनापीठाचा ते भाग होते. प्रशांत भूषण अवमान प्रकरणात निकाल देणाऱ्या खंडपीठाचाही ते भाग होते. कायद्याचे सखोल ज्ञान, सर्वांना सोबत घेऊन जाण्याचे कौशल्य, नेतृत्वगुण, वंचित आणि उपेक्षितांबद्दलचा कळवला. या गुणांमुळे ते आधीच लोकप्रिय आहेत. न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या निवडीचा मराठी माणसांना अभिमान आहे. न्यायालय आणि न्यायालयीन कामकाज याविषयी सर्वसामान्य नागरिकांच्या मनात अजूनही काही प्रश्न आहेत. न्यायालयात जलद न्याय मिळत नाही. सर्वसामान्य नागरिकांनी न्यायालयाची पायरी चढूच नये, अशी भावना सर्वसामान्य नागरिकांची आहे. सर्वसामान्य नागरिकांची ही भावना खोटी ठरवून जलद न्याय देण्याबरोबरच न्यायव्यवस्थेवरील सर्वसामान्यांचा विश्वास दृढ करण्याची जबाबदारी न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यावर आहे. त्यात ते यशस्वी होतील यात शंका नाही. देशाचे नवे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचे मनापासून अभिनंदन!

## जनमनाचे प्रतिध्वनी

# सोन्याच्या विटा, देवळांचा विकास, आरोग्य आणि शिक्षणाचा उजेड!

तामिळनाडू सरकारने नुकतेच एक स्तुत्य पाऊल उचलले आहे. राज्यातील मंदिरांमध्ये भक्तांनी अर्पण केलेल्या एक हजार किलोंपेक्षा अधिक सोन्याचे दागिने वितळवून त्या २४ कॅरेट सोन्याच्या विटांमध्ये रूपांतरित करण्यात आले. या विटा बँकांमध्ये ठेवून त्यातून दरवर्षी १७.८१ कोटी रुपयांचे व्याज मिळवले जात आहे. विशेष म्हणजे हे उत्पन्न मंदिरांच्या विकासासाठी वापरण्यात येत आहे. हे एक दूरदृष्टी असलेले आणि आर्थिक शिस्तीचा आदर्श असणारे पाऊल म्हणावे लागेल. हे उदाहरण महाराष्ट्रासाठी आणि इतर राज्यांसाठी प्रेरणादायी ठरावे. महाराष्ट्रात पंढरपूरचा श्री विठोबा, शिर्डीचे साईबाबा मंदिर, मुंबईचा लालबागचा राजा, तुळजापूरची भवानी माता, जेजुरीचा खंडोबा अशी असंख्य श्रद्धास्थाने आहेत, जिथे लाखो भाविक देणगी स्वरूपात सोने-चांदी अर्पण करतात. या संपत्तीचा वापरही तामिळनाडूच्या धर्तीवर विकासात्मक कामांसाठी व्हावा, ही काळाची गरज आहे. मंदिरांमध्ये अर्पण झालेली ही संपत्ती केवळ गाभाऱ्यात शोभेची वस्तू म्हणून न ठेवता तिचा जनकल्याणासाठी वापर करणे, हेच खरे धर्मकार्य ठरेल. आज ग्रामीण भागातील हजारो गावांमध्ये अद्यापही सुसज्ज आरोग्यसेवा नाही, चांगले शाळा-कॉलेज उपलब्ध नाहीत. अशा वेळी मंदिर व्यवस्थापनाकडून मिळणाऱ्या उत्पन्नातून मोफत किंवा माफक दरात दवाखाने, रक्तपेढ्या, शाळा, वसतिगृहे उभारण्याचे कार्य होणे आवश्यक आहे. अर्थात, यासाठी पारदर्शक यंत्रणा आणि जबाबदारीनिशी काम करणाऱ्या समित्यांची गरज आहे. जसे तामिळनाडूमध्ये निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली तीन समित्या नेमण्यात आल्या, तशीच व्यवस्था इतर राज्यांतही होणे गरजेचे आहे. मंदिरांशी संबंधित धर्मादाय संस्था, राज्य सरकार आणि स्थानिक स्वयंसेवी संस्था यांचा समन्वय साधून समाजाभिमुख उपक्रम राबवता येतील. मंदिरांचा अर्थ हा केवळ आध्यात्मिक उन्नतीपुरता मर्यादित नसून, तो सामाजिक भल्यासाठीही असावा. देवाच्या नावावर जमा झालेली संपत्ती जर गरजूंच्या आरोग्य, शिक्षण, रोजगारासाठी वापरली गेली तर ती खरी 'देवसेवा' ठरेल.

**-मच्छिंद्र ऐनापुरे, जत**

## अन्न व औषध प्रशासन कार्यालय मालेगावात असावे

मालेगाव शहरातील जीवनमान खूपच मोठे आहे. येथील नागरिकांना आरोग्यदृष्ट्या खाद्यपदार्थ चांगले गुणात्मक, दर्जेदार, निर्भेळ मिळावेत म्हणून येथील अन्न आस्थापनांची, अन्नसुरक्षा कायद्यान्वये वेळोवेळी तपासणी होणे गरजेचे आहे. तसेच अन्न आस्थापनांना अन्नसुरक्षा कायद्यान्वये परवाना, रजिस्ट्रेशन होणे महत्त्वाचे आहे. आता हा विभाग अन्न आणि औषध प्रशासन नाशिक यांच्या अधिकारात वर्ग करण्यात आला आहे. त्यामुळे अन्न आस्थापनांची तपासणी करण्यासाठी अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांना नाशिक येथून यावे लागते. यात वेळेचा अपव्यय होतो. तसेच अन्न आस्थापनांवर अंकुश राहत नाही. दूध व दुधजन्य पदार्थ, फळे, गुटखा यांची जोरदारपणे तपासणी वेळोवेळी होणे गरजेचे आहे. प्रशासनाचा विभाग मालेगावला स्वतंत्ररीत्या सुरू करावा, ही काळाची गरज आहे.

**- प्रभाकर वारुळे, मालेगाव**

# सत्याचा समागम

कोणत्याही मंगल कार्यात सर्वांआधी गणपतीचे आवाहन करतात आणि सगळे कार्य संपले की, सर्वांच्या शेवटी त्यांचे विसर्जन करतात. त्याप्रमाणे अनुसंधानानेच पोथीला सुरुवात करावी आणि अनुसंधानानेच पोथीची समाप्ती करावी. लौकिक कार्यामध्ये गणपतीचे विसर्जन झाल्यावर आपण शिल्लक उरतो, पण अनुसंधानाचे विसर्जन करताना आपणही त्यात नाहीसे व्हावे. जसे ठेवायचे असेल तसे ठेवा, पण आपला विसर पडू देऊ नका, एवढी भीक घालावी, अशी गुरूच्या चरणी प्रार्थना करावी. भगवंताला विसरून भजन करू नका. भगवंताची आठवण ठेवून भाजी जरी आणली तरी त्याचे श्रेय जास्त आहे. जगाच्या लाजेला भिऊन भगवंताला अंतर देऊ नये. 'मी कोण' याचा विचार करावा आणि तो करण्यासाठी, 'मी नाही कोणाचा' हे बघावे. मी आप्तेष्टांचा, बायको-मुलांचा, आईबापांचा तर नाहीच, पण मी देहाचा आणि मनाचाही नाही; असे करता करता जो राहील तो मी. खरे समाधान एकपणात आहे, अद्वैतात आहे. म्हणून, द्वैताचा जनक जो अभिमान तो कमी कसा होईल हे बघावे. याकरिता, मी कर्ता नसून, देव कर्ता आहे असे मानावे. सर्वांभूती भगवद्भाव पाहावा, सत्समागम करावा. सत्समागम म्हणजे सत्याचा समागम. सत्पुरुषाच्या वचनावर विश्वास ठेवून त्याप्रमाणे वृत्ती बनविणे हा खरा सत्समागम आहे.



विचारधन

गांवकरी®
('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह)
गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द. शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन




### एलजी अल्ट्रा कंपनीचा नवीन कुकर बाजारात दाखल

**नाशिक :** स्वयंपाक करताना 'कुकर'च्या नेमक्या किती शिट्या झाल्या हे आपल्याला अचूकपणे सांगणे जास्तच अवघड जाते. पण आता 'शिट्यांची' काळजी करण्याचे काहीच कारण नाही. एलजी अल्ट्रा कंपनीने नवीन कुकर बाजारात आणला असून, त्यातून एकूण किती शिट्या झाल्या हे आपल्याला अगदी सहजपणे कळणार आहे. त्यामुळे अंदाजे होणारा स्वयंपाक आता यापुढे एकदम खात्रीशिर होण्यास मदत मिळणार असल्याची माहिती, एलजी अल्ट्रा कंपनीचे विपणन व विक्री विभागाचे प्रमुख पार्थ सारथी व महाराष्ट्र-गुजरातचे व्यवसाय विकास व्यवस्थापक कमलेश बंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. हे उत्पादन नाशिकच्या मुख्य दुकानांमध्ये उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. प्रिमियम किचन उपकरणांमध्ये समाविष्ट एलजी अल्ट्रा कंपनीने घरगुती वापरातील नवीन उत्पादने बाजारात आणली आहेत. यात ट्रायप्लाय क्रोनो व्हिसल काऊंटिंग प्रेशर कुकरचा समावेश आहे. तीन थरांचे स्टेनलेस स्टिल वापरलेला हा प्रेशर कुकर बनविण्यासाठी कंपनीने सात वर्षे मेहनत घेतली. पूर्ण चाचणी झाल्यानंतर हा कुकर बाजारात विक्रीसाठी आणला आहे. स्टेनलेस स्टिलपासून तयार केलेला हा कुकर दीड, दोन, तीन, साडेतीन, साडेचार व साडेपाच लिटर क्षमतेचा आहे. यात एकूण ९ शिट्या मोजण्याची सुविधा कंपनीने उपलब्ध करुन दिली आहे. कुकरचे झाकण हे बाहेरील बाजूने बंद होत असल्याने आतमध्ये डाळीचे भांडे किंवा तत्सम अन्न शिजविण्याची सुविधा उपलब्ध आहे. स्टेनलेस स्टिलपासून बनलेला हा कुकर एलजी कंपनीने स्वत: तयार केला आहे. 'मेड इन इंडिया' असलेल्या या कुकरचे पेटंट भारतात फक्त 'एलजी अल्ट्रा' कंपनीकडेच असल्याची माहिती कमलेश बंडे यांनी दिली. यावेळी पुणे विभागाचे सेल्स मॅनेजर योगेश खरात, नाशिकचे मुख्य वितरक संजय धोका उपस्थित होते.

### 'वागले की दुनिया'मध्ये सुगंधा मिश्राची एंट्री

**मुंबई :** सोनी सबवरील 'वागले की दुनिया : नई पीढी नए किस्से' ही मालिका मध्यमवर्गीय माणसाचा दैनंदिन संघर्ष आणि त्यांच्या कुटुंबातील हृदयस्पर्शी क्षण हलक्या-फुलक्या पद्धतीने मांडून प्रेक्षकांची आवडती मालिका बनली आहे.



या लोभस विश्वात आता लोकप्रिय अभिनेत्री आणि कॉमेडीयन सुगंधा मिश्राची एंट्री होत आहे. ती या मालिकेत सुमन गढिया नामक एका विचित्र, अत्यंत नाटकी स्वभावाच्या स्त्रीच्या रूपात दिसणार आहे. नाटकीपणा आणि बनवाबनवी करणे तिच्या स्वभावात आहे. सुमन यामिनी (मानसी जोशी) सोबत एका नाटकात काम करत आहे आणि आपल्या एका आगामी नाटकात मध्यमवर्गीय स्त्री साकारण्यासाठी तशा स्त्रियांचे निरीक्षण करता यावे या हेतूने ती या सोसायटीमध्ये आली आहे. गोड गोड बोलून ती यामिनीला भुलवते आणि साई दर्शन सोसायटीत राहायला येते, पण प्रत्यक्षात तिचा उद्देश काही इतका सरळसोट नाही! सुमनची भूमिका करणारी सुगंधा मिश्रा म्हणते, सुमन या व्यक्तिरेखेच्या मी तात्काळ प्रेमात पडले. ती विचित्र आहे, तिरसट आहे आणि तिच्यात खूप वेगवेगळ्या छटा आहेत. ही अशी भूमिका आहे, जी करत असताना तुम्हाला स्वत:लाही सतत आश्चर्याचा धक्का मिळतो आणि गंमत वाटते. माझ्यात पहिल्यापासून एक नाटकी स्त्री दडलेली आहे. त्यामुळे सुमनची भूमिका करणे मला सोपे गेले. यात आव्हानात्मक आणि त्याचबरोबर एक रोमांचक गोष्ट ही होती की, मला पहिल्यांदाच काही उत्कट आणि भावुक दृश्ये करण्याची संधी मिळाली. भारती आचरेकर या ज्येष्ठ अभिनेत्रीसोबत काम करताना दडपण वाटले आणि प्रेरणाही मिळाली. सगळ्या टीमने मला लगेच आपलेसे करून घेतले. या संपूर्ण प्रवासात मला त्यांनी साथ दिली, प्रोत्साहन दिले आणि आपुलकी दिली.

# इन्व्हेस्को इंडिया मिड कॅप फंड

**१९ एप्रिल २००७ या दिवशी सुरू झालेली ही योजना १८ वर्षे पूर्ण करून १९ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्यानिमित्ताने या योजनेचा आढावा. इन्व्हेस्को म्युच्युअल फंडाचे वैशिष्ट्य असे आहे की, त्या फंडाने योजनेचे जे उद्दिष्ट असेल त्या उद्दिष्टानुसार गुंतवणूक चौकट कायम ठेवली आहे. इतरांच्या अगोदर या म्युच्युअल फंडाने प्रथम मल्टी कॅप योजना आणली होती आणि व्यवस्थापनाने चौकट कधी मोडली नाही.**



मिड कॅप या प्रकारात अस्तित्वात असलेल्या योजनांचा धावता आढावा घेतला तर असे दिसून येते की, काही योजना आकारमानाचा विचार करता फारच मोठ्या झाल्या आहेत. एच.डी.एफ.सी. ७२६१० कोटी रुपये, निप्पॉन ३३१७५ कोटी रुपये, ॲक्सिस २८०६३ कोटी रुपये, कोटक ४८१२९ कोटी रुपये, मोतीलाल ओसवाल २६०२८ कोटी रुपये. या योजनांकडे मालमत्ता फारच मोठ्या झालेल्या आहेत. याउलट काही म्युच्यअल फंडस् अजूनसुध्दा आकारमानानुसार फारच लहान आहे. त्यामध्ये बरोडा बी.एन.पी. १८५८ कोटी रुपये, आय.सी.आय.सी.आय. ५३९४ कोटी रुपये, टाटा ४३३३ कोटी रुपये, यु.टी.आय. १०६४९ कोटी रुपये, एल.आय.सी. ३०२ कोटी रुपये, आदित्य बिर्ला ५५०२ कोटी रुपये, इन्व्हेस्को ५७११ कोटी रुपये इतरांच्या तुलनेत लहान पण सर्वांत मोठा एक वर्षाची भांडवलवृध्दी




११ टक्के आहे. जिथे मिड कॅप इंडेक्स एक वर्षाचा २ टक्के तोटा दर्शवित आहे. इन्व्हेस्को मिड कॅपने ज्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक केली आहे. त्या कंपन्यांची नावे खालीलप्रमाणे . १) कमिन्स, २) डिस्कन, ३) बी.एस.ई. लिमिटेड मॅक्स लाइफ.

**या योजनेकडे लक्ष देण्याची गरज**

गुंतवणूकदारांनी सेन्सेक्स, निफ्टी, बी.एस.ई. १००, मिडकॅप, स्मॉल कॅप या निर्देशांकाचे पीई रेशो बघण्याची आवश्यकता आहे. सेन्सेक्स आणि निफ्टी फक्त या दोनच निर्देशांकाचे पीई रेशो तुलनेने विचारात घेण्यासारखे आहेत. इतर प्रकारात पीई रेशो दर शेअरी उत्पन्न वाढीचा वेग यामध्ये कमालीचे चढउतार होतात. या निर्देशांकाचे दर शेअरी उत्पन्नसुद्धा खूप मोठे बदल दाखवतात. तुलना करताना लार्ज कॅप आरि मिड कॅप अशी तुलना केली जाते.

मिड कॅप योजनांमध्ये कोणत्या शेअर्सचा समावेश होऊ शकतो. कोणत्या शेअर्सची हकालपट्टी होऊ शकते हे सुध्दा बघणे आवश्यक असते. उदा. मुख्य निर्देशांकातले शेअर्स काही वेळा मिड कॅपमध्ये येतात. मिडकॅपचे स्मॉल कॅपचे स्मॉल कॅपमध्ये जातात आणि कोणत्या योजनेची कामगिरी त्या योजनेत कोणत्या शेअरचा समावेश आहे यावर अवलंबून असते. परंतु त्यासाठी म्युच्युअल फंडाच्या डिस्ट्रिब्युटरने योजनेचे गुंतवणुकीचे पत्रक वाचले पाहिजे. त्यासाठी त्या डिस्ट्रिब्युटरला शेअर बाजाराची माहिती असली पाहिजे. तरच योजनेचे माहितीपत्रक समजते. इन्व्हेस्कोच्या माहितीपत्रकात गुंतवणुकीत माहिती मिळते म्हणून काही नावाचा उल्लेख करावा लागेल.

डिस्कन, ट्रेड, बी.एस.ई लिमिटेड, इंटर ग्लोब इंडियन हॉटेल्स, पर्सिस्टंट, कमिन्स अशा कंपन्यांच्या शेअर्समध्ये या योजनेने गुंतवणूक केलेली आहे. गुंतवणूक कोणकोणच्या क्षेत्रात आहे, याची व्यवस्थित माहिती उपलब्ध आहे. ती माहिती वाचली तर कंपन्यांची निवड आणि त्या कंपन्या कोणत्या क्षेत्रातल्या आहे, त्याची माहिती वाचली तर योजनेची कामगिरी कशी राहील याचा अंदाज करता येतो.

या गुंतवणुकीच्या क्षेत्राचे डिस्ट्रिब्युटर्स स्वत: माहिती मिळवण्याचा प्रयत्न करीत नाही. शाखांनी जी माहिती उपलब्ध करून दिली असेल ती वाचणे किंवा काही शाखांचे प्रमुख इतरांच्या योजना आणि त्याची स्वत:ची योजना यात कुठे तफावत पडली याची माहिती देत असतात. ती माहितीसुध्दा उपयुक्त असते. काही योजनेत खूप चढउतार दाखवत नाहीत. परंतु, काही वर्षे गेल्यानंतर त्यांची आकडेवारी इतरांच्या तुलनेने सरस ठरते.

## हे चित्र आणि ते चित्र

### भारतीय म्युच्युअल फंड्स आणि अमेरिकन म्युच्युअल फंड्स

अमेरिकेत इंडेक्स फंडाकडे चांगला भरणा होतो, म्हणून भारतातसुध्दा इंडेक्स फंडाकडे गुंतवणूकदारांनी यायला हवे असा उगाचच अट्टहास आपल्याकडे केला जातो. पण प्रत्यक्षात काय आहे त्यासंबंधी माहिती 'गांवकरी'च्या वाचकांना देण्याचा हा छोटा प्रयत्न.

२०१४ ते २०२४ या दहा वर्षात व्हॅन गार्ड टोटल स्टॉक मार्केट इंडेक्स फंड या १.१५ ट्रिलियन यु.एस. डॉलर्स एवढा पैसा निर्माण केला. रुपयांच्या भाषेत बोलायचे झाले तर हा फंड १० लाख कोटी रुपयांचा फंड आहे. परंतु अमेरिकन भांडवल बाजार आपल्या बाजाराने १० पट मोठा आहे. त्यामुळे तुलना करणे चुकीचे आहे. १७ एप्रिल २०२५ या दिवशी एच.डी.एफ. सी. बॅलन्स ॲडव्हान्टेज फंड ९५००० कोटी रुपये मालमत्ता असलेला फंड होता. त्यामुळे एक लाख कोटी रुपयांवर हा फंड प्रथम पोहोचला यात शंका नाही.

अमेरिकेत जे गुंतवणूकदार आहेत. त्यापैकी बहुतेक गुंतवणूकदारांना आपल्या गुंतवणुकीकडे बघायला वेळ नसतो. म्हणून ते इंडेक्स फंडाकडे वळतात. परंतु इकडेसुध्दा ॲक्टिव्ह फंडांनी इंडेक्स फंडाची जास्त कमाई करून दिली आहे.

आपल्याकडे एखाद्या फंडाकडे शेअर्सची संख्या जास्त असली तर तो टीकेचा विषय होतो. परंतु इकडे फंडाकडे ३०० शेअर्स असतात. उगाचच आपल्याकडे फोकस्ड फंडाचे कौतुक केले जाते.

**साप्ताहिक समालोचन**

निर्देशांकाच्याबाबत एक उदाहरण देऊन याविषयी आता थांबतो.

रेसेल ३००० हा १८८४ ला सुरू झालेला निर्देशांक आहे. यात १ हजार मोठ्या कंपन्या आणि २००० छोट्या कंपन्या रेसेल २००० म्हणून सुध्दा ओळखल्या जातात. या पार्श्वभूमीवर आपल्याकडे बी.एस.ई. स्मॉल कॅप या निर्देशांकात फक्त ९७९ कंपन्या आहेत. गांवकरीसाठी व्हर्जिनियावरून पाठवलेला लेख.

# भारतीय श्रीमंतांकडे सौदी अरबच्या जीडीपीपेक्षा जास्त संपत्ती

## जगात भारताचा डंका! गौतम अदानींच्या संपत्तीत सर्वाधिक वाढ

**मुंबई :** भारत केवळ आर्थिक आघाडीवर आपल्या विकासाच्या गतीने जगाला प्रभावित करत नाही, तर भारतात अब्जाधीशांची संख्याही तितकीच मोठी आहे. अब्जाधीशांच्या संपत्तीबद्दल बोलायचं झालं ती अनेक देशांच्या जीडीपीहून अधिक असल्याचं दिसून येतंय. भारतीय उद्योगपतींकडे सौदी अरेबियाच्या जीडीपीपेक्षा जास्त संपत्ती असल्याचं हुरुन ग्लोबल रिच रिपोर्टमधून समोर आलं आहे. भारतात या घडीला २८४ अब्जाधीश असल्याचं हुरुन ग्लोबल रिच लिस्टमधून स्पष्ट झालं आहे. या सर्व अब्जाधीशांची मालमत्ता एकत्र केली तर ती सौदी अरेबियाच्या अर्थव्यवस्थेपेक्षा जास्त होईल. भारतीय उद्योगपतींची एकूण संपत्ती ही ९८ लाख कोटी रुपये आहे. ही संपत्ती ही देशाच्या जीडीपीच्या सुमारे एक तृतीयांश आहे. संपत्तीचा हा आकडा सौदी अरेबियाच्या जीडीपीपेक्षा कितीतरी जास्त आहे.



सौदीचा जीडीपी हा ९१.३५ लाख कोटी (१,०६७,५८२.९३ दशलक्ष) इतका आहे. हुरुन ग्लोबल रिच लिस्टनुसार, भारतातील अब्जाधीशांच्या संपत्तीत गेल्या वर्षीच्या तुलनेत १० टक्क्यांची वाढ झाली आहे.

**अदानींच्या संपत्तीत वाढ**

रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी हे सर्वांत श्रीमंत भारतीय आहेत. त्यांची एकूण संपत्ती ही ८.६ लाख कोटी रुपये इतकी आहे. तसेच ते सर्वांत श्रीमंत आशियाई आहेत. अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानींच्या एकूण संपत्तीमध्ये सुमारे १ लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे. अदानीची एकूण संपत्ती १३ टक्क्यांनी वाढली आहे. त्यांची एकूण संपत्ती ८.४ लाख कोटी रुपये आहे. रोशनी नाडर यांच्या वडिलांनी, शिव नाडर यांनी ४७ टक्के स्टेक हे रोशनींच्या नावावर हस्तांतरीत केले आहेत. त्यामुळे ३.५ लाख कोटी रुपयांच्या संपत्तीसह रोशनी नाडार या तिसऱ्या क्रमांकाच्या श्रीमंत भारतीय व्यक्ती ठरल्या आहेत.

**अब्जाधीशांच्या संख्येत सातत्याने वाढ**

अलीकडच्या वर्षांत भारतातील अब्जाधीशांच्या संख्येत बरेच चढ-उतार झाले आहेत. २०२२ मध्ये देशात २४९ अब्जाधीश होते, परंतु २०२३ मध्ये बाजारातील अनिश्चिततेमुळे ही संख्या १८७ पर्यंत कमी झाली होती. मात्र, याउलट २०२४ मध्ये अब्जाधीशांची संख्या २७१ वर पोहोचली होती. आता २०२५ मध्ये भारतीय अब्जाधीशांची संख्या २८४ झाली आहे.

**दिलीप सांघवी चौथ्या स्थानी**

सन फार्मास्युटिकल इंडस्ट्रीजचे दिलीप सांघवी हे चौथ्या क्रमांकाचे श्रीमंत भारतीय आहेत. सांघवी यांची एकूण संपत्ती २.५ लाख कोटी रुपये आहे.



# मध्य प्रदेशात शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढणार

## पतंजली कृषी आधारित मॉडेल स्थापन करणार

**मऊगंज :**

मध्य प्रदेशातील मऊंगज जिल्ह्यातील पडीक जमीन आता शेतकऱ्यांसाठी नवी उमेद घेऊन आली आहे. या जमिनीला पतंजली योगपीठच्या सहकार्यानं सुपीक केलं जाईल. यामुळं शेतकरी समृद्ध होईल. विंध्य क्षेत्राच्या विकासाचा नवा अध्याय यामुळं लिहिला जाणार आहे. या महत्त्वाच्या उपक्रमांतर्गत मध्य प्रदेशचे उपमुख्यमंत्री राजेंद्र शुक्ला यांनी मऊगंज येथील जमिनीचं रजिस्ट्रेशन पतंजली योगपीठचे महामंत्री आचार्य बाळकृष्ण यांना सोपवलं आहे.

**शेतकऱ्यांच्या विकासाचं स्वप्न पूर्ण होणार : बाळकृष्ण**

रजिस्ट्री मिळाल्यानंतर आचार्य बाळकृष्ण यांनी या जमिनीची पाहणी केली आणि भविष्यात विकासाच्या योजनांवर विस्तारानं चर्चा केली. मीडियाशी बोलताना आचार्य बाळकृष्ण यांनी म्हटलं की योगबाबा रामदेव यांच्या मार्गदर्शनात पतंजली योगपीठ शेतकऱ्यांचं विकासाचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहे. ते म्हणाले हा प्रकल्प केवळ शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवणार नाही तर विंध्य क्षेत्राच्या विकासाला गती देईल.

दरम्यान, पतंजलीनं मऊगंज जिल्ह्यातील घुरेहटा गावात एक औद्योगिक पार्क उभारण्याची योजना तयार केली आहे. या पार्कचा उद्देश शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवणं, रोजगाराच्या संधी निर्माण करणं आणि या भागातील आर्थिक विकासाला प्रोत्साहनं देणं हे आहे. स्थानिक लोकांना शिक्षण, आरोग्य आणि कौशल्य विकासाच्या संधी मिळतील.

**पर्यावरणपूरक शेतीची संधी मिळेल**

या प्रकल्पामुळं विविध प्रकाराच्या पिकांची लागवड केली जाईल, प्रशिक्षण केंद्र, बीजप्रक्रिया केंद्र यासारख्या गोष्टींची स्थापना केली जाईल. यामुळं शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, चांगली अवजारं मिळतील, त्यामुळं शेतीची उत्पादकता वाढेल. कीटकनाशकं आणि रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी होईल. शेतीचा खर्च कमी होईल, पर्यावरणपूरक शेतीला प्रोत्साहन मिळेल, असं सांगण्यात आलं.

# उद्योगपती मुकेश अंबानींची दररोजची कमाई १६३ कोटी रुपये

**नवी दिल्ली :** रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक मुकेश अंबानी हे भारतातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती आहेत. १९ एप्रिल रोजी त्यांनी त्यांचा ६८ वा वाढदिवस साजरा केला. १९ एप्रिल १९५७ रोजी येमेनमध्ये धीरूभाई अंबानी आणि कोकिलाबेन अंबानी यांच्या पोटी जन्मलेले मुकेश अंबानी यांची गणना जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींमध्ये केली जाते. फोर्ब्सच्या अहवालानुसार मुकेश अंबानी यांची एकूण संपत्ती ९६.७ अब्ज डॉलर आहे.

मुकेश अंबानी यांच्या संपत्तीत गेल्या १० वर्षात प्रचंड वाढ झाली आहे. २०२० मध्ये ते ३६ अब्ज डॉलरवरुन २०२४ पर्यंत त्यांची संपत्ती ११४ अब्ज डॉलर झाली आहे. जगातील सर्वांत श्रीमंत व्यक्तींमध्ये मुकेश अंबानी यांचा १८ वा क्रमांक लागतो. अब्जाधीश उद्योगपती मुकेश अंबानी यांनी अल्पावधीत सर्वाधिक ग्राहकांना आकर्षित करून रिलायन्सच्या डिजिटल सेवा व्यवसाय जिओसाठी जागतिक विक्रम केला आहे. जगातील सर्वांत मोठ्या 4G ब्रॉडबँड वायरलेस नेटवर्कपैकी एक तयार करण्याचे श्रेयदेखील त्यांना जाते. या माध्यमातून शिक्षणापासून आरोग्यसेवा, आर्थिक सेवा, मनोरंजन अशा अनेक क्षेत्रांत डिजिटल सेवेची मदत झाली.

**दररोजची कमाई किती?**

मुकेश अंबानी दररोज १६३ कोटी रुपये कमावतात. दूरसंचार, पेट्रोकेमिकल, तेल, किरकोळ अशा विविध क्षेत्रांमध्ये पसरलेल्या रिलायन्स इंडस्ट्रीजच्या कंपन्यांमधून तो हे उत्पन्न मिळवतो. त्याच्याकडे एवढी संपत्ती आहे की, एखाद्या भारतीयाने वार्षिक ४ लाख रुपये कमावले तरी अंबानींइतकी संपत्ती मिळवण्यासाठी त्याला १.७४ कोटी वर्षे लागतील, जे अशक्य आहे.

मुकेश अंबानी यांच्या संपत्तीत गेल्या दशकात लक्षणीय वाढ झाली आहे. ते २०२० मध्ये सुमारे ३६ अब्ज डॉलरपासून सुरू झालेली वाटचाल २०२४ पर्यंत ११४ अब्ज डॉलरपेक्षा जास्त वाढली आहे. रिलायन्स जिओ आणि रिलायन्स रिटेलच्या जलद विस्तारामुळं या वाढीला चालना मिळाली आहे. आज, जिओचे देशभरात ४५० दशलक्षाहून अधिक वापरकर्ते आहेत. रिलायन्स रिटेलने देखील जगातील सर्वांत मोठ्या रिटेल कंपन्यांमध्ये आपले स्थान निर्माण केले आहे. मुकेश अंबानी मुंबईतील त्याच्या आलिशान घर अँटिलियामध्ये राहतात. या घराची किंमत १५,००० कोटी रुपये आहे.

# इन्फोसिसने केली २४० कर्मचाऱ्यांची कपात

**नवी दिल्ली :** आघाडीची आयटी कंपनी इन्फोसिसने मोठा निर्णय घेतला आहे. कंपनीतील तब्बल २४० एंट्री लेव्हल कर्मचाऱ्यांना काढून टाकले आहे. या प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांना अंतर्गत चाचणी पास करता आली नाही. त्यामुळं हा निर्णय घेतला आहे. याआधी फेब्रुवारीमध्ये कंपनीने ३०० हून अधिक प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले होते. इन्फोसिसने या तरुणांना NIIT




आणि UpGrad येथे मोफत कौशल्ये शिकण्याची संधी दिली आहेत, जेणेकरून ते भविष्यासाठी काहीतरी चांगले करू शकतील.

सध्याच्या बाजारातील परिस्थिती लक्षात घेऊन कंपनीने हे पाऊल उचलले, कारण कमी ऑर्डरमुळे कंपनीने चालू आर्थिक वर्षात केवळ ० ते ३ टक्क्यांच्या दरम्यान महसूलवाढीचा अंदाज व्यक्त केला आहे.

दि. १८ एप्रिल रोजी कर्मचाऱ्यांना पाठवलेल्या ईमेलमध्ये कंपनीने लिहिले, तुमच्या अंतिम मूल्यांकनाच्या प्रयत्नाचे निकाल जाहीर करण्याव्यतिरिक्त, तुम्हाला सूचित केले जात आहे की, अतिरिक्त तयारी वेळ, शंका दूर करण्याचे सत्र, एकाधिक मॉक असेसमेंट आणि तीन प्रयत्न करूनही तुम्ही 'जेनेरिक फाउंडेशन ट्रेनिंग प्रोग्राम'साठी पात्रता निकष पूर्ण केले नाहीत. त्यामुळं तुम्ही प्रशिक्षणार्थी कार्यक्रमाचा प्रवास सुरू ठेवू शकणार नाही. इन्फोसिसच्या बाहेर संधी शोधण्याच्या तुमच्या प्रवासात तुम्हाला मदत करण्यासाठी आम्ही तुमच्यासाठी व्यावसायिक आउटप्लेसमेंट सेवांची व्यवस्था करत आहोत. प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांना म्हैसूर प्रशिक्षण केंद्र ते बंगळुरू किंवा त्यांच्या गावी एक महिन्याचा पगार, निवास, प्रवास भाडे मिळणार आहे.

# वैश्विक आव्हाने असतानाही भारताचा वस्त्रोद्योग तेजीत

**नवी दिल्ली : भारतीय वस्त्रोद्योग परिसंघ (सीआयटीआय) ने एक मोठी माहिती दिली आहे. सीआयटीआयच्या नुसार, ३१ मार्च २०२५ संपलेल्या चालू आर्थिक वर्षात भारताच्या वस्त्र आणि परिधान निर्यातीत गेल्या वर्षीच्या तुलनेत ६.३२ टक्के वाढ झाली आहे. या वृद्धीसाठी कापड उद्योग अत्यंत महत्त्वाचा राहिला आहे. या विश्लेषणातून हेच समोर येतंय की, वस्त्र आणि परिधान निर्यातीत ही वृद्धी मुख्यत्वे परिधान निर्यातीने झाली आहे. यात चालू आर्थिक वर्षात १०.०३ टक्के वाढ नोंदवली गेली आहे.**



सीआयटीआयचे अध्यक्ष राकेश मेहरा यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. वैश्विक आव्हाने असताना परिधान निर्यातीत मजबूत कामगिरी आणि वस्त्रोद्योगात स्थिर वृद्धी भारतीय कपडा आणि परिधान उद्योगाला मजबुती, अनुकूलशीलता आणि वैश्विक प्रतिस्पर्धात्मकतेला उजागर करत आहे, असं राकेश मेहरा म्हणाले. त्यांनी याचं सर्व श्रेय नव्या व्यापार आघाडी बनवण्याला आणि वाढता वेग आणि सरकारच्या सहाय्यक धोरणांना दिलं आहे.

सरकारच्या धोरणांमुळे निर्यातदारांमध्ये विश्वास निर्माण करण्यात मदत झाली आहे.

**भारतासाठी संधी**

ही वाढ कायम ठेवण्यासाठी उद्योग जगत आशावादी आहे, असं मेहरा यांनी म्हटलंय. खासकरून विकसित होत असलेल्या वैश्विक व्यापार गतिशिलतेला पाहता ही वाढ कायम राहण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मेहरा म्हणाले की, अमेरिका आणि चीन दरम्यान सुरू असलेला व्यापार तणाव भारतासाठी धोरणात्मकदृष्ट्या संधी निर्माण करणारा आहे. खासकरून कापड आणि परिधान उद्योगात भारत चीनच्या पुढे जाण्यास आणि अमेरिकेचा एक विश्वासू तसेच आवडता भागीदार बनण्यासाठी चांगली स्थिती आहे. त्यासाठी सक्रिय कूटनीती आणि अधिक अनुकूल तसेच स्थिर टॅरिफ व्यवस्था मिळवण्यासाठी ठोस प्रयत्नांची गरज आहे.

**अमेरिका-चीनच्या लढाईत वाढ**

यावर्षी मार्चमध्ये भारतीय कपडा निर्यातीत मार्च २०२४च्या तुलनेत सुमारे ५.८१ टक्क्यांनी घसरण झाली आहे. तर याच काळात परिधान निर्यातीत ३.९७ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली आहे. मार्च २०२५च्या दरम्यान कापड आणि परिधानच्या संचयी निर्यातीत मार्च २०२४च्या तुलनेत १.६३ टक्क्यांची घसरण झाली आहे.

**निर्यातीत ३.६१ टक्के वाढ**

एप्रिल २०२४पासून मार्च २०२५ च्या दरम्यान भारतीय कापड निर्यातीत गेल्या वर्षीच्या तुलनेत ३.६१ टक्के वाढ झाली आहे. तर या काळात परिधान निर्यातीत १०.०३ टक्क्याने वाढ झाली आहे. सीआयटीआय विश्लेषणानुसार, ही वाढ समग्र वस्तू निर्यातीच्या कामगिरीच्या पुढे निघून गेली आहे. यापूर्वी ती याच कालावधीत बऱ्यापैकी स्थिर होती.

# झाडे उठली नागरिकांच्या ‘जीवा’वर

**नाशिक : अश्विनी पांडे**

## धोकादायक वृक्ष तोडण्यासाठी अडसर

**शहरातील धोकादायक झाडांचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. गंगापूररोडवरील सोमेश्वर येथे झाडाची फांदी अंगावर पडून शिवाजीनगर येथील एका महिलेचा बळी गेला, तर या महिलेचा मुलगा गंभीर जखमी झाला.**

दरवर्षीच धोकादायक झाडांमुळे दुर्घटना घडत असतात. त्यामुळे मनपाच्या उद्यान विभागाकडून धोकादायक वृक्षे हटवण्यात यावी, अशी मागणी नागरिकांतून करण्यात येत आहे. शहरात दरवर्षी वृक्ष, वृक्षांच्या फांद्या अंगावर कोसळून अपघात झाल्याच्या घटना घडत असतात. एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाकडून धोकादायक झाडे तोडण्यात येतात. शहरातील गंगापूररोड, मखमलाबाद, म्हसरूळ, सातपूर, उपनगर या भागात मुख्य रस्त्यालगत झाडे आहेत. यातील बरीच झाडे ही जुनी आहेत. त्यातील गुलमोहराचे वृक्ष ही पोकळ असल्याने हवा अथवा मुसळधार पावसात सहजपणे कोसळण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा दुर्घटना सातत्याने घडताना दिसत आहेत. सातत्याने झाडामुळे हकनाक बळी जात असताना प्रशासन काही बोध घेऊन उपाययोजना करणार का? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहे.






### दीड वर्षात ५ जणांचा मृत्यू

उन्हाळ्यात व पावसाळ्यात वृक्ष कोसळून अपघाताच्या घटना घडल्या आहेत. त्यात गेल्या दीड वर्षात अंगावर झाड अथवा झाडांची फांदी कोसळून पाच जणांचा मृत्यू झाल्याची नोंद मनपाच्या उद्यान विभागात आहे.

### यामुळे कोसळतात झाडे

उन्हाळ्यामुळे झाडांच्या फांद्या सुकल्याने कमकुवत होतात. सततच्या उन्हामुळे काही झाडे मुळापासून तुटतात. पाऊस पडल्यानंतर अलगद ही झाडे मुळापासून वेगळी होऊन कोसळतात.

### शहरात ४९ लाख झाडे

पाच वर्षांपूर्वी झालेल्या वृक्षगणनेनुसार महापालिका हद्दीत एकूण ४९ लाख झाडे आहेत. त्यात सर्वाधिक २४ झाडे गिरीपुष्प प्रजातीची आहेत. शहरात चार लाख २५ हजार ७७१ सुबाभूळची झाडे आहेत. निलगिरी, अशोका व गुलमोहर झाडांचे प्रमाण आहे. चार लाख १९ हजार ८०४ बाभूळ आहे. आंब्याची ९५ हजार ८२०, बोराची ५९ हजार ३३३, बटरफ्लाय पाल्म ३२ हजार ३६९, चंदन १९ हजार ७१७ आहेत. वडाची एक हजार १६० झाडे आहेत. ३९९२ पिंपळ तर ३६५८ उंबराची झाडे आहेत.

❛ धोकादायक वृक्ष तोडण्याची कारवाई उद्यान विभागाकडून वर्षभर सुरू असते. तसेच नागरिकांनी परिसरात धोकादायक वृक्ष आहेत, अशी तक्रार केल्यास तत्काळ वृक्ष तोडण्यात येतात. मात्र, अनेक वेळा जुने वृक्ष अंतर्गतरीत्या भुसभुशीत व पोकळ होतात. त्यातून अचानकपणे झाड कोसळून दुर्घटना होतात. नागरिकांना आपल्या परिसरात धोकादायक वृक्ष आढळल्यास तक्रार करावी.

**- विवेक भदाणे,**
उद्यान अधीक्षक, मनपा

# संतांची शिकवण!

विरंगुळा म्हणून यूट्यूब बघायला सुरुवात केली आणि एका बातमीने माझे चित्त वेधले. सायबर क्राइममुळे अनेकांची बँक खाती रिकामी झाली. साधारण शंभर वर्षांपूर्वी दरोडेखोर, चोर यांच्या भीतीने लोक दागिने पैसा -अडका सुरक्षित राहावा म्हणून धान्याची पोती स्वयंपाकघरातील डबे यांचा वापर मौल्यवान वस्तू पैसा अडका ठेवण्यासाठी करू लागले. तरीही शंभर टक्के हा सुरक्षित मार्ग नव्हता. त्यानंतर बँका निघाल्या. बँकेत पैसे ठेवले की निर्धास्त असे वाटायचे. पण जेव्हा बँकाच बुडू लागल्या तेव्हा सामान्य माणसाच्या दुःखाला सीमा राहिली नाही. आता अधिकृत बँकेतील पैसेही सायबर क्राइममुळे कधी गायब होतील हे सांगता येत नाही. यावरून लक्षात आले की कायदे तितक्या पळवाटा! आणि कोणत्याही क्षेत्रात भरवसा नाही. याला कारण माणसाची आणि पर्यायाने समाजाची ढासळलेली नीतिमत्ता. शेवटी विचार आला की माणसाजवळ कितीही बुद्धिमत्ता असली, कौशल्य असले पण माणुसकी नसेल तर त्याचा काहीही उपयोग होत नाही. माणुसकी म्हणजे दया, माया, प्रामाणिकणा इ. सुखदुःखाचा खेळ सतत सुरूच असतो आणि त्याचा संबंध मनाशीच असतो!

तेव्हा मला एका ग्रंथप्रदर्शनात सनातन संस्थेने प्रसिद्ध केलेला आनंदी जीवनासाठी स्वभावदोष निर्मूलन आणि अहम् निर्मूलन या ग्रंथाच्या मुखपृष्ठावरील चित्र आठवले! सर्व काही असतानाही तीव्र द्वेष किंवा असूया यामुळे माणूस सतत दुःखी राहतो. उलट सश्रद्ध आणि आशावादी माणूस आनंदी राहू शकतो!

समर्थ रामदास स्वामींनी मनाच्या श्लोकात सांगितल्याप्रमाणे- ‘न होता मनासारीखे दुःख मोठे’ म्हणून तुकोबारायांनी वेगळ्या शब्दात मनाचे सामर्थ्य सांगितले आहे. ‘मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे साधन ।’ विपरीत परिस्थितीत टिकून रहाण्यासाठी मनच सक्षम हवे. आजचे शालेय शिक्षण विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये रुजवणे, त्यांच्यात राष्ट्राभिमान निर्माण करणे याला दुय्यम प्राधान्य देते. शहरासारख्या ठिकाणी आई -वडील दोघेही नोकरी-व्यवसाय करत असल्याने लहान वयात मुलांवर योग्य संस्कार होत नाहीत. ज्याचे परिणाम समाजात वाढलेली अनैतिकता, अनाचार यातून आज दिसत आहेत. यावर अध्यात्माची मात्राच योग्य असून, आध्यात्मिक साधनेने नीतिमत्ता निर्माण होते. दुर्गुणांचा ऱ्हास होऊन होऊन समाजाप्रति सद्भावना निर्माण होते. यासाठी सनातन संस्थेसारख्या संघटना विविध उपक्रम आणि ग्रंथाच्या माध्यमातून समाजात करत असलेला अध्यात्मप्रसार सद्यकाळात अत्यंत आवश्यक आहे.

**- संध्या काटदरे**
माणगाव

# सरकार एवढे निर्दयी कसे?

सध्याचे सरकार शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या, सुशिक्षित बेरोजगारांच्या, दुःखी व पीडितांच्या, अन्यायग्रस्त महिलांच्या प्रश्नांना व समस्यांना न्याय देण्यासाठी सपशेल अपयशी ठरले आहे. कारण सरकारने निवडणुकीपूर्वी जो वचननामा दिला होता, तो वचननामा अद्यापही कागदावरच आहे. त्याची अजूनही अंमलबजावणी झालेली नाही. ज्या शेतकऱ्यांनी, ज्या महिलांनी, ज्या कामगारांनी, ज्या शेतमजुरांनी, सुशिक्षित बेरोजगारांनी व सर्वसामान्य लोकांनी आपल्यावर मोठा विश्वास ठेवून आपल्याला भरघोस मतांनी निवडून आणले आणि आपल्या हातात या देशाची सत्ता देऊन आपल्याला सत्ताधारी बनवले. पण खरंच आपण त्या सत्तेचा वापर गोरगरीब व सर्वसामान्य लोकांसाठी करतो का? संसद भवनात व शेतकरी अधिवेशनात शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडतो का? शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या, कामगारांच्या व शेतमजुरांच्या, अन्यायग्रस्त महिलांच्या भल्यासाठी व हितासाठी काही ठोस निर्णय घेतो का? या प्रश्नावर सरकारने गांभीर्याने विचार करून आत्मपरीक्षण करायला हवे.

सरकारने शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये. सध्या सर्वत्र शेतकरी आत्महत्या हा ज्वलंत प्रश्न आहे. दिवसेंदिवस शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढतच जात आहे. शेतकरी नापिकीला व कर्जबाजारीपणाला कंटाळून रोज आत्महत्या करत आहेत. शेतकरी आत्महत्यांचा देश म्हणून जगात भारताची ओळख होत आहे. हे सरकारला कळायला हवे. पण हे निर्दयी सरकार शेतकऱ्यांच्या बाजूने कोणतेच ठोस निर्णय घेत नाही. शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव देत नाही. त्यांना पीक विमा वेळेवर देत नाही. म्हणजे हे निर्दयी सरकार स्वतःचा स्वार्थ साधण्याचा पुरेपूर प्रयत्न करत आहे. मग असले स्वार्थी सरकार शेतकऱ्यांचा विकास कसा काय करेल? हा प्रश्न पडतो. दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आपल्या



देशात सुशिक्षित बेरोजगारांची संख्या सध्या झपाट्याने वाढली आहे. शिक्षण शिकूनही नोकरी लागत नाही, म्हणून बरेच तरुण-तरुणी आत्महत्या करून स्वतःचे जीवन संपवत आहेत. तर काही तरुण-तरुणी नैराश्यात जीवन जगत आहेत. कारण त्यांचे वाढलेले वय आणि त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्यामुळे आणि शासन वेळेवर नोकरभरती काढत नसल्यामुळे आजही बहुतांश तरुण-तरुणी नैराश्यात जाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करत आहेत. हे सरकारने लक्षात घेऊन काहीतरी ठोस उपाययोजना केली पाहिजे.

**बुद्धभूषण कांबळे**
७४९८७१५६६१

त्याचबरोबर शेतमजुरांचे देखील तेवढेच गंभीर प्रश्न आहेत. त्यांनासुध्दा सालगडी म्हणून दुसऱ्यांच्या शेतात अहोरात्र कष्ट करावे लागत आहेत. त्यांना घरप्रपंच चालवणे व घरातील मुलाबाळांच्या शिक्षणाला पैसा लावणे अवघड जात आहे. म्हणून घरातील अठराविश्व दारिद्र्याला कंटाळून बहुतांश शेतमजूर व कामगार आत्महत्या करत आहेत. महिलांचा सुद्धा प्रश्न तेवढाच गहन व गंभीर आहे. सध्या महिलांवरील अन्याय-अत्याचारांचे प्रमाण वेगाने वाढले आहे. त्यांचा सार्वजनिक ठिकाणी छळ केला जात आहे. तरीसुद्धा हे बलात्कारी गुन्हेगार मोकाट फिरत आहेत. त्यांना शासन कोणतीच शिक्षा देत नाही. त्यामुळे महिलांना देखील सरकार प्रति प्रचंड राग आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या मारेकऱ्यांना अद्यापही शिक्षा झालेली नाही. सरकार त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. भारतात अशा कितीतरी पीडित महिला व पीडित पुरुष आहेत की, त्यांना अजूनही न्याय मिळालेला नाही. म्हणजे या सरकारला महिलांबद्दल, शेतकऱ्यांबद्दल, शेतमजुरांबद्दल आणि कामगारांबद्दल कसलीच दयामाया राहिलेली नाही. एवढे निष्ठूर व कठोर हृदयाचे सरकार झाले आहे. म्हणूनच आज जनता सरकारचा जाहीर निषेध व्यक्त करत आहे. सरकारला पदावरून पायउतार करण्याचा प्रयत्न करत आहे. सरकारच्या अशा बेजबाबदार वागण्यामुळे आपला देश इतर देशांच्या तुलनेत फार मागे पडला आहे. हे आपण जाणून आहोत. जोपर्यंत सर्वसामान्य शेतकऱ्यांचा, कष्टकऱ्यांचा, कामगारांचा, शेतमजुरांचा व तळागाळातील लोकांचा विकास होणार नाही, तोपर्यंत आपल्या देशाचासुद्धा विकास होणार नाही. हे कोणालाही मान्य करावेच लागेल. कारण त्या बिचाऱ्या शेतकऱ्यांची तरी काय चुकी? ते बिचारे मायबाप सरकारला मोठ्या अपेक्षेने निवडून देतात. आणि देशाचे सत्ताधारी बनवतात. त्यांनाही वाटते की, सरकार निवडून आल्यावर आपल्याला सुखाचे व आनंदाचे दिवस दाखवेल. पण हे सरकारच निर्दयी व बेजबाबदार असेल तर मग शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय कसा काय मिळेल? कसा अन्यायग्रस्त महिलांना न्याय मिळेल? शासनाच्या हातात या देशाची सत्ता व अधिकार देऊन खूप वर्षे झाली. पण अजूनही आपल्या देशातील गोरगरीब जनता सुखी व समाधानी झाली नाही. अजूनही शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय मिळाला नाही. दररोज शेतकरी आत्महत्यांची आकडेवारी वाढतच जात आहे. ही लोकशाही प्रधान देशासाठी धोक्याची घंटा म्हणावी लागेल. आणि जाता जाता दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा सांगतो की, आता गरीब-श्रीमंत दरी वाढत जात आहे. म्हणजे गरीब आणखीन गरीब होत आहेत आणि श्रीमंत आणखीन श्रीमंत होत आहेत.

**दिंडोरी रोडवरील पोकार कॉलनीतील युवा कार्यकर्ता आणि सर्वांना आपलंसं करणारा नर्सरी व हॉटेल व्यावसायिक रोहित साहेबराव बुनगे (३५) याचे गुरुवारी (दि.१७) हृदयविकाराने निधन झाले. रोहित (दादा) या नावाने सर्व परिचित असलेला रोहित मात्र त्याच्या मित्रपरिवारासह कुटुंबालाही चटका लावून गेला !!**



# सर्वांना आपलंसं करणारा रोहित हरपला

बुनगे परिवाराचे मूळ गाव ढकांबे. परंतु दोन कुटुंब माडसांगवी आणि दोन कुटुंब मखमलाबाद येथे स्थायिक झाले. त्यातील माडसांगवी येथील स्व. भास्करराव बुनगे यांची दोन मुलं- त्यातील एक साहेबराव अन् दुसरा संजय हे दोघेही शिक्षित. यातील साहेबराव हे भारतीय आयुर्विमा महामंडळात (एलआयसी ) नोकरीला होते. साहेबराव यांना दोन मुलं. यातील मोठा रोहित तर लहान अमित. साहेबराव नोकरीला असल्याने त्यांनी दिंडोरी रोडवरील पोकार कॉलनीत फ्लॅट घेऊन ते तेथील रहिवासी झाले. रोहितचे दहावीपर्यंत शिक्षण सीडीओ मेरी शाळेत तर महाविद्यालयीन शिक्षण केटीएचएम कॉलेज येथे झाले. बारावी सायन्सनंतर त्याने मराठा विद्या प्रसारक समाजाच्या ॲग्रीकल्चर महाविद्यालयात बी.एस्सी ॲग्री शिक्षण पूर्ण केल्यानंतर मुंबई सांताक्रुज येथे ॲग्री बिजनेस मॅनेजमेंट पदवी घेतली. रोहितचे आजोबा भास्करराव बुनगे, मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सभासद होते. त्यामुळे त्यांच्या निधनानंतर रोहित मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचा वारसाहक्काने सभासद झाला. ॲग्रीकल्चरचे शिक्षण असल्याने त्याला ॲग्रीकल्चर कॉलेजवरील कमिटीवर घेण्यात आले. त्यानंतर तो संस्थेच्या तत्कालीन सरचिटणीस श्रीमती नीलिमाताई पवार, प्रणव पवार यांच्या अगदी जवळ गेला. संस्थेच्या निवडणुकीत श्रीमती पवार यांच्या पॅनलसोबत त्यांच्या प्रचारातदेखील अग्रेसर असायचा. त्याने संस्थेच्या शाळा, महाविद्यालयात झाड लावणे, उद्यानाबाबत मार्गदर्शन देखील केले. ॲग्रीकल्चरचे शिक्षण झाल्यानंतर त्यांनी नोकरी करण्यापेक्षा स्वतःचा व्यवसाय करण्याचे ठरवले.

**आदरांजली**
**सुनील बुनगे**
९८२३२६५९४७

दिंडोरी तालुक्यातील पाडे या गावी शेती घेतल्याने त्या ठिकाणी रोप, झाड लावून नर्सरी सुरू केली. त्यानंतर दिंडोरी रोडवरील म्हसरूळ परिसरात नर्सरी व्यवसाय सुरू केला. हा व्यवसाय सुरू करत असताना त्याला हॉटेल व्यवसाय सुरू करण्याची कल्पना सुचली. त्यानंतर त्याने तेथील नर्सरी बंद करून त्या ठिकाणी २०१७ साली साई गार्डन मिसळ नावाने हॉटेल व्यवसाय सुरू केला. यावर अवलंबून न राहता नंतर शुद्ध शाकाहारी पदार्थांचे हॉटेल सुरू केले. या हॉटेलमध्ये केवळ जेवण न ठेवता छोटे-मोठे वाढदिवस, सेवानिवृत्तांचे रिटायरमेंट असे कार्यक्रमदेखील सुरू केले आणि हॉटेल व्यवसायात चांगला जम बसवला. हॉटेल व्यवसायात त्याला त्याचे वडील साहेबराव, आई छाया, पत्नी कावेरी, लहान भाऊ अमित, त्याची पत्नी शुभांगी यांचीदेखील मदत होऊ लागली. नंतर त्याने शेतीत हॉटेल व्यवसायाला जोड म्हणून पोल्ट्री व्यवसाय सुरू केला. या पुन्हा वाढ करायचे ठरवून त्याने नवीन दोन पोल्ट्री फॉर्म वाढविण्याचा निर्णय घेतला. नुकतेच एका नव्या शेडचं भूमिपूजन देखील झालं. शालेय, महाविद्यालयीन जीवनात असताना त्याने मोठा मित्र परिवारदेखील जमा केला होता तर सामाजिक कार्यात देखील तो अग्रेसर होता. गेल्याच वर्षी १ जून रोजी त्याचे वडील साहेबराव बुनगे हे ३९ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर भारतीय आयुर्विमा महामंडळातून सेवानिवृत्त झाले होते. सर्व काही सुरळीत होत असताना मात्र परंतु नियतीला काही हे मान्य झालं नाही अन् अवघ्या ३५ व्या वर्षीच तो गुरुवारी दि.१७ एप्रिल रोजी त्याच्या आई, वडील, पत्नी आणि त्याचा एका लहानशा मुलासह नातेवाईक अन् मित्रपरिवाराला मात्र चटका लावून गेला. अशा मनमिळाऊ रोहितला सर्व मित्रपरिवार अन् नातेवाइकांकडून भावपूर्ण श्रद्धांजली!

# जगायचं तरी कुणासाठी व कशासाठी ?

**जीवनगाणे**
**जीवनगाणे गातच रहावे,**
**झाले गेले विसरून जावे,**
**पुढे-पुढे चालावे,**
**जीवनगाणे गातच रहावे**
**जीवनगाणे ।।**

माणूस जन्माला येतो, याच पृथ्वीवर लहानाचा मोठा होतो. पुढे सुख -दुःखाची अनेक वादळे झेलत आयुष्य जगतो. काटेरी कुंपणाने वेढलेले आयुष्य आपण आनंदाने का जगतो? कशासाठी जगतो? आणि कुणासाठी जगतो? याची मात्र काहीच कल्पना नसते. तरी आपण जीवन सुंदर आहे असेच म्हणतो.

वितभर पोटाची खळगी भरण्यासाठी आयुष्यभर काबाडकष्ट करतो. पैसा मिळवण्यासाठी कुठेतरी नोकरी करतो, लहानसहान कामे करतो, अंगमेहनतीची ही कामे करतो. भरपूर पैसा जमा करण्याचे ध्येय असते. पूर्वी ८० /९० वर्षांचे आयुष्य जगायचा, आता ६०/७० वर्षे जगतो आणि मरून जातो. मेल्यानंतर कुटुंबीय, नातेवाईक चार दिवस रडतात आणि विसरून जातात. मेल्यानंतर पृथ्वीतलावरचं आपलं अस्तित्व मात्र कायमचं संपुष्टात येतं. आपण कितीही चांगले असलो तरी मेल्यानंतर आपली आठवण ही फक्त १५/२० दिवसांपुरतीच असते. कारण आपण जगलेलो असतो ते केवळ आपल्या कुटुंबापुरतंच. मी, माझं कुटुंब एवढंच जग असतं आपलं. त्यामुळे आपलं अस्तित्व मर्यादित राहते. ते एखाद्या डबक्यातील बेडकाप्रमाणेच म्हणावे लागेल.होय बेडूकच.



मग जगायचं तरी कुणासाठी? तर जगावं ते समाजासाठी. तुम्ही कुणाच्या तरी कामी येता का? यालाच तुमचं करिअर म्हणतात. तर तुम्ही स्वतःच्या पलीकडे जाऊन जेव्हा विचार करता त्याला शिक्षण असं म्हणतात. करिअर म्हणजे केवळ नोकरी मिळवणं किंवा व्यवसायात प्रगती करणं एवढाच संकुचित विचार नसावा. समाजाचा विचार करून जगणं म्हणजेच आयुष्य होय. हीच सामाजिक बांधिलकी आपण जपायला हवी.

जीवनात खूप पैसा, गाडी, बंगला, दागदागिने आहेत म्हणून एखादा माणूस श्रीमंत असतो असं मुळीच नाही. चांगल्या स्वभावाचा, विचारांचा, शांत झोप येणारा माणूस हाच खरा सर्वांत श्रीमंत असतो. भौतिक साधनापेक्षा समाधान महत्त्वाचे असते.

आजवर पैशाने खूप श्रीमंत असणाऱ्या एखाद्या व्यक्तीची आपण आठवण काढतो असं मला तरी वाटत नाही. पण समाजासाठी झटणारे ते छत्रपती शिवाजी महाराज आणि अनेक थोर समाजसेवक, देशभक्त आजही आपल्या स्मरणात आहेत. कारण ते जगले होते समाजासाठी. उदाहरण घ्यायचंच झालं तर आताच दोन दिवसांपूर्वी आपण ज्यांचा स्मृतिदिन साजरा केला ते संत गाडगेबाबा. काय होतं त्यांच्याकडे? फक्त हातात एक खराटा, डोक्यावर फुटलेल्या मडक्याचं खापर आणि अंगावर फाटका सदरा. पैशाचा तर विषयच नव्हता. चलनाचं एक नाणंसुद्धा खिशात नसायचं. गाव झाडत फिरायचं आणि एखाद्याने दिलेला भाकर तुकडा खाऊन आयुष्य जगायचं. पण त्यांनी जगाला अनमोल शिकवण दिली ती स्वच्छतेची आणि अंधश्रद्धा निर्मूलनाची व शिक्षण घेण्याची. याच विचारांमुळे आज ते अजरामर झाले. तसेच आताच जग सोडून गेलेल्या सिंधूताई सपकाळ माई. त्या अखंड देशातील अनाथ मुलांच्या माई बनल्या. त्यांना भाकर खायला नव्हती, पण त्यांनी हजारो मुलांना समाधानी व सुखाने भरलेले आयुष्य जागायला शिकवले असा परोपकार असावा.

**बालाजी नाईकवाडी**
९९२२७६४३५०

आयुष्यात हे तुझं हे माझं करत बसतो. एकमेकांचा राग, द्वेष करत आयुष्य घालवण्यापेक्षा चांगलं राहायला शिका. ज्या कुटुंबासाठी आज जगतोय. ज्या मुलांना लहानाचं मोठं करतोय तीच मुलं तुम्हाला म्हातारपणात सांभाळतीलच याची कुठलीही शाश्वती नाही. म्हातारे झाल्यावर आई-बाप काहीच काम करत नाहीत म्हणून त्यांना एखाद्या वृद्धाश्रमात नेऊन ठेवलं जातं. असे होऊ द्यायचे नसेल तर आपण मुलांना थोडे पुस्तकी ज्ञान कमी शिकवा, पण संस्काराचे बाळकडू मात्र खूप शिकवा.

**जिवाभावाचे मित्र जोडा,**
**सहकार्याने वागा,**
**मदतीला धावून जा,**
**समाजासाठी जगा...**
**दान-धर्म करा...**
**भुकेल्या माणसांना अन्न द्या..**
**आनंदात जगून घ्या...**
**फिरावंसं वाटलं तर**
**भरपूर फिरून घ्या...**

उतारवयात भक्तीचा मार्ग धरण्यापेक्षा आजपासून भक्ती करा. भक्तीने यश मिळो अथवा न मिळो पण समाधान मात्र खूप मिळते. जगात येताना एकटे रडत येतो तरी जाताना मात्र सर्वांचे होऊन जगण्यातच खरी मज्जा आहे. तसेच आपण जातो तेव्हा सर्वांच्या डोक्यात पाणी येईल असे जगावे. सगळे झाल्यानंतर जीवनाच्या शेवटच्या क्षणी प्रश्न पडतो की, आपण आयुष्यभर जगलो ते कुणासाठी? याचे उत्तर आहे दुसऱ्याच्या डोळ्यात येणारे पाणी. हसत रहा, मनसोक्त जगा व इतरांना जगू द्या... जीवन सुंदर आहे.